१९६२.
म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.

आर्नॉल्ड टॉयन्बी

# एक विश्व आणि भारत

REFBK-0012340
REFBK-0012340

नॅशनल बुक ट्रस्ट, इण्डिया

निबंध
३६८०१
१५.८.६४.
अं.शा.
१५१६.

# एक विश्व आणि भारत

(आझादस्मृति व्याख्यानमाला १९६०)

आर्नॉल्ड टॉयन्बी

भाषान्तरकार

चन्द्रकुमार डांगे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 3५९०१ वि: निबंध
क्रमांक ९५१४ नों दि: २५-९-५४

92386

REFBK-0012340

नवी दिल्ली

December 1962 (Pausa 1884)
डिसेम्बर १९६२ (पौष १८८४)

*Published by arrangement with*
*Indian Council for Cultural Relations*

Rs. 1.25
रु. १.२५

ONE WORLD AND INDIA
*(Marathi)*

PUBLISHED BY THE SECRETARY, NATIONAL BOOK TRUST, INDIA, NEW DELHI-13
AND PRINTED AT ALBION PRESS, KASHMERE GATE, DELHI-6

# प्रस्तावना

प्रोफेसर आर्नॉल्ड टॉयन्बी यांना आझादस्मृति व्याख्यानमालेचें दुसरें पुष्प गुंफण्यास निमंत्रण करतांना माझ्या डोळ्यांसमोर एक हेतु होता. तो असा कीं मौलाना आझादांनीं भारताच्या सार्वजनिक जीवनांत ज्या कांहीं महत्त्वाच्या गोष्टी केल्या त्यांपैकीं फक्त एका गोष्टीकडे या मालेच्या श्रोतृवृंदाचें लक्ष वेधून घ्यावें. गतवर्षी मी असें म्हणालों कीं मौलाना आझाद मूळचे विद्याव्यासंगी होते. परिस्थितीनें ते राजकीय क्षेत्रांत ओढले गेले. विद्येच्या कोणत्याहि उपासकाचे सत्याची अव्यभिचारी भक्ति आणि ऐहिक यशाकडे केलेलें दुर्लक्ष हे दोन विशेष सांगता येतील. आणि आपल्या दीर्घ सार्वजनिक जीवनांत हे गुण आपल्या व आपल्या सहकाऱ्यांच्याहि अंगीं बाणवण्याचा सर्व प्रयत्न त्यांनीं केला.

मौलाना आझादांची अशी श्रद्धा होती कीं प्रामाणिकपणा आणि सचोटी या विद्वत्तेच्या क्षेत्रांत जशा आवश्यक गोष्टी ठरतात तशाच त्या मानवी शासनपद्धतींतहि आवश्यक आहेत. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत प्रामाणिक विचारसरणी आणि कृति यांच्या आवश्यकतेबाबत ते कोणाशीहि कसलीहि तडजोड करण्यास तयार नसत. न्याय व सर्वसुलभ संधीच्या तत्त्वांवर अधिष्ठित असलेलाच समाज जगूं शकेल. ज्यावेळीं माणसे हीं तत्त्वे स्वीकारतील तेव्हांच त्यांना एकमेकांबद्दलच्या अपेक्षा काय ठेवाव्या हें उमगून सर्वांच्या कल्याणासाठीं सामुदायिक कृति करण्यास तीं सिद्ध होतील. मनुष्य जेव्हां केवळ स्वतःसाठींच कांहीं विशेष अपेक्षा बाळगतो तेव्हां त्याचा ताण सामाजिक जीवनावर पडल्याशिवाय राहत नाहीं. जेव्हां अनेक व्यक्ती अशा तऱ्हेनें वागूं लागतात तेव्हां समाजाचें स्थैर्यच नष्ट होतें. एकाच व्यक्तीने केवळ स्वतःसाठींच सर्व फायदे अनेक वेळां अपेक्षिल्यामुळें पूर्वी भारताचें फार नुकसान झालेलें आहे. मौलाना आझादांनीं असें वारंवार प्रतिपादन केलें कीं सत्याचा न्याय्य मार्ग जर आपण सोडला तर आपल्या राष्ट्राचें भवितव्य धोक्यांत आल्याशिवाय कधींहि राहणार नाहीं.

आपल्या खासगी आणि सार्वजनिक जीवनांत आचरणाचे उच्चतम मानदंड मौलाना आझादांनीं सतत स्वीकारले व त्यानुसारच वर्तन केलें. पण यामूळें

व्यक्तीच्या स्खलनशील वृत्तीबद्दल वाटणारी सहानुभूति आणि दयार्द्र दृष्टि त्यांच्याजवळ नव्हती असें नाहीं. मानवी जीवन आणि व्यवहार यांचे ते एक गाढे विद्यार्थी असल्यामुळें त्यांना हें ठाऊक होतें कीं आपल्या हातून चुका आणि प्रमाद होणें अटळ असून आपण या मानवी उणेपणाचा फाजील तिरस्कार करून चालणार नाहीं.

म्हणून कोणासहि अमर्याद शब्दांत दोषी ठरविण्यास ते कधींच राजी नसत. पण व्यक्तीबद्दल वाटणारी ही अनुकंपेची वृत्ति, सार्वजनिक जीवनाचा प्रश्न आला कीं ते बाजूला ठेवीत व विशिष्ट मानदंडांचीच अपेक्षा आग्रहानें धरीत असत. ज्या व्यक्तीकडून प्रमाद घडला असेल तीबद्दल सहानुभूति बाळगून देखील त्यांची दृष्टि अशी असे कीं अशा प्रत्येक प्रमादाची निःपक्षपणें छाननी होऊन त्याचा न्याय्य परामर्श झाला पाहिजे. एकादी घटना किंवा व्यक्ति यांच्या संबंधीं सामाजिक न्यायनिर्णय करतांना आपली वैयक्तिक सहानुभूति ते कधींहि मध्यें येऊं देत नसत.

मौलाना आझादांचा विद्याव्यासंग अवघ्या ज्ञानविश्वास गवसणी घालून होता. इतिहासकार आणि तत्त्वज्ञ, साहित्यकार आणि बहुज्ञ अशा परस्पर-विरोधी भूमिका ते एकाच वेळीं पार पाडीत. आपल्या व्यासंगाला त्यांनीं सदैव शास्त्रीय कसोटी लाविली आणि शब्दप्रामाण्य किंवा परंपरा यांच्या आहारीं ते कधींहि गेले नाहींत. जन्मतः बुद्धिवादी असल्यामुळें प्रत्येक गोष्ट त्यांनीं बुद्धीच्या निकषावर पारखून घेतली. ज्ञान एकरूप असून विविध शास्त्रें केवळ वेगवेगळ्या मार्गांनीं एकाच सत्याचा स्वतंत्रपणें शोध घेत आहेत हें त्यांनी उमगलें होतें. जाति, देश किंवा काल या निकषावर ज्ञानाचें कधींहि विभाजन करतां येणार नाही, या त्यांच्या समजुतींत त्यांची हीच सर्वसंग्राहकता स्पष्ट दिसते. सर्व कालच्या व सर्व मानवांच्या प्रयत्नांनींच ज्ञानाची उदात्त वास्तु उभी होत गेली व यापुढेहि तशीच उभारली जाईल, अशी त्यांची दृढ श्रद्धा होती.

"पौर्वात्य आणि पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचा इतिहास" सिद्ध करण्याची प्रेरणा त्यांच्याकडूनच मिळाली. या एकाच तेजस्वी गोष्टीनें मौलाना आझादांच्या विशाल दृष्टिकोणाची साक्ष पटण्यासारखी आहे. इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशन्स ही संस्था स्थापन करून जगांतील सर्व देशांशीं भारताचे सांस्कृतिक संबंध घनिष्ट करणें हें तिचें उद्दिष्ट ठरविण्यांतहि त्यांची हीच वृत्ति स्पष्टपणें प्रकट होते. म्हणूनच या संस्थेच्या संस्थापक-अध्यक्षाची

स्मृति, मानवी जीवन आणि त्याची उन्नति यासंबंधीं व्याख्याने, ह्याच ध्येयाला वाहून घेतलेल्या विद्वानाला प्रतिवर्षी बोलावून साजरी करणें हें केव्हांहि उचितच ठरेल.

आमचें विशेष भाग्य हें कीं आझादस्मृति व्याख्यानमालेचा प्रारंभ श्री. जवाहरलाल नेहरू यांच्या व्याख्यानांनीं झाला. त्यांच्यापेक्षां मौलाना आझादांचा अधिक निकटवर्ती स्नेही दुसरा कोण असूं शकेल ? मौलाना आझादांच्या आशंका, आशा आणि ध्येय यांच्याशीं श्री. नेहरूंइतका दुसरा कोणीहि मनुष्य समरस झालेला नसेल. "भारत : आजचा आणि उद्याचा" अशा आशयाचा विषय निवडून पंडित नेहरूंनीं आपल्या अन्तःकरणांतील विचार प्रकट करतांना भारताचें नवें रूप आपल्या डोळयांसमोर उभें केलें. मौलाना आझादांनींहि भविष्यकालीन भारताचें स्वप्न असेंच रेखाटलेलें होतें.

पाश्चिमात्य जगांतील एक थोर विद्वान प्रोफेसर आर्नॉल्ड टॉयन्बी आज या मालेचें द्वितीय पुष्प गुंफण्यास आपल्याला लाभलेले आहेत. जगांतील कोणत्याहि देशांतल्या कोणत्याहि श्रोतृवृंदाला ख्यातनाम इतिहासकार म्हणून प्रोफेसर टॉयन्बी यांचा इतका उत्तम परिचय आहे कीं मी त्यांची अधिक ओळख करून देण्याची आवश्यकता नाहीं. तेव्हां त्यांच्या गाढ व्यासंगाबद्दल मी बोलत नाहीं. फक्त ज्यांच्या स्मृतिसाठीं ही व्याख्यानमाला गुंफली जात आहे ते मौलाना आझाद व प्रोफेसर टॉयन्बी यांना उभयसामान्य असणाऱ्या अशा एका वैशिष्टयाचा केवळ निर्देश करतो. मौलाना आझादस्मृति व्याख्यानमालेचें प्रथम पुष्प भूषविणारे श्री. जवाहरलाल नेहरू यांनाहि तें वैशिष्टच लागूं आहे हें नमूद केलें पाहिजे. अजून निर्मितीच्या अवस्थेत असलेल्या जागतिक राज्याचे हे तिघे नागरिक आहेत.

जगांतील संस्कृतींचा उदय आणि अस्त हा प्रोफेसर टॉयन्बी यांच्या अभ्यासाचा खास विषय आहे. त्या अभ्यासापासून प्रोफेसर टॉयन्बी यांना जें तत्त्व पटलें आहे, आणि ज्याचें प्रतिपादन त्यांनी केलेलें आहे तें हें कीं इतिहासाच्या उषःकालापासून अनेकविध परिस्थितींशीं गांठ पडली असतांहि मानवानें एकत्वाची मूलभूत भावनाच सदासर्वदा अभिव्यक्त केलेली आहे. प्रोफेसर टॉयन्बी यांच्या व्यासंगानें आमच्या सहजसुलभ श्रद्धेला पुष्टि देऊन हेंच सिद्ध केलेलें आहे कीं मानवाचा इतिहास म्हणजेच भौतिक जगावरील मानवी मनाच्या वाढत्या प्रभावाचा इतिहास होय. मनुष्यांत एक दिव्यत्वाचा अंश आहे; त्याच्या बळावर त्यानें अत्यंत कठीण अशीं आव्हाने स्वीकारून, त्यांवर

मात करून दाखविलेली आहे. कित्येक व्यक्ती हार पावल्या; कांही राष्ट्रेसुद्धा या संघर्षांत नामशेष झालीं. परंतु मानव तसाच पुढें पावले टाकीत गेला आहे आणि आज तो अशा अवस्थेप्रत पोंचला आहे कीं नियतीशीं बहुधा निर्णायक असा सामना देण्यासाठीं तो उभा ठाकलेला दिसतो.

प्रोफेसर टॉयन्बी यांच्या अगाध ज्ञानविस्तारानें वाचकांना आश्चर्यमुग्ध केलेलें आहे. मानवाच्या दृष्टीनें याहून अधिक मोलाची गोष्ट म्हणजे, जीवन अधिक सुंदर करण्याच्या मानवी प्रयत्नाबद्दल त्यांना वाटणारी अपार कळकळ ही होय. कृत्रिमतेचे बांध फोडून आणि सहानुभूतीला व्यापक स्वरूप देऊनच मानवानें प्रगति केली आहे, हें आपण विशेषत्वानें ध्यानांत घेतलें पाहिजे. मानवाच्या ऐक्यांतील सर्व भौतिक अडथळे आता पूर्णपणें दूर झालेले आहेत. आतां प्रतिभेने फक्त एकच झेंप घेऊन या ऐक्यांतील शेवटचा मानसिक अडथळा दूर करावयाचा आहे. ज्या तळमळीनें आणि अव्यभिचारी भावनेनें प्रोफेसर टॉयन्बी जगाच्या भावनात्मक आणि बौद्धिक ऐक्यासंबंधीं आवर्जून सांगत आहेत ती तळमळ व भावना बव्हंशीं भविष्यसूचकच आहेत.

जगाचें ऐक्य प्रस्थापित करण्यांत भारताचा वांटा कोणता हा विषय प्रोफेसर टॉयन्बी यांनी निवडल्यामुळें आम्हांला फार आनंद झाला. सर्व वंश आणि देश यांतील लोकांच्या विचारधारांचा संगम कांहीं प्रमाणांत भारतांत होत आला आहे. भारताचा इंग्रजांच्या साम्राज्याशीं आलेला संबंध राजकीय आणि आर्थिक दृष्टीनें अनर्थकारी होता हें खरें. पण त्यामुळेंच पौर्वात्य आणि पाश्चिमात्य विचारांचें अन्योन्यवेधन घडूं शकलें हेंहि खरें. जगांत इतरत्र कोठेंहि असें घडलेलें आढळणार नाहीं. सामान्यतः पाश्चात्य सुशिक्षित व्यक्तीला आपल्या ग्रीक आणि हिब्रू परंपरेबद्दलच जाणीव असलेली दिसून येते. कांहींना, मध्ययुगांतील अरब लोकांनीं त्यांत कोणती भर टाकली याची कल्पना असते. परंतु भारत आणि पूर्वेकडील जग यांच्या ऋणाची मात्र पाश्चिमात्यांच्यांत फारच त्रोटक जाणीव दिसून येते. इतर पौर्वात्य देशांतीलहि पुष्कळ व्यक्तींच्या बौद्धिक दृष्टिकोणांत या जाणिवेचा अभाव दिसून येतो. या उलट आपल्या जीवनावर पाश्चिमात्य राजकीय आणि वैज्ञानिक विचारांचा केवढा आघात झालेला आहे याची जाणीव भारतांतील सर्वसामान्य सुशिक्षित मनुष्यास सत्वर झालेली दिसून येते. पाश्चिमात्य विचार आणि जीवनमूल्यें यांचा प्रभाव व त्यांसंबंधींची जागरूकता पूर्वेकडील इतर देशांपेक्षां भारतांतील विचारवंतांमध्यें अधिक प्रमाणावर दिसून येते. धर्म, संस्कृति, भाषा आणि

लोक यांच्या विपुल विविधतेंतूनहि समन्वय साधण्यांत भारताला यश प्राप्त झालेलें आहे. जगांतील धर्म, संस्कृति, भाषा व लोक यांच्यांतील यापेक्षांहि अधिक विशाल अशा वैविध्याचा समन्वय घडवून आणण्यांत मनुष्य-जातीला जो विजय मिळवितां येईल त्या विजयाचें क्षेत्रांत भारतानें मिळविलेलें यश हें पूर्वचिह्न होय.

आझादस्मृति व्याख्यानमालेचें दुसरें पुष्प गुंफण्यासाठी भावी जगाचे नागरिक प्रोफेसर आर्नॉल्ड टॉयन्बी यांना, आजच्या जगांतील नागरिकांच्या समोर भाषण करण्याची विनंति करतांना मला फार समाधान वाटत आहे.

२१ फेब्रुवारी, १९६० **हुमायून कबीर**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | | पृष्ठ |
| | प्रस्तावना | ३ |
| १. | जागतिक ऐक्याची गरज | ११ |
| २. | जागतिक ऐक्याची चळवळ | ३० |
| ३. | जागतिक ऐक्यास भारताचें साहाय्य | ४९ |

मराठा ग्रंथ संग्रहालय. ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३५८०१ वि: निबंध-
क्रमांक १५१६ नों दि १५-८-८४



# जागतिक ऐक्याची गरज

आझादस्मृति व्याख्यानमालेचा दुसरा व्याख्याता म्हणून आपण मला जें निमंत्रण दिलेंत त्यामुळे माझा विशेष सन्मान झालेला आहे. श्री. जवाहरलाल नेहरू यांच्यानंतर भाषण करण्याच्या मानाहून अधिक सन्मान तो कोणता ? पंत-प्रधानांच्या उद्‌घाटनाच्या भाषणानंतर, त्यांनीं ज्या दर्जाचें भाषण केलें त्यापेक्षा आपलें भाषण फारच कमी दर्जाचें होऊं न देणें याहून अवघड तें काय असूं शकेल ? आपण केवळ माझा मोठा सन्मान केला एवढेंच नव्हें तर मला मोठ्या आनंदाचीहि जोड करून दिली आहे. कारण १९५६ मध्यें नव्या दिल्लींत मौलाना आझादांना भेटण्याची संधि मला लाभली होती; व त्यांच्या व्यक्तित्वाची छाप माझ्या मनावर कायमची उमटली. कांही व्यक्ती अशा असतात कीं अल्पकालीन भेटीनें देखील त्यांच्या व्यक्तित्वाचा परिणाम भेटणारावर होतो; मौलाना आझादांचें व्यक्तित्व निश्चितच अशांपैकीं होतें. श्री. हुमायून कबीर यांचें निमंत्रणाचें पत्र वाचीत असतांना मला एका वेगळयाच भावनेनें भारलें होते. आनंद तर झालाच होता, आपल्याला अपूर्व सन्मान लाभल्याची जाणीवहि होती; पण सर्वांत अधिक माझें अंतःकरण भारावून गेलें होतें तें यामुळें कीं आपण एका इंग्रज व्यक्तीला हें निमंत्रण धाडलें होतें.

आपलें सरकार जें जें करतें त्याची जबाबदारी त्या देशांतल्या प्रत्येकावर पडत असते. आपल्या सरकारच्या प्रत्येक कृतीस, स्वतःचा विरोध असूनहि, प्रत्येक जण थोडा फार जबाबदार असतो. आतां मजसारखा एक इंग्रज, आपल्या निमंत्रणावरून, मौलाना आझादस्मृति व्याख्यानमालेचा दुसरा व्याख्याता म्हणून भारतीय श्रोत्यांसमोर बोलण्यास उभा आहे. आणि ज्याच्या स्मृतिस्तव ही व्याख्यानमाला होत आहे त्या तुमच्या देशभक्ताला तुरुंगवास घडविणाऱ्या शासकांच्या देशाचाच मी एक नागरिक आहे. गतवर्षी तुमच्या ज्या देशबांधवाने या मालेचें उद्‌घाटन केलें त्यालाहि अशीच वागणूक त्यांनीं दिली होती. म्हणून श्री. हुमायून कबीर यांचें पत्र वाचीत असतांना प्रथम मनांत आलें तें असें कीं ही घटना फक्त भारतांतच होऊं शकेल. ती घटना तर आतां

मराठा ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. 92380
(स्थळ प्रत)

घडलेलीच आहे व माझ्याशीं तिचा संबंध जडलेला आहे. म्हणून माझें मन अधिकच पुलकित झालें आहे. भारत आणि भारतीय लोक यांच्यासंबंधीं मला जें माहीत आहे त्यावरूनच मी म्हणतो कीं आपण मला दिलेलें निमंत्रण ही विशेषत्वानें खास भारतीय अशी घटना आहे. या निमंत्रणाच्या कृतींतूनच मला माझ्या विषयाची सूचना मिळाली. श्री. हुमायून कबीर यांनीं विषयनिवडीचें कार्य पूर्णपणें मजवर सोंपविलें होतें. म्हणून मी चटकन हा विषय निवडला आणि आपण तो मान्यहि केला. त्यावरच आतां तीन दिवस भाषण होईल. ज्या भावनेनें प्रेरित होऊन आपण मला निमंत्रण दिलेत ती भावना म्हणजे एका फार मोठ्या उपक्रमास भारतानें दिलेली विशेष देणगी आहे. आजच्या जगांतील सत्प्रवृत्त स्त्रीपुरुष आज या एकाच उपक्रमाचें चिंतन करीत आहेत.

मानवजातीच्या इतिहासांत, सर्व माणसांनीं एक कुटुंब म्हणून एकत्र रहावें अशी जी चळवळ आजच्या घडीला प्रथमच चालू झाली आहे तिच्या संदर्भांत मी बोलत आहे हें आपल्या ध्यानीं आलें असेलच. हा उपक्रम जितका स्वयंस्फूर्त आहे तितकाच तो अनिवार्यहि झाला आहे. तो यशस्वी करण्यासाठीं सर्व प्रकारच्या आणि सर्व ठिकाणच्या देकाराची गरज आहे. उदाहरणार्थ, यापुढें पाश्चिमात्यांकडून समाजास कोणत्या गोष्टींचा लाभ घडेल तो कोणासहि सहज समजेल. या अभूतपूर्व प्रमाणावर स्थापल्या व जगविल्या जाणाऱ्या समाजासाठीं पाश्चिमात्यांकडून एकतंत्र, विज्ञानाधिष्ठित असें संविधान लाभूं शकेल. कारण त्याशिवाय या नव्या समाजाची स्थापना आणि त्याचें स्थैर्य अशक्यच आहे. ही पाश्चिमात्यांची देणगी म्हणजे पाश्चात्यांचा शास्त्रीय दृष्टिकोण आणि पद्धति यांचा परिपाक आहे. आणि हा परिपाकहि उदारमतवादी दृष्टीचें फळ होय. ही उदारमतवादी वृत्ति सुमारे तीनशे वर्षांपूर्वी पश्चिमेकडील जगांत विशेष प्रभावी होऊं लागली. भारताकडून जी खास देणगी लाभेल ती माझ्या मतें दिलदारपणा आणि मनाची विशालता यांची होय. पाश्चात्यांच्या विशिष्ट साहाय्याने मानवजातीनें आज जागतिक ऐक्याच्या नवयुगांत प्रवेश केला असून तिला वरील भारतीय भेट आता खचितच अमूल्य सिद्ध होईल. "अंतराचा अंत" अशा काव्यात्मक शब्दांत आपण पाश्चिमात्यांच्या तंत्रविज्ञानांतील पराक्रमाचें वर्णन करतों. परंतु त्याच तंत्रविज्ञानानें मानवजातीच्या इतिहासांत प्रथमच अशीं अस्त्रे मानवाच्या हातीं दिलीं आहेत कीं त्यांच्यामुळें सारा मानववंश नष्ट होईल. हीं भयानक नवीं अस्त्रे हातांत आल्यामुळे मानवसमाजाचे आपल्यासारखे घटक आज एक न होतां एकमेकांसमोर युद्धास

उभे ठाकले आहेत. आपण या दुरवस्थेंत अशा घटकेला आलेलों आहोंत कीं सारेजण मानव असूनहि अजून एकमेकांना जवळ जवळ परकेच आहोंत. अगदीं जुन्या पाषाणयुगाच्या काळापासून पाहिलें तरी मानवजातीला आजच्यासारख्या सर्वनाशक घटकेचें भय पूर्वी कधींच निर्माण झालें नव्हतें. जेव्हां मानवानें जंतूंखेरीज सर्व मानवेतर सृष्टीवर या जगांत प्रभुत्व मिळविलें, अगदी तेव्हां-पासून, वाघ, सिंह, जंतू किंवा विषारी द्रव्येसुद्धा, स्वतः मनुष्य आज मनुष्याला जितका भयंकर वाटतो तितकीं प्राणघातक कधीं वाटत नव्हतीं. मानवानें आतां तर जंतूंवर देखील विजय मिळविलेला आहे. माणसानें जंतूंवर विजय मिळविला खरा, पण स्वतःवर मात्र मिळवला नाहीं. आणि आज त्याच्या हातीं अशीं शस्त्रे आलीं आहेत कीं तुलनेने जंतू किंवा वाघ देखील, त्यापुढें अगदी निरुपद्रवी ठरावेत. अशा या संकटाच्या वेळीं मिळतेंजुळतें घेण्याच्या व समेटाच्या वृत्तीची मानवजातीला खरी गरज आहे. माझी अशी श्रद्धा आहे कीं या गोष्टीची जाणीव भावी पिढ्यांना खचितच होईल. आणि त्यांनीं मागें दृष्टि फेंकली तर त्यांना दिसेल कीं भारतानेंच मानवजातीला या विशिष्ट प्रवृत्तीचें वाण दिलें होतें.

पश्चिमेकडील जगाचा आणि त्याच्या संभाव्य लाभांचा मी ओझरता उल्लेख केलाच आहे. त्यांत मला आणखी थोडीशी भर घालावीशी वाटते. आणि मगच मी माझ्या मुख्य प्रतिपादनाकडे वळणार आहे. मी आधुनिक पाश्चिमात्य उदारमतवादाचा उल्लेख केला. जिचा अभिमान पाश्चिमात्यांनीं बाळगावा अशीच ही गोष्ट आहे. त्यामुळें त्यांना श्रेयस्कर अशा कांही चांगल्या घटना निश्चित घडलेल्या आहेत. यामुळेंच माझ्या देशबांधवांना अशी प्रेरणा झाली कीं आपली भारतावरील सत्ता सोडून, भारताचा राज्यकारभार लोकमान्य नेत्यांच्या हातीं सोंपवावा. या नेत्यांना पूर्वी ह्याच सत्ताधिकाऱ्यांनी तुरुंगांत टाकलें होतें. या पाश्चिमात्य उदारमतवादी दृष्टिकोणाबद्दल मला अभिमान वाटतो; पण मला या गोष्टीचीहि जाणीव आहे कीं आपल्या उभय देशांच्या संबंधांतील अनर्थकारक घटनांच्या परंपरेचा हा सुखान्त शेवट म्हणजे पाश्चिमात्य उदारमतवाद आणि भारतीय अद्वेषवृत्ति या दोहोंतील परस्पर क्रिया-प्रतिक्रियांचा परिपाक आहे. या वृत्तीचाहि सर्वोत्कृष्ट आविष्कार आजच्या निर्णायक पिढीसमोर महात्मा गांधींनीं केला. आमच्याकडील उदारमतवादाच्या सुराची इकडील गांधीवादाशी मिलावट झाली. आपण स्वतः राजकीय स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर राजकीय बाबतींत जो महत्त्वाचा निर्णय घेतलांत

त्यानें आपण पाश्चिमात्य उदारमतवादी वृत्तीचा गौरवच केलेला आहे. हा निर्णय म्हणजे पाश्चिमात्य घटनाधिष्ठित लोकशाही पद्धतीचा आपण केलेला स्वीकार होय.

पाश्चिमात्य उदारमतवादाचा हा एक लाक्षणिक आविष्कार आहे. परंतु उदारमतवाद पाश्चिमात्यांचें जीवनाचें एकुलतें व एकमेव तत्त्वज्ञान नव्हें हें पाश्चिमात्यांनीं ध्यानांत घेतलेंच पाहिजे. पाश्चात्यांतील कॅथलिक व प्रॉटेस्टंट पंथांच्या साम्प्रदायिक यादवीपायीं निर्माण झालेल्या हिंसक व द्वेषमूलक प्रवृत्तीं-विरुद्ध घडून आलेल्या नैतिक प्रतिक्रियेंतून उदारमतवादाचा उदय पश्चिमेंत सतराव्या शतकांत झाला. पण त्या वेळेपासूनच उदारमतवादाला खुद्द पश्चिमे-कडेच अनेक आव्हानें स्वीकारीत रहावें लागलें. माझ्या वयाच्या पश्चिमेकडील रहिवाशांना तर दोन भयानक युद्धे पहाण्याचा प्रसंग आला. यातील प्रत्येक युद्ध युरोपांत सुरू झालें आणि त्याचें रूपांतर भीषण जागतिक युद्धांत झालें. या दोन्ही युद्धांमुळें पाश्चिमात्य विरोधकांनीच त्यांच्या उदारमतवादाचा अंत करण्याची वेळ आणली. म्हणून पश्चिमेची अवस्था दोन तोंडे असलेल्या जानूस या प्राचीन इटालियन देवतेसारखी झालेली आहे. ही दुतोंडी अवस्था म्हणजे पाश्चिमात्यांच्या मनांतील द्वंद्वाचें मूर्त स्वरूप आहे. हें द्वंद्व म्हणजे दोन परस्परविरोधी दृष्टिकोण आणि जीवनमूल्ये यांतूनच निर्माण झालेली अवस्था होय. या कठोर वस्तुस्थितीमुळे उदारमतवादी पाश्चिमात्यांना धास्तावल्या-सारखें झालें आहे. तिला छातीठोकपणें तोंड देण्यास आम्हीं धजत नाहीं. परंतु पाश्चिमात्येतर मानवजातींतील बहुसंख्य लोकांना ही स्थिति आतां अपरिचित राहिलेली नाही हें मी जाणून आहे. ज्यू लोकांना पश्चिमेच्या या दोन्हीं विरुद्धधर्मी तोंडवळयांची चांगलीच ओळख झालेली आहे. अलीकडे तर आशिया आणि आफ्रिका यांतील लोकांनाहि त्याची प्रचीति येत आहे. पाश्चिमा-त्यांच्या इतिहासांतील या प्रकरणाचें आपण जें अवलोकन केलेलें आहे—आणि मी तर हा कालखंड स्वतः अनुभवला आहे—त्यावरून हें स्पष्ट होतें कीं पाश्चात्य उदारमतवादाला आतां स्वतःचें अबाधित अस्तित्व गृहीत धरून चालणार नाहीं. आपल्या अतिकष्टसाध्य उद्दिष्टाप्रमाणें—म्हणजे स्वातंत्र्याप्रमाणे उदारमतवादाची किंमतसुद्धां निरन्तर जागरूकतेनेच द्यावी लागते. आतां मी माझ्या मुख्य प्रतिपाद्य विषयाकडे वळतो. मला पहिला मुद्दा मांडावयाचा आहे तो म्हणजे जागतिक ऐक्याची गरज हा होय.

आज आपल्याला जागतिक ऐक्याची गरज कां भासावी याचें कारण जितकें

खळबळजनक तितकेंच सामान्य आहे. "एक जग किंवा सर्वनाश" अशा सुभाषितवजा शब्दांत तें संक्षेपानें मांडलें गेलें आहे. राजकीय दृष्टीनें जागृत असलेल्या प्रत्येक स्त्रीपुरुषाला या अणुयुगांत कळून चुकलें आहे कीं आपण जर युद्धाला नाहींसें केलें नाहीं तर हें युद्ध आपल्यालाच नष्ट करील. इतकें चिरपरिचित विधान पुनःपुनः करण्यास संकोच वाटतो; परंतु त्याचा विचार न करणेंहि आपणांस परवडण्यासारखें नाहीं. कारण अजूनहि माणसे युद्धाला एक सर्वसामान्य व्यवस्था म्हणून मानीत आहेत आणि त्याचा आश्रय स्वेच्छेने करीत आहेत.

आज निर्माण झालेली युद्धविषयक आणीबाणीची स्थिति मानवी इतिहासाला अपरिचित नाहीं. गुलामगिरीसारखीं दुसरीं आणखी सामाजिक संकटे मानवानें हजारों वर्षे अविरत सहन केलीं आहेत; कारण त्या आपत्ती मानवी जीवनांत इतक्या मुरून गेल्या आहेत कीं निदान आजतागायत तरी त्या सर्वनाशक झालेल्या दिसत नाहींत. भयंकर स्वरूपाच्या परंतु प्राणघातक नसणाऱ्या संकटांकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ति केवळ निष्क्रियतेमुळें मनुष्यस्वभावांत येते. आणि आपणच या प्रवृत्तीची गय करतो. आपण अशी समजूत करून घेतों कीं हें जुनें सामाजिक दुखणें मानवी जीवनाबरोबर उपजत उत्पन्न झालें आहे. मग यांतूनच आपण असा युक्तिवाद लढवतों कीं तें संकट दूर करणें मानवी प्रयत्नांच्या पलीकडचें आहे. परंतु आपल्याला ही गोष्ट ठाऊक आहे कीं मानवी जीवन इतकें गतिशून्य नसतें. वहिवाटीनें किंवा संवयीनें एखादी संस्था, मानवी जीवनाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक संस्तरांत कायमचें स्थान मिळविते. परंतु कधींतरी भूम्यन्तर्गत उत्क्षेपणानें तो निद्रिस्त ज्वालामुखी जागृत होतो. आणि असें जेव्हां घडतें त्यावेळीं मानवाला, योग्य काळ निघून गेल्यावर उशीरा कां होईना, अशक्य म्हणून हटवादीपणानें सोडून दिलेल्या गोष्टींसाठीं चांचपडत तरी प्रयत्न करावाच लागतो. जें संकट आपण वरपांगी जन्मजात म्हणून अंगिकारतों, तेंच आतां मुळासकट उखडून नाहीसें करण्याची पाळी आपल्यावर येते. आपण तें संकट नाहीसें करावयाचें, का यामुळें आपणच नष्ट व्हावयाचें, असा क्षण येतो, तेव्हां हें संकट अनुल्लंघ्य आहे, ही विचारसरणी आपणांस पत्करतां येत नाहीं. हें संकट दूर होणें अशक्य आहे या पूर्वकल्पनेमुळे अगतिक न होतां तें नाहीसें करण्याचा प्रयत्न करणें आतां आपल्याला प्राप्त होतें. युद्धासंबंधीं आपण आज अशाच परिस्थितींत सांपडलों आहोत.

अशा प्रकारच्या चमत्कारिक परिस्थितींत स्वतःला गुंतवून घेण्याचा मूर्खपणा मानवानें सतत केला आहे. हा केवळ मूर्खपणा नव्हे, तर मठ्ठपणा होय. आणि पुन्हां मानवी स्वभावाला हें शोभत नाहीं. मनुष्यत्वाचें हें एक लक्षण समजावें कीं त्याला मागे घडलेलें कळूं शकतें आणि त्या भूतदर्शनाचें रूपांतर तो एक तऱ्हेच्या दूरदृष्टींत करूं शकतो. युद्धानें पहिली मोठी आहुति घेतली ती सुमारें ख्रिस्तपूर्व ३००० वर्षांपूर्वी. युद्धानें या कालखंडांत आपल्या एका प्राचीनतम संस्कृतीचा ग्रास केला. आजचा इराक ज्या ठिकाणीं आहे तेथीलच ती सुमेरियन आणि अकेदियन संस्कृति होय. तरी देखील आपण यानंतर ४००० वर्षें युद्धाला सतत टिकून राहूं दिलें. या काळांत विज्ञानाची प्रगति होतच राहिली आणि तिचें पर्यवसान अखेर अण्वस्त्रांच्या संशोधनांत झालें. चार हजार वर्षांपूर्वीच आपल्याला याची पूर्वसूचना मिळूनहि आपण संधीमागून संधि स्वतःहून ठोकरीत आलों. आजच्या आपल्या या दुरवस्थेबद्दल आपण स्वतःलाच दोष दिला पाहिजे.

मानवी व्यवहारांत धोका पत्करूनहि आपण भविष्याचे अंदाज बांधीत राहतों. तथापि त्याहूनहि अधिक जर कोणती गोष्ट असेल तर ती म्हणजे आपण भविष्यकालाकडे डोळेझांक करणें ही होय. जगावयाचें असेल तर कल्पना लढवावी लागते. या प्राचीन युद्धसंस्थेच्या भविष्याबाबत माझी, सामान्य कां होईना, पण अशी अटकळ आहे कीं युद्ध ही संस्था नाहींशी करण्याच्या प्रयत्नांत आपण नक्कीच विजयी होणार आहोंत. गुलामगिरी नष्ट करण्याच्या कार्यापेक्षां हें कार्य फारसें अवघड ठरणार नाहीं. गुलामगिरी देखील युद्धाप्रमाणेंच प्राचीन आणि खोलवर रुतून बसलेली व्याधि होती. परंतु गुलामगिरी नाहींशी करण्यांत अगदी अलीकडेच आपण यशस्वी झालों आहोंत. भूतकाळांत मानव-जातीनें स्वतःपासून आपला स्वतःचाच जो अनेक वेळां बचाव केला तो देखील ऐन घटकेला. कड्याच्या पार टोंकावर नाचत सुटणें हा शुद्ध माथेफिरूपणा आहे. तसेंच कड्यावरून पडतां पडतां अगदी टोंकाशीच थांबणें हाहि सारासार-विवेकाचा मोठासा विजय नव्हे.

युद्ध नाहीसें करणें या प्रश्नांतच, प्राथमिक स्वरूपाचें का होईना, पण जागतिक सरकार स्थापण्याची क्रिया अनुस्यूत आहे. अणुशक्तीची निर्मिति आणि तिचा उपयोग यांचें नियंत्रण करण्यासाठीं एक मध्यवर्ति संघटना स्थापणें व अर्थातच त्या संघटनेला पुरेशी सत्ता देणें हीच आपणांस आवश्यक असलेली पहिली जागतिक सत्ता म्हटली पाहिजे. समजा हेंहि साध्य झालें.

पण यावरच सर्व सोपवून भागेल काय ? कालत्रयीं नाहीं. आपणां माणसांना कांहीं काळसुद्धां काम थांबवून चालणार नाहीं. कारण एक समस्या सुटली कीं त्यांतून दुसरी कशावरून निर्माण होणार नाहीं ? युद्ध नष्ट करण्याचा प्रश्न सुटला तर लगोलग लोकसंख्येचा प्रश्न आ वासून पुढे उभा ठाकतो.

अर्थातच हा कांही नवा प्रश्न नाहीं. युद्ध आणि गुलामगिरी यांहूनहि हा प्रश्न प्राचीन आहे. पहिल्या समस्या केवळ संस्कृतीइतक्याच जुन्या आहेत. मनुष्य संस्कृतीच्या पातळीला जाईपर्यन्त युद्ध किंवा गुलामगिरी येऊंच शकत नाहीं. उलटपक्षीं लोकसंख्येचा प्रश्न मानवजातीइतकाच प्राचीन आहे. खरोखर पाहिलें तर हा प्रश्न भूलोकावरील चेतनोत्पत्तीइतकाच प्राचीन आहे. या प्रश्नाचें नवें स्वरूप इतकेंच कीं त्याची जबाबदारी आतां स्वतः मनुष्यावरच पडलेली आहे. आणि म्हणून तो प्रश्न आपलें लक्ष वेधून घेत आहे.

आपल्या कल्पना आणि ध्येय यांचेनुसार पृथ्वीवरील लोकसंख्येचें प्रमाण नियंत्रित करण्याची शक्ति मनुष्यजातीला परवांपरवांपर्यन्त प्राप्त झालेली नव्हती. आपण मानवजातीने या जगांत जन्माला येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्र, निरपेक्ष मूल्य आहे असें मानिलें आहे. पुरुषाला किंवा स्त्रीला आपण एक स्वतंत्र व्यक्ति म्हणून मानलें आहे आणि त्यांच्या जगण्याला, मनुष्यजातीच्या अस्तित्वाच्या दृष्टीनें, कांही अर्थ आहे असेंहि गृहीत धरलें आहे. मनुष्यजातीच्या सातत्याचें मूर्त रूप असलेल्या या मानवांच्या व्यक्तिदृष्टचा सुखी ठरणाऱ्या जीवनांत हा अर्थ स्पष्ट होतो. आपण निर्माण केलेल्या मूल्यांच्या मानदंडानुसार मनुष्य हा एक अमोल आत्मा ठरतो. या आत्म्याची वाटेल तशी विल्हेवाट लावावी असा मनुष्यजातीचा हा एक नुसताच नमुना नव्हे. परंतु निसर्ग सर्वच उपजातींच्या विविध नमुन्यांची वाटेल तशी उधळपट्टी करतांना आपल्यास दिसतो. अगदी अलीकडे देखील हेंच दिसून आलें आहे कीं ज्या पद्धतीनें निसर्गानें ससे, हेरिंग मासे, आणि मच्छर यांच्या प्रमाणाचेंहि नियंत्रण केलेलें आहे तीच पद्धत पृथ्वीवरील मानवजातीच्या लोकसंख्येचें प्रमाण नियंत्रित करण्यास निसर्गानें योजिली आहे. आपण माणसे हें सारें अगतिकपणानें नुसतें बघत आलों आहोंत. निसर्गाची ही एकमेव पद्धत आहे. आपण जोंवर सर्व कांही निसर्गावर सोपविलें आहे तोंवर असेंच चालणार. पण ही पद्धत अमानुष प्रमाणांत घातक आणि बेपर्वाईची आहे. उपजातींतील अगणित वेगवेगळया नमुन्यांचा त्यांचें नियत जीवितकार्य

संपण्यापूर्वीच निसर्गखुशाल नाश होऊं देतो. आणि उलटपक्षीं हजारोंपट मोठ्या संख्येने वृद्धीस वाव देऊन निसर्ग त्या उपजातींचे अस्तित्वहि चालू ठेवतो.

मानवजातीची सशासारखी वीण होऊं देत असतांनाच तिची संख्या आटोक्यांत ठेवण्यासाठीं निसर्गाच्या शस्त्रागारांत तीन परिणामकारक अस्त्रे आहेत. दुष्काळ, रोगराई आणि युद्ध. यांपैकीं युद्ध हें अस्त्र मानवी विकृतीनेंच निसर्गाला बहाल केलेलें आहे.

उपजातींच्या वाढींत छाटाछाट करून त्या प्रमाणबद्ध करण्याच्या अनेक प्रकारांपैकीं निसर्गाची एक तऱ्हा म्हणजे वेगवेगळया उपजातींच्या प्राण्यांना एकमेकांचे भक्ष्य बनविणें. प्राचीन अश्मयुगांत, वाघसिंहांचें भक्ष्यस्थानीं कसें पडावयाचें नाहीं हें शिकून मनुष्यानें यांत निसर्गाला चकविलें. आणि हाच माणूस दुर्बुद्धीनें मग निसर्गाच्या हातीं सांपडला. निसर्गानें जे डावपेंच कधीं वापरले नाहींत, किंबहुना मानवी कल्पनाशक्तीच्या माध्यमावांचून निसर्गाला जे कधीं वापरतांहि आले नसते, ते नेमके माणसांच्या मस्तकांत उगवले. मनुष्यानें स्वतःला स्वतःचें लक्ष्य बनविण्याची कला शोधून काढली. आपापसांत युद्ध करणें आणि तें अधिकाधिक भीषण पद्धतीनें करणें हाच तो मानवी शोध होय. बळी घेण्यांत वाघसिंहाहून मनुष्यप्राणी अधिक कुशल आहे. रोगजंतूहूनहि तो अधिक कार्यक्षम आहे. निसर्गाच्या हातून, एकामागून एक अशीं त्याचीं जीं खास घरगुती शस्त्रे, (दुष्काळ आणि रोगराई) तीं आपल्या पराक्रमानें मनुष्यानें काढून घेतलीं आणि म्हणूनच स्वतः निर्मिलेल्या शस्त्राची म्हणजे युद्धाची देणगी बहाल करून त्यानें निसर्गाचें सांत्वन केलेलें आहे. प्राचीन अश्मयुगांत वाघ आणि सिंह यांचें भक्ष्य बनवून आपली कत्तल करण्यांत आपण निसर्गाला अडविलें. चालू युगांतहि रोगजंतूंचें भक्ष्य बनवून आपला संहार करण्यास निसर्गाला आपण प्रतिबंध केला आहे. हा दुसरा पराक्रम पहिल्याहून अधिक श्रेष्ठ आहे. कारण तो साध्य करणें हें कठीण कार्य होतें. तरीहि निसर्गासाठीं मानवसंहाराचें कार्य आपण अनाहूतपणे केलें, करीत आहोंत. निसर्गाला एकट्याला साधलें नसतें अशा सफाईनें आणि परिणामकारक रीतीनें तें आपण करीत आहोंत. मनुष्यनिर्मित अशी ही युद्धसंस्था आपण अजून पोशीत आहोंत.

पण समजा, व्याधींपासून होणाऱ्या अकालमृत्यूवर आपण आधुनिक प्रगतीनें विजय मिळविला, आणि त्याच्या जोडीला युद्धामुळे येणारें मरण

टाळण्याच्या कामांतहि आपण यशस्वी होऊं ही माझी कल्पना खरी ठरली तर ! असा दुहेरी विजय, समजा, आपल्याला लाभला तर मग मानवजातींतील जन्म आणि मृत्यु यांतील नैसर्गिक समतोलपणा आपण संपूर्ण नष्ट करून टाकूं. एका हयातींत आपण दोन युद्धे केलीं. दुसरें युद्ध होऊन पुरी पंधरा वर्षे देखील झाली नाहींत. तरीहि व्याधिजन्य अकालमृत्यूंची संख्या कमी करण्यांत आपण नुकताच इतका विजय मिळविला आहे कीं मानवी लोकसंख्या पराकाष्ठेची वाढविण्याला तो अगदी पुरेसा आहे. आणि ही वाढ चढत्या वेगानें होत आहे. रोगप्रतिबंधक औषधांचे शोध लावण्याच्या क्षेत्रांत आपली आधुनिक शास्त्रीय प्रगति, अ णि असें संशोधन मानवी आरोग्याच्या रूपाने फलद्रूप होण्यासाठीं आपण योजिलेली आधुनिक कारभारयंत्रणा हे मानवाचे दोन पराक्रम म्हणजेच आपण निसर्गाच्या व्यापारावर आपल्या आकांक्षा लादण्याच्या खटाटोपांत मिळविलेले महान विजय होत. निसर्गावर मिळविलेले हेच विजय पूर्णत्वाप्रत नेल्याशिवाय आपला निसर्गाशी जुंपलेला हा सामना थांबविणें आपणांस आतां अशक्य आहे. पृथ्वीवरील लोकवस्ती नियंत्रित करण्याच्या निसर्गाच्या पद्धती-ऐवजी मानवनिर्मित पद्धत योजण्यांत आपल्याला जें कांही यश प्राप्त झालेलें आहे त्यामुळेच कशाचा स्वीकार करावयाचा हा प्रश्न अगदी सरळ सरळ आपल्यापुढें उभा राहिलेला आहे. हा निकडीचा प्रश्न आतां टाळतां येणार नाहीं. मानवी जन्मप्रमाण नियंत्रित करूनच या क्षेत्रांतली निसर्गावरील विजयश्री आपण पूर्ण करूं शकूं. आपण हें जन्मप्रमाण बुद्धिपुरःसर इतक्या प्रमाणांत कमी आणि नियंत्रित करूं शकूं कीं त्याचा मृत्यूसंख्येच्या प्रमाणाशी समतोल राहील. आणि मानवी उपायांनींच मृत्युसंख्येचा वेग तर आतां कमालीचा ओसरला आहे. दुसरा पर्याय म्हणून जननप्रमाण जर आपण निसर्गावर सोंपविलें तर आपण निसर्गावर मिळविलेलें प्रभुत्वहि अल्पायुषी ठरेल. असें घडलें तर परिणामीं सर्व मानवजातच अल्पायुषी होईल.

जननप्रमाण महत्तम प्रमाणांवर चालू ठेवणें आणि तशाच महत्तम प्रमाणांत मृत्युसंख्येचा वेगहि राखणें ही निसर्गाची रीत आहे. आतां तर मानवी प्रयत्नांनीं आपण मृत्युसंख्येचें प्रमाण झपाट्यानें कमी केल्यामुळे जननवेग आणि मृत्यु-संख्या यांतील गुणोत्तर शेवटीं पुन्हां एकदां समतोल केले जाईपर्यन्त पृथ्वी-तलावरील मानवांची लोकसंख्या भरमसाट वाढतच जाईल. हें मात्र निश्चित कीं हें प्रमाण आज ना उद्यां कोणत्याहि का मार्गानें होईना समान राखलें जाईल. कोणत्याहि प्राण्यांच्या उपजातीनें आपली संख्या असीम मर्यादेपर्यन्त

या पृथ्वीवर वाढूं दिली नाहीं. तसें करणेंहि अशक्य आहे. या पृथ्वीवर सेंद्रिय जीवनिर्मितीस लागणाऱ्या साधनांच्या प्रमाणालाहि मर्यादा आहे. ज्या वेळीं आपण स्वतः होऊन आपली वाढ कमी करण्याचे उपजातींचे प्रयत्न असफल होतात किंवा त्या जाती तशी वाढ थांबवूं इच्छित नाहींत, त्या वेळीं या वाढीवर बाह्य शक्तिद्वारा मर्यादा घातली जाते. मानवेतर उपजाती आपण होऊन ही मर्यादा घालूं शकत नाहींत. त्यांच्या संख्येवर आणि वाढीवर निसर्ग किंवा मानव हेच मर्यादा घालूं शकतील. मानवजातीची संख्याहि मर्यादित राहणें अपरिहार्य आहे. आणि हें कार्य निसर्गाकडे सोंपविण्याऐवजी आपलें आपणच करूं शकूं अशी विशेष परिस्थिति आपणा मानवांना मिळाली आहे.

हें कार्य निसर्गावर सोंपवायचें कीं आपणच करावयाचें या पर्यायांपैकी जो मार्ग आपण पत्करूं त्यावर मनुष्यजातीचें बरेवाईट भवितव्य अवलंबून आहे. समजा आपण रोगराईवर मिळविलेल्या विजयानें मृत्यूचें प्रमाण कमी करण्याचा उपक्रम चालूच ठेवला, आणि समजा आपण लढाईनें घडून येणारे मृत्यूहि कमी केले. यापेक्षांहि जास्त कठीण असलेली जननप्रमाणावरील मर्यादा घालण्यांतही आपण यश संपादलें. अर्थात निरनिराळीं सरकारे आपापसांत ठरवून हें घडवून आणूं शकत नाहींत. तर कोटचवधि पतिपत्नींच्या वैयक्तिक निर्णयानेंच हें घडून येऊं शकेल. अपत्यसंख्येवर मर्यादा घालण्याची बळजोरी तर कोणावरहि करतां येणार नाहीं. शिक्षणानें आणि सामोपचारानें हें घडवून आणावें लागेल आणि या गोष्टीला वेळ लागेल. पण समजा विज्ञानाच्या साहाय्यानें कमाल मर्यादेपर्यन्त जगाच्या अन्नधान्याचा पुरवठा वाढवून आपण आपणांस जरूर तो कालावधि मिळवूं शकलों व या साधनानें पृथ्वीवरील लोकसंख्येचें नियंत्रण करण्यांत आपण पूर्ण यश मिळविलें. हें स्वप्न जर साकार झालें तर मानवी जीवनाचे जे आदर्श हवेत ते प्रत्यक्षांत आणण्याच्या नव्या वाटा आपणांस खुल्या होतील. असें घडलें तर या जगांत प्रवेश करणाऱ्या प्रत्येक नवजात व्यक्तीला आपण जीं मानवी मूल्ये मानतो त्या मूल्यांच्या दृष्टीनें चांगलें जीवन जगण्याच्या भरपूर संधी उपलब्ध होतील. पृथ्वीवरील मानवी लोकसंख्या मर्यादित राखण्याच्या या पद्धतीला मानवतेच्या दृष्टीनें अर्थ आहे. कारण यामुळें जी व्यक्ति या जगांत आली, तिला स्वतःचें असें कांहीं मूल्य, काहीं महत्त्व आहे असें मानलें जाईल. बहुमोल अशा या उपजातीचा हा एक कवडीमोल नमुना आहे अशा निसर्गासारख्या दृष्टीनें आपण त्या व्यक्तीला कधींहि वागवणार नाहीं.

आतां आपल्या पुढील दुसऱ्या पर्यायाचा विचार करूं. समजा हा जनन-प्रमाणाचा प्रश्न आपण निसर्गावर सोंपविला–आणि पुष्कळशा देशांतून हा प्रश्न अजून निसर्गाकडेच सोंपविलेला आहे–तर मग, विज्ञानाच्या साहाय्यानें प्रचंड प्रमाणांत अन्नधान्यनिर्मिति शक्य होऊनहि, त्यामुळें होणारा सर्वनाश टळू शकणार नाहीं. फार तर हा प्रसंग अगदीं अल्पकाळ टाळतां येईल. कारण निसर्ग आपलें दुष्काळाचें हत्यार पुनः उपशील आणि आपल्यावर प्रतिप्रहार करील. निसर्गानें लपवून ठेविलेलें हें प्राणनाशक हत्यार आपण अजूनहि काढून घेऊं शकलों नाहीं. आपण हें जननाचें कार्य निसर्गाकडेच राहूं दिलें तर एक क्षण असा येईल कीं निसर्ग दुष्काळाचें शस्त्र उगारील आणि मग त्या दुष्काळावरोबरच भयंकर रोगराई आणि युद्ध या आपत्तीहि परत आपणांवर ओढवतील.

अशा प्रसंगी मानव जरी अणुपूर्व युगांत असला तरी त्याचें माणुसकीचें ध्येय आणि जीवित-हेतु यांत झालेला त्याचा हा असह्य असा पराजय ठरेल. पृथ्वीवरील लोकसंख्या नियंत्रित करण्याची माणुसकीची पद्धति अर्धवट रूढ केल्यावर मग तिच्या जागीं पुनः निसर्गाची पद्धति रूढ करून माघार घेणें आपण सहन करूं शकणार नाही. असें झालें तर ससे आणि हेरिंग मासे यांच्या निकृष्ट पातळीपर्यन्त स्वतःचा अधःपात खुशाल घडूं दिल्यासारखें तें होईल. हे बिचारे मानवेतर प्राणी प्रचंड प्रमाणावर जन्म घेतात आणि नाशहि पावतात. आपली संख्या कमी उधळपट्टीनें किंवा कमी क्रूरपणानें नियंत्रित करण्याची शक्ति त्यांच्याजवळ नाहीं. परंतु या अणुयुगांत ही विषादकारक भवितव्यता देखील मानवाच्या भागधेयांत उरणार नाहीं. कारण दुष्काळांतून जें युद्ध होईल तें कांहीं धनुष्यबाण आणि बंदूकगोळयांचें होणार नाहीं. तें अणुशक्तीनें समूळ नाश घडवणारें ठरेल. मानवनिर्मित पद्धतीनें व माणुसकीच्या पद्धतीनें आपल्या जननसंख्येचें नियमन करणें व दुष्काळाच्या स्फुल्लिंगानें पेटविलेल्या अणुयुद्धानें मानवजातीचा स्वयंकृत विनाश ओढवून घेणें यांपैकीं एकच मार्ग आपल्याला मोकळा आहे.

नव्या दिल्लीतील श्रोत्यांच्याच समोर मी बोलत असल्यामुळें दुष्काळ हें निसर्गाच्या भात्यांतील एक भयानक अस्त्र आहे हा मुद्दा विशेष स्पष्ट करण्याची गरज नाहीं. माझ्या समकालीन इंग्लिश माणसाला दुष्काळाच्या संकटाची कल्पना दुसऱ्या कोणाकडून तरी समजावून घ्यावी लागते. गेल्या सहाशे वर्षांत त्याच्या देशांत दुष्काळ पडला नाही असें इतिहासकार त्याला सांगतात. दुसऱ्या

ग्रंथालय दा. क्र. 92380

महायुद्धांत देखील तिकडे दुष्काळ असा नव्हता. माझेंच पहाना. त्या युद्धांत मी इंग्लंडमधें काम करीत होतो आणि मी रेशनवरच निर्वाह केला. पण भुकेच्या वेदना मला एकदाहि भोगाव्या लागल्या नाहीत. भूकबाधेच्या या स्थानिक व अल्पकालिक अभावानें, तिच्यापासून अलीकडेच अलिप्त असलेल्या, मानवजातीच्या या लहानशा गटाची कल्पनाशक्ति इतकी मंदावली आहे. परंतु मला हें पूर्णपणें ठाऊक आहे कीं या देशांतल्या आपल्यासारख्यांना दुष्काळ ही एक भयानक परन्तु प्रत्यक्षानुभूत अशी वस्तुस्थिति आहे. दुष्काळाचें सावट एकाद्या गिधाडाप्रमाणें अजूनहि दोन तृतीयांश मानवजातीवर घिरट्या घालीत असून बंगालला बसलेला त्याचा तडाखा तर अगदी अलीकडचा आहे. भारतांतील लोक या दुहेरी कार्याला गंभीरपणें लागले आहेत हें मला ठाऊक आहे. एक म्हणजे अन्नधान्याचें उत्पादन वाढविणें आणि दुसरी आईबापांनी कुटुंब मर्यादित राखावें यासाठीं मनधरणी करणें. श्री. बी. आर. सेन, आय. सी. एस. हे एक नामवंत भारतीय सनदी नोकर युनायटेड नेशन्सच्या अन्न आणि शेतकी संघटनेचे डायरेक्टर जनरल आहेत हें अगदी युक्तच आहे. जननसंख्येच्या नियंत्रणासंबंधीं इतका विचार करून प्रयत्न करणारें दुसरें सरकारहि नाहीं आणि लोकहि नाहींत. फक्त भारत सरकार आणि भारतीय लोकच असा प्रयत्न जारीनें करीत आहेत.

मला फक्त हाच मुद्दा विशेष मांडावयाचा आहे कीं सर्व मानवजातीचें ऐक्य आणि विश्वकुटुंबसंस्थेची निर्मिति याची आज जी आवश्यकता निर्माण झाली आहे ती अन्नाचा आणि लोकसंख्येचा प्रश्न सोडविणें आणि युद्धे नष्ट करणें या आपल्या गरजांतून. एकाच देशांतील किंवा खेड्यांतील जननसंख्येला मर्यादा घालून लोकसंख्येची समस्या सुटणार नाहीं. किती तरी पाश्चिमात्य देशांतून अशी मर्यादा यशस्वीपणें घातलेली आहे. पण तरी देखील जागतिक लोकसंख्येचा वेग मात्र भयावह गतीनें वाढतच आहे. जननियंत्रणाची चळवळ परिणामकारक होण्यासाठी ती जागतिक स्वरूपाची झाली पाहिजे. विज्ञानाच्या साहाय्यानें केली जाणारी अन्नधान्यनिर्मिति देखील परिणामीं यशस्वी होण्यासाठीं जागतिक प्रमाणावर झाली पाहिजे. त्यासाठीं या पृथ्वीवरील सर्व अन्नोत्पादक भूतलाचा अर्थशास्त्रीय दृष्ट्या एकच अखंड घटक कल्पून त्याची व्यवस्था झाली पाहिजे. आणि पृथ्वीवर कोठेंहि उत्पन्न केलेलें अन्न, दुसऱ्या कोणत्याहि भागांतील भुकेलेल्या लोकांच्या मुखीं गेलें पाहिजे. अशा प्रकारची संघटित व्यवस्था निर्माण झाल्याखेरीज, लोकसंख्या पूर्णपणें मानवी नियंत्रणाखालीं

आणण्यासाठीं हवा तो काळ मिळवून देण्याचे विज्ञानाचे प्रयत्न लंगडे पडतील. आतां ही संघटनव्यवस्था मुख्यतः राजकीय स्वरूपाची आहे, हें खरें. जोंवर अन्नधान्यनिर्मितीवरचें नियंत्रण आणि त्याचें वांटप स्थानिक सरकारच्या हातून काढून एकमुखी आणि सार्वभौम अशा जागतिक सत्तेच्या हातीं सोपविलें जात नाहीं तोंवर या अपेक्षा फलद्रूप होणार नाहींत. याच्या जोडीला अणुशक्तीच्या निर्मितीवर आणि तिच्या उपयोगावर नियंत्रण करणाऱ्या एकमुखी जागतिक सत्तेच्या निर्मितीचीहि आपल्याला गरज आहे. यांतूनच जागतिक ऐक्यासाठीं राजकीय दृष्टचा जागतिक सरकारची गरज आपल्याला भासूं लागेल.

तेव्हां मानवजातीचें उच्चाटन न होऊं देण्यासाठीं आज जागतिक ऐक्याची— निदान एकाद्या विशिष्ट राजकीय संघटनेच्या रूपानें तरी अत्यन्त निकड आहे. अर्थातच हें एक उद्दिष्ट प्रत्येक माणसास सर्वोपरि महत्त्वाचें आहे. जर मानवजात तगूं शकली नाही तर मानवच अस्तित्वांत राहणार नाही. मग मानवाला जगावेंसें वाटेल असें जीवन प्रदान करण्याची संधीहि मानवाला उरणार नाही. आपल्याच हातानें आपला सर्वनाश होण्याचें जें नवें भय मानवजातीसमोर उभें आहे त्यांतूनच समग्र मानवजातीबद्दल आपल्या मनांत एक नवी आपुलकी स्फुरली पाहिजे. या विश्वभक्तीच्या भावनेला, एखाद्या विशिष्ट मानवसमूहाबद्दल परंपरेनें वाटणाऱ्या आपुलकीपेक्षा, आपल्या हृदयांत अग्रस्थान मिळालें पाहिजे. कारण सर्व मानवजातच जर नष्ट होणार असेल तर तिच्या शाखोपशाखा ओघानेच नष्ट होतील हें स्वाभाविक आहे. म्हणून मानवजातीचें ऐक्य हें आतां अति अगत्याचें आहे. आतांपर्यन्त ज्या संदर्भांत मी हें उद्दिष्ट आपल्यासमोर मांडलें त्यासाठीं वाहून घेण्यामागच्या प्रेरणा मात्र केवळ उपयुक्ततावादी आहेत. परन्तु मानवी मनाचा असा एक विशेष धर्म आहे कीं केवळ उपयुक्ततावाद, मग तो कितीहि उच्च किंवा सामान्य स्वरूपाचा असो, तो आपल्या कामास पुरेसा होत नाहीं. केवळ उपयुक्ततावाद इतका प्रभावी नाहीं कीं त्यामुळें कांहीं प्रचंड, अवघड गोष्टी साध्य करण्यास मनुष्याला स्फूर्ति मिळावी. आपण हे सारे केवळ उपयुक्ततेच्या दृष्टीनेंच साध्य केलें तर आध्यात्मिक दृष्टीनें आपण असंतुष्ट राहूं हें आणखी वेगळेंच.

मग मानवानें एक कुटुंब म्हणून एकत्र रहावें अशी प्रेरणा देणारा उपयुक्ततावादरहित असा मूलभूत हेतु कोणता ? मी वाचलेल्या एका नाटकांत हा हेतु फार चांगल्या रीतीने शब्दनिविष्ट केलेला आहे. आशियांतून येऊन

आफ्रिकेंत वसाहत करणाऱ्या एका कवीनें ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकांत लिहिलेल्या नाटकांतील ही ओळ आहे. त्या कवीनें आपलें सर्व आयुष्य मात्र रोममध्यें व्यतीत केलें आणि लॅटिन भाषेंत लेखन केलें. "मी मानव आहे, आणि जे मानवी असेल त्याची उपेक्षा मला करता येणार नाहीं." या लॅटिन कवीची मातृभाषा प्यूनिक किंवा फीनीशियन होती. आणि ही भाषा थेट हिब्रू भाषे-सारखी आहे. म्हणून मला मूळ हिब्रूंत लिहिलेल्या एका अनामिक इझ्रायली लेखकाच्या ओळीचीहि आठवण होत आहे. ती प्रसिद्ध ओळ म्हणजे एक आव्हानात्मक प्रश्न आहे. "मी काय माझ्या भावाचा रक्षक आहे ?" परमेश्वरानें जेंव्हा केनवर, आपला भाऊ आबेल याच्या खुनाचा आरोप ठेवला, तेव्हां केन ही पंक्ति आपल्या बचावासाठीं प्रथम उच्चारतो. जेनेसिसमध्यें सांगितलेल्या या कथेंतील प्रश्नाचें उत्तर प्रश्नांतच अभिव्यक्त झालें आहे. परमेश्वरानें या प्रश्नाचें होकारार्थी उत्तरच गृहीत धरलें; मग केनच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून त्यानें निकाल दिला व खुनाबद्दल शिक्षा सांगितली.

इथें आपल्याला ती निराळी उच्च प्रेरणा आढळते. ही ऐक्याची प्रेरणा कांहीं तात्पुरत्या उपयुक्ततेच्या विचारांतून निर्माण झालेली नाही. किंवा खऱ्या वस्तुस्थितीच्या मानानें अति निकडीच्या अथवा अति महत्त्वाच्या विचारांतून-सुद्धां निघालेली नाहीं. ही प्रेरणा अगदी पूर्णपणें वेगळ्या स्वरूपांत आपल्याला दिसत आहे. ही प्रेरणा स्वयंसिद्ध आहे. ती कशांतूनहि निर्माण झालेली नसून निरपेक्ष आणि म्हणूनच अपरिहार्यपणें कार्योन्मुख करणारी आहे. मानवी स्वभावाइतकीच ती पुरातन आहे आणि जोंवर मनुष्यप्राणी जिवंत आहे तोंवर ती प्रभावी राहील. आपण एकमेकांचे रक्षक आहोंत. आपले इतर बांधव ज्या गोष्टींशीं निगडित आहेत त्यांसंबंधीं आपण कधींहि बेपर्वा राहूं शकणार नाहीं, या सत्याची आपल्याला जाणीव आहे. केवळ कर्तव्य म्हणून नव्हें तर आंतरिक ऊर्मीनें आपण त्या सत्यानुसार वागूं. ज्या क्षणीं आपले मानवपूर्व वंशज मानवी अवस्थेप्रत पोंचले तेव्हांपासून आपल्यापैकीं प्रत्येकानें या अंतरीच्या ज्ञानदिव्याला न जुमानतां कमीजास्त घोर अशीं पापकृत्यें केलेलीं आहेत. जेनेसिस या ग्रंथाच्या ज्या अनामिक लेखकाचा मी उल्लेख केला त्यानें मानवाच्या दुसऱ्या पिढींतच पहिला खून घडून आला असा निर्देश केलेला आहे. अमानुष व आसुरी दुराचरण करून उरलेल्या सवडीच्या काळांतहि मनुष्ये एकमेकांशीं घातक बेपर्वाईनें वागत होतीं असा पुरावा इतिहासांत आढळतो. आजपर्यन्त नोंदलें गेलेलें कोणतेंहि घोर कर्म करण्याचें आपण आपल्याहि पिढींत सोडलेलें

नाहीं. आपल्यापैकीं जिवंत असलेल्या प्रत्येकावर या पापकृत्याचें दायित्व व्यक्तिशः थोड्याफार प्रमाणांत येतेंच येतें. एकाद्याचा अपराध मोठा नसेल. पण आपणच एकमेकांविरुद्ध केलेलीं हीं पापे आपल्या सदसद्विवेकबुद्धीला शल्यासारखी सलत आहेत. आपल्याला हें दिसत आहे आणि पटतहि आहे कीं मानव म्हणून आपण एकमेकांशीं एका कुटुंबांतील व्यक्तींप्रमाणें वागलें पाहिजे. भ्रातृभावाची खरी मूलभूत प्रेरणा हीच आहे.

मनुष्य कोणत्याहि विशिष्ट संस्कृतींत वाढलेला असो, भ्रातृत्वाची भावना त्याच्यांत जन्मतःच असते. भारतीय परंपरेंत वाढलेल्या लोकांची सहानुभूति अतिशय व्यापक स्वरूपाची झाली आहे. युगानुयुगापासून भारतांत हें प्रमेय सर्वमान्य झालें आहे कीं बंधुभाव हा केवळ मनुष्यांपुरताच मर्यादित नसून त्यांत सर्व सचेतन प्राण्यांचाहि समावेश होत असतो. भारताला भेट देणाऱ्या पाश्चात्य पाहुण्याच्या ध्यानीं प्रथम ही गोष्ट येते कीं पाश्चात्य देशांत वन्य पक्ष्यांना आणि प्राण्यांना माणसाचें जितकें भय वाटतें तितकें त्यांना इथें वाटत असावेंसें दिसत नाहीं. हें म्हणणें धाष्टर्याचें ठरणार नाहीं; कारण येथील पक्षी प्राणी अशा तऱ्हेने वावरतात कीं आपल्याला माणसापासून कांहीं दगा होईल असें त्यांच्या मनांतहि येत नसावें. या रानटी प्राण्यांनी व्यक्त केलेली ही विश्रब्धता त्यांच्या अनुभूतींतूनच निर्माण झाली असली पाहिजे. भारतांतील वन्य पशुपक्ष्यांना आलेला मानवाचा हा त्या मानानें सुखद असा अनुभव हेंच दर्शवितो, कीं भारतांतील माणसाची अशी श्रद्धा असते कीं बंधुत्वाचें हे बंध फक्त मानवापुरतेच मर्यादित नाहींत. मानवासकट पृथ्वीवरील सर्व जीवमात्राचें उगमस्थान समानच असावें या अलीकडच्या शास्त्रीय शोधापूर्वीं हजारों वर्षें भारतीयांनी सर्वभूतहितवाद व्यक्त केलेला आहे. शास्त्रानें एखादी गोष्ट सिद्ध होण्यापूर्वीं अंतःप्रेरणेनें ती अगोदरच सूचित केली जावी याचें हें एक मनोवेधक उदाहरण आहे.

या विशाल बंधुत्वभावनेचा उच्च कोटीचा आविष्कार भारतीय साहित्यांत सर्व काळीं झालेला आहे अशी माझी खात्री आहे. केवळ अज्ञानामुळें मला उदाहरणे देतां येत नाहींत. केवळ अज्ञानामुळेंच संस्कृत, पाली किंवा तमिळ भाषेंतील उदाहरणे सांगतां न आल्यानें मला माझा मुद्दा, हिब्रू किंवा लॅटिन भाषेंतील साहित्याचा उल्लेख करून स्पष्ट करावा लागला. जरी मला एखादे भारतीय भाषेंतलें वचन सांगता आलें नाहीं, तरी ज्याची जाणीव आपल्याला अंतर्यामीं, आपण आज तो प्रत्यक्षांत आचरीत नसतांनाहि, आहे अशा बन्धुत्वाच्या भावनेचा साक्षी असलेल्या एका भारतीयाचें नांव मी सांगू शकतो.

अशोक हा केवळ एक राजा म्हणूनच ख्यातनाम नाहीं. बरेवाईट कितीतरी राजे होऊन गेले. केवळ राजा म्हणून एखादी व्यक्ति कांहीं अविस्मरणीय होत नाहीं. अशोक या राजानें आपली व्यापक भ्रातृभावाची कल्पना प्रत्यक्ष आचरणांत आणली म्हणून तो प्रसिद्ध आहे. फार मोठ्या नीतिमत्तेचा महापुरुष म्हणून त्याची गणना होते ती योग्यच आहे. सार्वभौम सत्ता जशी आपल्या सजातीय मानवांना स्वतःचे बांधव समजून वागविण्याची अपूर्व संधि देते, तशी आपल्या सदसद्विवेकबुद्धीविरुद्ध वागण्याचा विलक्षण मोहहि ती निर्माण करते. मग आपली इच्छा असतांनाहि आपल्या अंतःप्रेरणेनुसार आचरण करणें आपल्यास जड जातें.

आपली राजकीय सत्ता अंमलात आणतांना अशोकानें आपल्या सदसद्विवेकबुद्धीचा आश्रय घेतला; यासाठीं त्याचें स्मरण सदैव होत राहील. अशोक अणुपूर्व युगांत होऊन गेला. साहजिकच आज जसे आपल्या पिढीला युद्धत्यागाचें धोरण पुकारावें लागतें, तसें कोणतेहि तांतडीचें उपयुक्ततावादी निमित्त लक्षांत घेऊन युद्धसंन्यास राष्ट्रीय धोरण म्हणून पुकारण्याची त्याला गरज नव्हती. त्या काळीं मानवाला प्राप्य असलेल्या सर्वाधिक घातक शस्त्रानें जरी युद्ध करण्याचा प्रसंग आला असता तरी अशोकाला आपल्या प्रजेचा सर्वनाश करून घेण्याचा धोका पत्करावा लागला नसता. मग सर्व मानवजात नष्ट होण्याची गोष्ट तर दूरच. कलिंगावरच्या स्वारीनंतर हिंदुस्थानची दक्षिण पट्टी आणि तिच्या लगतची लंका जरी अशोकानें पादाक्रांत करण्याचें ठरविलें असतें तरी त्याला भौतिक निर्धोकपणा सहज लाभला होता. तथाकथित 'नैसर्गिक सीमे' पर्यन्त जाऊन आपलें राज्य सर्व बाजूंनी 'नीटनेटकें' करण्याची संधि साधण्याचा मोह हा राज्यकर्त्यांना नेहमींच पडत असतो. अशा परिस्थितींत अशोकानें दिखाऊपणानें आपल्याशीं असा तर्क बांधला असता कीं आपण शांततेच्या प्रस्थापनेसाठीं म्हणूनच युद्धाचा मार्ग आचरीत आहोंत; राजकीय एकीकरणांतून निर्माण होणाऱ्या शांततेचा लाभ आपण या खंडप्राय देशाला अशा प्रकारें मिळवून देत आहोंत !

आपल्याला हें ज्ञातच आहे कीं अशा परम्परागत सहेतुक विचारसरणीनुसार कृति न करतां अशोकानें निराळाच मार्ग अवलंबिला. सशस्त्र चढाई करून कलिंग देश मौर्य साम्राज्यास जोडण्याचा गुन्हा आपण केला आहे या भावनेनें त्याच्या मनांत विलक्षण नैतिक क्षोभ उद्भवला. पुढें सर्व आयुष्यभर अशोक असाच क्षुब्ध राहिला. त्याच्या आक्रमक कृतीमुळें दुष्ट प्रवृत्ति आणि

यातना यांचा जो भयंकर प्रलय निर्माण झाला त्यानें तो भयचकित झाला. बंधुत्वाच्या भावनेशीं आपण द्रोह केला या जाणिवेनें स्वतःला पापी समजून त्यानें स्वतःच्याच केवळ नव्हें तर कुठल्याहि राजवंशाच्या परंपरागत धोरणांत क्रान्तिकारक बदल केला. साम्राज्यस्थापनेचें साधन म्हणून लढाईचा उपयोग करण्याची आसुरी राजनीति एकटया मौर्यांच्याच घराण्याचा विशेष होती असें नव्हें. आणि म्हणून तर अशोकाची परंपरा तोडून टाकण्याची ही कृति विशेष उल्लेखनीय वाटते. ज्याला ज्याला म्हणून साम्राज्यविस्ताराचें सामर्थ्य होतें अशा जगांतल्या प्रत्येक राज्यकर्त्यानें हें साधन हाताळलें आहे. अशोकाचा पितामह चंद्रगुप्त यास चेतविण्यास त्याच्यासमोर अलेक्झांडरचें वाईट उदाहरण होतें. आणि अलेक्झांडरपुढें सायरसच्या दुराचाराचा आदर्श होता. ख्रिस्तपूर्व तिसऱ्या सहस्रांतील इजिप्त आणि सुमेरियन साम्राज्यसंस्थापकांपर्यन्त ही प्रतिगामी कर्मशृंखला मागें पोंचलेली दिसते. अशोकानें आपलें उर्वरित जीवन आणि सर्व राजकीय सामर्थ्य आपल्या या पूर्वजांच्या चालीविरुद्ध आपली भातृभावना कृतींत उतरविण्यांत वेंचलें.

युद्ध या साधनाचा त्याग करतांना अशोकानें मनुष्यजातीच्या ऐक्याचें आपलें ध्येय सोडलें नाहीं. या पुढें हें ध्येय साध्य करण्यासाठीं त्यानें लष्करी पद्धतीचा वापर न करतां धर्मप्रसाराचा अवलंब केला. केवळ लंकेतच नव्हें तर आपल्या साम्राज्याच्या पश्चिम सीमेपलीकडे असणाऱ्या विस्तीर्ण प्रदेशांवर, जेथें अलेक्झांडरचे मॅसिडोनियांतील भांडखोर ग्रीक वारस लढाया करीत होते तेथेंहि अशोकानें मध्यस्थी केली. बुद्धधर्माची तत्त्वे आणि आचार यांच्या प्रसाराद्वारें अशोकानें आपल्या राज्यसत्तेबाहेरील प्रदेशांतहि मध्यस्थी केली. पृथ्वीतलावरील मनुष्यवस्तीच्या सीमा वगळून त्यानें इतर कोणत्याहि 'नैसर्गिक सीमा' स्वतःच्या सेवाभावप्रेरित हालचालींना बाधक मानल्या नाहीत. आज पूर्व आशियांत सर्वत्र बौद्ध संप्रदायांचें अनेक अनुयायी आहेत. बुद्धानुयायांतील हा आध्यात्मिक बंधुभाव जगांतील एकत्व प्रस्थापित करणाऱ्या महान शक्तींपैकीं एक आहे हें आजहि आढळून येतें. बुद्धानुयायांतील बंधुभावाची ही जाणीव आज अधिकाधिक तीव्र होत आहे असें आढळतें. भारतांतील सारनाथ आणि बुद्ध गया या दोन बुद्धधर्मीयांच्या पवित्र स्थळांना मी तीन वर्षांपूर्वी जी भेट दिली त्यावरून मला तरी असें वाटतें. बौद्ध धर्माच्या सार्वत्रिकतेची आणि चैतन्यमय प्रभावाची अनेक कारणे सांगतां येतील. परंतु अशोकाचें ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकांत झालेलें हृदयपरिवर्तन आणि त्यानुसार त्यानें

केलेलें आचरण हें त्यांपैकीं एक आहे हें खासच !

अशोकाच्या कृतीवरून हेंहि स्पष्ट होतें कीं भारतांत लोकांची बन्धुत्वाची भावना केवळ मानवापुरतीच मर्यादित ठेवलेली नव्हती. माझी माहिती जर बरोबर असेल तर अशोकानें राजघराण्यांतील शिकारीची प्रथा बन्द केली. आपल्या दरबारीं शाकाहारी खाणेंपिणें रूढ केलें आणि वर्षांतून छप्पन्न दिवस आपल्या प्रजाजनांनी कोणत्याहि प्राण्याची हत्या करूं नये असा कायदेशीर निर्बन्ध घातला. या विशाल सहानुभूतीच्या परंपरेची साक्ष भारतांत अशोकानंतर १८०० वर्षांनी सांपडते. मानवेतर प्राण्यांबद्दल बन्धुत्वभावना ओळखून ती व्यक्त करण्याची भारतीय परंपरा सम्राट अकबरानेंहि कायदे करून चालू ठेविली.

अकबराला असें वागण्याची प्रेरणा भारताच्या धार्मिक प्रभावांतून उत्पन्न झाली व ती मुळांत जैन धर्मामुळें झाली, बुद्ध धर्मामुळें नव्हें. कारण अकबरापूर्वीं ४०० वर्षे बौद्ध पंथानें भारतांतील शेवटलें आश्रयस्थान गमावलें होतें. कांही असलें तरी हा भारतीय प्रभाव होता. तुर्की अकबराच्या वृत्तीचें 'भारतीयीकरण' हें भारतांत येऊन राहणाऱ्या परदेशीयांना मंत्रमुग्ध करणाऱ्या भारतीय आध्यात्मिक परंपरेंतील सामर्थ्याचें एक उज्ज्वल उदाहरण आहे. तैमूरलंगाची अल्पकालीन स्वारी सोडली तर अकबराच्या पूर्वजांनी, खुद्द अकबराचा आजा बाबर यानें भारत जिंकीपर्यन्त कांहीं या भारतीय भूमीवर पाऊल टाकलें नाहीं. स्वतः बाबरानें आपल्या जीवनाचा इतका दीर्घ काळ खैबर खिंडीच्या पश्चिमेस व्यतीत केला होता कीं भारत ही स्वतःची मातृभूमि आहे असें त्याला कधींहि वाटणें शक्य नव्हतें. पुढें बाबराचा नातू अकबर हाहि एक मुसलमान म्हणूनच लहानाचा मोठा झाला. भारतांत उगम पावलेल्या धर्म आणि तत्त्वज्ञान यांच्या प्रणालींशी तुलना करतां इस्लाम धर्म हा ज्यू परंपरेंतील दुसऱ्या दोन धर्मांप्रमाणें परमतावर बहिष्कार घालणारा आणि असहिष्णु असा होता. परंतु भारतीय वृत्तींचा अकबरावर इतका खोल परिणाम झाला कीं त्यानें एक वेगळा धर्म स्वतःच स्थापन केला. सढळ मानसिक उदारपणाच्या दृष्टीनें पाहिलें तर अकबराचा दीन-इ-इलाही हा धर्मपंथ विशेषेंकरून भारतीय प्रवृत्तींशीं मिळता होता.

अशोकाप्रमाणें अकबरानेंहि प्राणिहत्या निषेधार्ह मानली तरी अशोकाप्रमाणें मानवी प्राण्याची हत्या घडविणाऱ्या युद्धाचा कांहीं त्यानें निषेध केला नाहीं. व्यावहारिक दृष्टीनें पाहिलें तर अशोकापेक्षा अकबराला असें करणे

खात्रीनें कठीण गेलें असतें. सुप्रतिष्ठित असें साम्राज्य अशोकाला वंशपरंपरेनें लाभलें होतें. आपल्या आज्यानें जिंकलेलें पण वडिलांनीं घालविलेलें साम्राज्य अकबराला पुनःस्थापित करावें लागलें. मानवी प्राण्याची हत्या घडविणाऱ्या युद्धाचा जर त्यानें निषेध केला असता तर त्याला आपल्या सिंहासनालाच मुकावें लागलें असतें. किंबहुना स्वतःचा प्राणहि गमावून बसावे लागतें. पण अशोक, अशोक म्हणून जन्मास न येतां यदृच्छेनें अकबराचें वेळीं जन्माला आला असता तरी त्यानें जें केलें तेंच केलें असतें असा तर्क करण्यास हरकत नाहीं.

आजच्या अणुयुगांत आपल्या मुत्सद्यांना जर कशाची गरज असेल तर ती नक्कीच अशोकाच्या वृत्तीची. ऐक्याशिवाय आपलें आतां चालणार नाहीं. आणि पुनः आपलें हें अपरिहार्य ईप्सित जबरदस्तीच्या मार्गानेंहि साध्य होणार नाहीं. मानवांचें ऐक्य घडवून आणावयाचें असेल तर जुलमाऐवजीं मन वळविणें हाच एकमेव मार्ग चालू घडीला आपल्याला अवलंबितां येईल. अणुयुगांत सामर्थ्याचा वापर करून एकता साधणार नाहीं तर फक्त आत्मनाश ओढवेल. जें धोरण अशोकानें केवळ आपल्या सदसद्विवेकबुद्धीच्या अंतःस्फूर्तीनें अवलंबिलें तेंच धोरण स्वीकारण्याची प्रेरणा आज सदसद्विवेकबुद्धीच्या जोडीला भीतीहि मानवाला देत आहे.

ठाणे. स्थळप्रत

: २ :

# जागतिक ऐक्याची चळवळ

माझ्या पहिल्या व्याख्यानांत, जागतिक ऐक्याची गरज किती तीव्रतेनें आपल्याला भासत आहे, आणि जर आपण हा प्रश्न वेळींच सोडविला नाहीं तर आपल्यापुढें आत्मनाशाचा भोग कसा वाढून ठेविलेला आहे हें स्पष्ट केलें. एका प्राचीन ग्रीक तत्त्वप्रणालीनुसार आणि भारतीय तत्त्वज्ञानाच्या अनेक प्रणालींनुसार, आज सारें विश्व प्रलयकाळाच्या उम्बरठ्यावर उभें आहे. यामुळें मानवजातीला भयावह परिस्थितींत जगावें लागत आहे. एपिक्युरियन तत्त्वज्ञ म्हणून माहीत असलेला रोमन कवि ल्युक्रेटियस याच्या शब्दांत सांगावयाचें तर, "मृत्यूचें द्वार बंद नाहीं; तें विक्राळपणें उघडें आहे. आणि आपल्याकडे कराल जबडा वासून पहात आहे." हें आपल्या परिचयाचें आहे कीं मानवी जीवनांत, मानवाच्या प्रत्यक्ष अस्तित्वाला जरी धोका उत्पन्न झाला असला, तरी त्याच्या गरजा आपोआप कधींच भागत नाहींत. साहजिकच आतां आपल्या अनिश्चित अशा भावी कालाचा विचार करणें मला प्राप्त आहे. आजच्या प्राप्त परिस्थितींत कोणत्या गोष्टी उपकारक आहेत आणि कोणत्या अपकारक आहेत यासंबंधीं अंधुक तर्क करण्यापलीकडे आज कोणीहि कांहीं करूं शकणार नाहीं.

या व्याख्यानाला जें शीर्षक मी दिलें आहे त्यालाच आव्हान देणारा प्रश्न प्रथम निर्माण होतो. "जागतिक ऐक्याची चळवळ" असें माझें शीर्षक आहे. पण यांतूनच ऐक्याची शंकास्पदता गृहीत धरली जात नाहीं काय ? आज परिस्थितीचा प्रवाह जागतिक ऐक्याच्या दिशेनें वाहण्याऐवजीं त्या ऐक्यापासून दूर आणि तोहि भर वेगानें जात नाहीं काय ?

उदाहरणार्थ, राजकीय कार्यक्षेत्रांत आज सहज डोळयांत भरण्याजोगी चळवळ कोणती दिसून येते ? साम्राज्ये लयाला जाऊन स्वतंत्र राष्ट्रांची संख्या वाढत चाललेली दिसून येत नाहीं काय ? १९४७ पासून या खंडप्राय देशांत घडलेल्या घटनेनें, या जगद्व्यापी केंद्रापसारी चळवळीचें उदाहरण मोठ्या नाट्यमय रीतीनें आपल्यापुढें ठेवलें आहे. मौर्य, गुप्त आणि मोंगल या राज्यकर्त्यांप्रमाणें इंग्रज सरकारनें या खंडतुल्य देशांत एका अंमलाखालीं

राजकीय एकता प्रस्थापित केली होती. किंबहुना इंग्रजी अमदानीच्या गेल्या शतकांत जे राजकीय ऐक्य साधण्यांत आलें तें मागील तीन वेळां साधलेल्या ऐक्यापेक्षां अधिक व्यापक स्वरूपाचें होतें. परंतु ब्रिटिशांनीं जेव्हां या देशांतलें आपलें पाऊल १९४७ मध्यें मागें घेतलें, तेव्हां इंग्रजांच्या भारतीय साम्राज्याच्या जागीं एक नव्हें तर तीन राष्ट्रें अस्तित्वांत आलीं. १९१८ मध्यें हॅप्सबर्ग राजसत्तेचे तुकडे होऊन पूर्व युरोपांत जशा अनैसर्गिक आणि कृत्रिम सीमा निर्माण झाल्या तशाच भारत आणि पाकिस्तान यांमध्यें निर्माण झालेल्या सीमा कृत्रिम आणि अनैसर्गिक आहेत. वादग्रस्त असा एकच काश्मीरचा प्रदेश आहे, आणि त्याबद्दल अजून कसलाहि समझोता झालेला नाहीं. आणि अलीकडे विवादातीत असलेल्या या भारतीय सीमांच्या आंतल्याच प्रदेशांत केंद्रापासून फुटून जाण्याची चळवळ सुरू झाली आहे. भारताचे जे घटक प्रांत आहेत त्यांचे प्रदेश शक्यतों स्थानिक भाषेच्या व्याप्तीशी व विस्ताराशी मिळतेजुळते रहावे ही दृष्टि ठेऊन भारताच्या कारभारविषयक आराखड्याची पुनर्रचना केली गेली आहे.

हा बदल देखील पूर्व युरोपीय वळणाचा आहे. पूर्व युरोपीय ध्येयवादाचें हें भारतांतील प्रत्यक्षीकरण आहे. त्याला "भाषिक राष्ट्रवाद" असें सहज संबोधतां येईल. या भाषिक राष्ट्रावादाच्या पुरस्कर्त्यांच्या समाधानासाठीं भारतांत राजकीय दृष्टीनें नवा नकाशा तयार केला गेला आहे. त्यांतूनच कटकटी निर्माण झाल्या आहेत. व गाऱ्हाणीहि उत्पन्न झालीं आहेत. पूर्व युरोपांत हेंच घडलें. हे दुर्दैवी परिणाम घडून येणे अटळ आहे. कोणी कितीहि प्रामाणिकपणें आणि काळजीपूर्वक विभागीय सीमा आंखल्या तरी कांहीं अल्पसंख्य गट भलत्या ठिकाणीं उरणारच. व्यापारी आणि औद्योगिक दृष्टीनें मोठ्या अशा शहरांत अशा प्रकारानें निर्माण झालेल्या समस्या अधिकच तीव्र होणार. मुंबई शहराचेंच उदाहरण घ्या. हें शहर ज्या भाषाविभागांत मोडते त्याबाहेरच्या कितीतरी दूरवरच्या भिन्नभिन्न भाषिक प्रदेशांतील लोक त्या अफाट शहराकडे आकृष्ट झाले आहेत. भाषिक दृष्टीनें होणारे भारताचें हें विवाद्य पुनर्विभाजन अपरिहार्य झालेलें आहे. सर्व जगांत जें घडत आहे तेंच इथें होत आहे. उदाहरणार्थ, ब्रह्मदेशांत देखील हें अल्प प्रमाणांवर घडतच आहे. हें सारें अपरिहार्य आहे; कारण लोकशाही कार्यान्वित राहण्यासाठीं आवश्यक असणाऱ्या बाबींपैकीं ती एक आहे. आणि आपल्या जमान्यांत तर लोकशाही संस्था एका देशामागून दुसऱ्या देशांत प्रस्थापित होत आहेत.

लोकशाही जर प्रभावी व्हावयाची असेल तर राजकीय घटक भाषिक क्षेत्राशी शक्य तितके समकक्ष झाले पाहिजेत; कारण आपणास असें आढळतें कीं जगांतील बहुतेक लोक आपली मातृभाषाच बोलूं शकतात आणि समजूं शकतात. जगांतील सबंध लोकसंख्येंत द्विभाषिक आणि बहुभाषिक लोक अजूनहि अतिशयच थोडे आहेत.

म्हणून आज, राजकीय दृष्टीनें चालू असलेली सध्याची क्षेत्रविभाजनाची लाट उसळत राहणें अपरिहार्य दिसत आहे. परंतु अपरिहार्यतेतून उत्पन्न होणारी फाटाफूट कांहीं क्षुल्लक लेखण्याजोगी नाहीं. अपरिहार्य असो वा नसो ही फाटाफूट आतां सनदशीर रूप घेऊं पहात आहे. म्हणून असें म्हणणें सत्याला सोडून होईल कां, कीं मानवजातीच्या ऐक्याबद्दल अधिक जागृति दाखविण्याचें दूरच राहिलें, उलट सर्व जगांतले लोक एकमेकांपासून अलग होण्यासंबंधी मात्र अधिक जागरूक दिसत आहेत ? परंतु ही जाणीव ही नुसती जाणीवच राहत नाहीं. तर या जाणिवेंतून राष्ट्रवादी प्रवृत्तीहि जागृत होतात. उदाहरणार्थ, भारत किंवा पाकिस्तान, ब्रह्मदेश आणि लंका या देशांमध्यें स्वातंत्र्यप्राप्तीचें पर्यवसान स्वतःच्या भाषिक समूहाबद्दल भावनात्मक ओढ वाढण्यांत झालेलें आहे. यूरोपमध्यें जरी अनेक कटकटींपैकीं ही एक जुनीच कटकट असली तरी आशियांत मात्र ती नव्यानेंच जन्माला आली आहे. भारतांत, विशेषतः मुंबईंत महाराष्ट्रीय आणि गुजराती लोकांत या भावनेचा पारा पुष्कळच वर चढला आहे. याहीपेक्षां अधिकच जोरदार कारणांमुळें काश्मीरविषयीं भारत आणि पाकिस्तान यांमध्यें त्याचप्रमाणें अति तीव्र कटुता निर्माण झाली आहे. भारत आणि चीन यांच्यांतील सीमा व तिबेटशीं झालेलें चीनचें वर्तन या संबंधीं भारत आणि चीन या देशांमध्येंहि परस्परांविरुद्ध तीव्र भावना निर्माण झाल्या आहेत.

आतां जर कोणी जागतिक ऐक्य घडून येण्याविषयीं उत्सुक असेल, आणि तेहि अशा श्रद्धेने कीं हें घडून आलें नाहीं तर जगाचा प्रलय हाच पर्याय उरतो, तर केवळ स्वप्नरंजनांत मशगूल राहून कोणाचेंहि चालणार नाहीं हें आपण ध्यानांत घेतलें पाहिजे. परस्परविरुद्ध दिशेनें वाहणाऱ्या या प्रवाहांची नीट दखल घेऊन प्रत्येकानें त्याची शक्ति पारखून घेतली पाहिजे. केंद्रापसारी आणि केंद्रानुमार्गी अशा प्रवृत्तींच्या सामर्थ्याचें योग्य तें मोजमाप करतां यावें म्हणून प्रत्येकानें हें केलेंच पाहिजे.

फाटाफुटीला कारणीभूत होणाऱ्या या शक्ती तरी कोणत्या आहेत ?

त्यांपैकीं एक तर आपण ओळखलीच. ती म्हणजे भाषिक स्वरूपाचा राष्ट्रवाद, जो लोकशाहीचा एक गौण परिणाम आहे. उलट आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिका येथील राष्ट्रवाद ही एक विरोधात्मक प्रतिक्रिया आहे. जुन्या जगांतील युरोपीय द्वीपकल्पाच्या अटलँटिक समुद्रकिनारीं असलेल्या सहा छोटचा देशांनीं प्रचंड अशा भूप्रदेशावर आणि लोकसंख्येच्या मोठमोठ्या हिश्शावर आधिपत्य गाजवावें या अलीकडच्या राजकीय अवस्थेला विरोधी अशी ही प्रतिक्रिया आहे. पृथ्वीला व्यापून टाकणारी वसाहतवादी युरोपीय साम्राज्ये म्हणजे एक विपरीत राजकीय घटना होती आणि ती आतां अल्पजीवीहि ठरली आहे. आपल्या डोळयांदेखत ही वसाहतवादी साम्राज्ये विलीन पावत आहेत. दुसऱ्या जागतिक युद्धानंतर त्यांचें विसर्जन झपाटयानें झालें. खरें सांगावयाचें तर जगाचा राजकीय नकाशा स्वाभाविक पूर्वस्थितीवर येत आहे.

जगांतील परिस्थिति स्वाभाविक पूर्वपदावर येत आहे याचा अर्थ इतकाच कीं पश्चिम युरोपीय वसाहतवादी युगांतल्या इतका प्रचंड मानवसमाज परकीय सत्तेखाली नांदत रहावा हें अस्वाभाविकच होतें. परंतु जग या अर्थानें मूळ पदावर येत असलें तरी पश्चिम युरोपीय साम्राज्ये स्थापन होण्यापूर्वीं जी स्थिति होती तिच्या मानानें पाहिलें तर सर्वार्थानें जग पूर्व स्थितीप्रत येत गेलेलें नाहीं. मानवजातीला आवश्यक असलेली राजकीय एकता तिला देण्याची कुवतच या साम्राज्यांपाशीं नव्हती. राजकीय विषमतेवर तीं उभारली असल्यामुळें वाळूच्या घरांसारखी त्यांची अवस्था होती. अशीं सहा साम्राज्ये एकमेकांशीं स्पर्धेच्या भावनेनें वागत होतीं हें आणखी वर ! या वसाहतवादी साम्राज्यांच्या शासनसंस्था, त्या साम्राज्यांप्रमाणेंच कोलमडून पडल्या तर त्यांत नवल नाहीं. परंतु हीं साम्राज्ये म्हणजे केवळ शासनसंस्था नव्हत्या तर सांस्कृतिक समागम, सांस्कृतिक देवाणघेवाण, सांस्कृतिक संगम वगैरे यांच्या द्वाराच होत. सांस्कृतिक दृष्टीनें पहातां, या विपरीत आणि अल्पजीवी व्यवस्थेचे परिणाम मात्र महत्त्वाचे असून ते चिरकाल टिकतील.

प्रचलित राष्ट्रवादाच्या अभावात्मक स्वरूपाकडून विधायक बाजूकडे जेव्हां आपलें लक्ष जातें तेव्हां ही गोष्ट स्पष्ट होते. परकीय सत्तेखालीं राहण्याच्या अनैसर्गिक राजकीय विकृतीविरुद्ध बंड करून उठण्याची नैसर्गिक आणि निरामय प्रवृत्ति ही त्या राष्ट्रवादाची अभावात्मक बाजू. त्याचबरोबर आधुनिक संस्कृतीबद्दल समान निष्ठा बाळगणाऱ्या जगांतील नव्या समाजांत प्रवेश

मिळविण्याची घडपड करणें हें त्या राष्ट्रवादाचें विधायक स्वरूप.

देशोदेशींच्या ऐतिहासिक संस्कृतींतील प्रमुख विशेष आत्मसात् करून ही नवी जागतिक संस्कृति प्रगत होत होत पुढे संपन्न होईल यांत संशय नाहीं. या नव्या जागतिक संस्कृतीचें आजचें जमा झालेलें मूलधन सुरुवातीला तरी एकाच विशिष्ट संस्कृतीकडून लाभलेलें दिसतें. ती म्हणजे पाश्चिमात्य संस्कृति होय. या घटनेचें ऐतिहासिक कारण स्पष्ट आहे. आधुनिक युगांत पश्चिमेकडील देशांनी मानवजातीला एकत्र आणण्यांत पुढाकार घेतलेला आहे. तेव्हां हें साहजिकच आहे कीं या नव्या जागतिक संस्कृतीचें कोंदण मुख्यत: पाश्चिमात्य घाटाचें असणार. परन्तु अधिक अर्थपूर्ण व म्हणूनच मौजेची गोष्ट अशी कीं आधुनिक संस्कृतीची गंगोत्री पश्चिमेंत असूनसुद्धां पश्चिमेतर देशांतील बहुसंख्य लोकांनी ती बिनदिक्कत आत्मसात् केली आहे. राजकीय पारतन्त्र्यांतून मुक्त झाल्याबरोबर, आपलें भविष्य स्वत: घडविण्यास स्वतंत्र झालेल्या जगांतील लोकांनी ही संस्कृति हेंच प्रमुख उद्दिष्ट, आपणहून आणि बुद्धया आज स्वीकारलेलें दिसतें. राजकीय दृष्टीनें पाहिलें, तर या स्वतंत्र झालेल्या लोकांचा राष्ट्रवाद पाश्चिमात्य राजकीय वर्चस्वाविरुद्ध उभा राहिलेला आहे. परन्तु पश्चिमेंतल्या राजकीय ध्येयप्रणालीसाठींच तो राष्ट्रवाद पाश्चिमात्यांच्या राजकीय उद्दिष्टांविरुद्ध रोखलेला दिसतो. ही पश्चिमेंतली राजकीय ध्येयप्रणालि (मी अर्थातच पाश्चिमात्य लोकशाहीबद्दल बोलत आहे; तिच्याशीं उग्रपणें प्रतिस्पर्धा करणाऱ्या पश्चिमी हुकूमशाहीबद्दल नाहीं) सर्व मानवांना समान अशा नीतितत्त्वांतूनच निर्माण झालेली आहे. आणि सांस्कृतिक पातळीवरील प्रयत्नांत याच तत्त्वांच्या नांवाखालीं स्वत:च्या सांस्कृतिक परंपरेंतील परस्पर-विसंगत असणाऱ्या घटकांविरुद्ध पश्चिमेतर देशांतील राष्ट्रीय चळवळींचा रोख आहे.

वस्तुत: पश्चिमेतर देशांतील प्रचलित क्रांति दुहेरी स्वरूपाची आहे. या दोन समकालिक क्रांत्यांपैकीं पश्चिमेनें प्रेरित केलेली, एतद्देशीय, जुनाट, वारसागत मतांविरुद्धच्या नैतिक क्रांतीपेक्षा, पाश्चिमात्य वर्चस्वाविरुद्ध झाली ती क्रान्ति सौम्य स्वरूपाची आणि उथळ आहे. नैतिक पातळीचा विचार केला तर नव्यानेंच स्वतंत्र झालेले लोक आपल्या परम्परागत जीवनपद्धतींत समूळ बदल करीत आहेत. हे बदल इतके आमूलाग्र आहेत कीं तसे बदल नुसते सूचित करण्याचें या देशांवर सत्ता गाजविणाऱ्या वसाहतवादी शासनांतील राज्यकर्त्यांना स्वप्नांतसुद्धां आलें नसतें. अशा प्रकारचा आपापल्या नैतिक आणि

सांस्कृतिक परंपरांचा त्याग ही या काळांतील फार मोठी उलथापालथ आहे. राजकीय क्रांति करण्याच्या मूळ प्रवृत्तीच्या विरुद्ध दिशेनें ही आमूलाग्र स्वरूपाची क्रान्ति मानवजातीला नेत आहे. जीवनांत राजकारणापेक्षां संस्कृतीचें महत्त्व अधिक आहे. माझी अशी कल्पना आहे कीं ऐक्य घडवून आणणारा हा नैतिक आणि सांस्कृतिक घडामोडींचा प्रवाह, मोडतोडीला कारणीभूत होणाऱ्या राजकीय घडामोडींच्या प्रवाहाहून सामर्थ्यशाली ठरेल.

राजकीय पातळीवर देखील, स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर, ऐक्यविषयक चळवळीनें आपला प्रभाव टिकविला आहे. एकाद्या परकीय राष्ट्राचें वर्चस्व झुगारून देण्यासाठीं झालेली क्रान्ति म्हणजे केंद्रीय सत्तेविरुद्ध चाललेली राजकीय चळवळ होय.परन्तु स्वतंत्रता ही कांही परस्परावलंबित्वाशीं विसंगत नसते. आणि म्हणून स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राष्ट्रांना परस्परांवर अवलंबून राहण्याची गरज भासूं लागली. ही नुसती गरजच नव्हे तर वस्तुस्थिति ठरत आहे. आपला कारभार स्वतंत्रपणें करूं पाहणाऱ्या राष्ट्राला जगांतील तणातणीच्या परिस्थितींत सर्व प्रकारच्या व्यावहारिक मदतीची आणि तज्ज्ञांच्या सल्ल्याची गरज भासूं लागते. आपला आपणच उद्धार कसा करावा हें शोधून काढण्यासाठीं लागणाऱ्या साहाय्याची गरज सर्वांत अधिक भासूं लागते. एक म्हणजे नव्यानेंच स्वतंत्र झालेलीं राष्ट्रें, आपल्या नवजात स्वातंत्र्याबद्दल अधिक हळवीं व जागरूक असतात. या स्वातंत्र्याचा उपमर्द किंवा त्यावरचें आक्रमण या बाबींत तीं राष्ट्रें डोळयांत तेल घालून जपत असतात. परंतु युनायटेड नेशन्सकडून आणि त्या संघटनेच्या शाखोपशाखांपासून सल्लामसलत आणि मदत मिळविण्याच्या मार्गांत त्यांची ही नैसर्गिक भावना आड आलेली नाहीं. पश्चिम युरोपीय वसाहतवादी साम्राज्यांच्या अस्तानंतर जगाच्या राजकीय शासनव्यवस्थेंत जी पोकळी निर्माण झाली, ती त्या साम्राज्यांनंतर प्रस्थापित झालेल्या राष्ट्रवादी शासनांनी पूर्णपणें भरून काढलेली नाहीं. ही पोकळी भरून काढण्याचें कार्य नव्या आंतरराष्ट्रीय संघटनांचें आहे. या संघटना आणि नवीं राष्ट्रवादी सरकारे एकमेकांच्या सहकार्यानें, पूर्वीच्या वसाहतवादी शासनांचें विधायक कार्य, आपापसांत करूं शकतील. आणि तीं हें कार्य अधिक विस्तृत प्रमाणांत व चांगल्या रीतीनें करूं शकतील; कारण पूर्वीच्या वसाहतवादी राज्यव्यवस्थेंत राजा आणि प्रजा यांमध्यें जो राजकीय झगडा असे तो आतां या देशांच्या आपसांतील सहकार्याच्या आड येणार नाहीं.

या नूतन आंतरराष्ट्रीय संघटनेच्या उपयुक्ततेची किंमत नव्यानें मुक्त झालेल्या देशांनी प्रथम जाणली. तौलनिक दृष्टचा अधिक संपन्न, सामर्थ्यशाली, अनुभवी आणि सामाजिक कार्याची तळमळ असलेले नागरिक जेथें आहेत अशा देशांनासुद्धां या संघटनेच्या उपयुक्ततेचें महत्त्व अधिकाधिक जाणवूं लागेल, अशी अटकळ सहज बांधतां येते. त्याचें कारण असें कीं अखिल मानवजातीच्या दृष्टीनें आणि पृथ्वीवरील समग्र साधनसंभाराच्या दृष्टीनें पाहिलें तर कोणतेंहि बलिष्ठ, संपन्न राष्ट्र देखील खुजें वाटू लागतें. आणि आजच्या तंत्रविज्ञानाच्या युगांत तर आपण म्हणतो कीं "अंतराचा अन्त" झालेला आहे; अशा स्थितींत मानवाचे सर्व प्रकारचे उद्योग राष्ट्रीय कक्षेपासून आंतरराष्ट्रीय कक्षेपर्यन्त पसरत असल्यास नवल नाहीं. आजच्या युगांत अखिल जग हेंच मानवाच्या कर्तृत्वाचें खरें खरें क्षेत्र बनलें आहे. अशा वेळीं अमेरिका किंवा रशिया यांसारख्या श्रेष्ठ राष्ट्रांना देखील परस्परावलंबित्व ही एक जीवनांतील आवश्यक गोष्ट वाटूं लागेल.

आजच्या, "अंतराचा अन्त" झालेल्या जगांत देखील प्रत्येक देशाला आपल्या कक्षेंत अत्यंत महत्त्वाचें कार्य करण्याची भूमिका वठविण्याचें काम उरतेंच. उदाहरणार्थ, नगरपालिकेचें कार्य हें स्थानिक लोकांच्याकडूनच केलें जाणार. गटारांची दुरुस्ती आणि त्या नीट वाहत्या ठेवण्याची खबरदारी हें क्षुल्लक पण महत्त्वाचें कार्य आहे. परंतु विश्वकुटुंबांतील घटक देशांना सांस्कृतिक कार्य करावयासहि वाव मिळेल. ह्या राष्ट्रदेवता आतां पूर्वीप्रमाणें आपल्या शत्रूंचे बळी घेत नसल्यामुळें तर या सांस्कृतिक कार्याला अधिकच महत्त्व येईल. मनुष्यजातीच्या संरक्षणासाठीं आपल्याला या देवतांचे अमोघ शस्त्र काढून घ्यावें लागेल. मला असें म्हणावयाचें आहे कीं या देशांचा युद्ध करण्याचा परम्परागत हक्क आपल्याला हिरावून घ्यावा लागेल. परंतु ह्याप्रमाणें शस्त्रास्त्रविहीन करतांना त्यांना अनाकर्षक बनवून चालणार नाहीं. या देशांना कदाचित पूर्वीपेक्षां अधिक रोमहर्षक भूमिकाहि बजवावी लागेल. जागतिक एकतेला त्यांच्याकडून वैविध्याची देणगी लाभेल. आणि एकात्मतेंतून विविधता लाभणें हा सुखी, निरायम जीवनाचा एक फार मोठा अपरिहार्य घटक मानला गेलेला आहे, हें सर्वश्रुत आहे.

जागतिक संघटनेच्या पातळीवरून पाहिलें तर एकसूत्रीकरण आणि समरूपता हीं एकतेसाठीं द्याव्या लागणाऱ्या मूल्याचा एक भाग होय. ज्यांचा उपयोग करणें आपल्याला परवडणार नाहीं अशा संहारक शस्त्रास्त्रांच्या

शोधामुळेंच केवळ नव्हें तर पूर्वीं ज्या एका प्रवृत्तीचा मी ऊहापोह केला त्यामुळेंहि हें मूल्य आपणाला द्यावेंच लागेल. ती प्रवृत्ति म्हणजे प्रमुख मानवी व्यापारांचा जागतिक प्रमाणावर व्याप वाढणें ही होय. तांत्रिक पातळीच्या उलट, नैतिक पातळीवरून बघतां जगाची एकता तितकी निराशामय न वाटतां स्फूर्तिदायकच ठरेल. सर्व मानवजातीबद्दलचा बन्धुभाव निश्चितपणें आध्यात्मिक उन्नतीची भावना निर्माण करील. कसेंहि झालें तरी ही नैतिक आणि तांत्रिक पातळयांवरील वांछनीय आणि अपरिहार्य असणारी एकता, सांस्कृतिक पातळीवरहि अखंड विविधतेच्या साहाय्यानें योग्य प्रमाणांत राखावी लागेल. आणि ही विविधता आणून देण्याचें खरें कार्य निरनिराळे देश करूं शकतील.

उदाहरणार्थ, भाषेचेंच क्षेत्र घ्या. जागतिक संघटनेंत आपण अशा अवस्थेप्रत पोंचलो आहोंत कीं जर कोणी आंतरराष्ट्रीय परिषदेंत भाग घेईल किंवा पदार्थ-शास्त्रावर एखादा ग्रंथ लिहील तर त्याला हें कार्य जागतिक असलेल्या दोन किंवा तीन भाषांपैकीं कोणत्या तरी भाषेंत करावें लागतें. जी भाषा अधिकाधिक प्रचलित आहे अशाच भाषेची बोधभाषा म्हणून त्याला निवड करावी लागते व अशा रीतीने बोधभाषेच्या निवडीवर मर्यादा पडतात. उलट-पक्षीं एखाद्या कवीला ही जगाची सर्वमान्य भाषा, त्याची मातृभाषाहि नसेल, तर कवितेचें माध्यम या नात्यानें मानवणार नाहीं. अभिजात भाषेंतून लिहिलेलीं महान काव्ये जगांत नाहीत असें नाहीं; तरी अशीं उदाहरणें तुरळकच. फ्रेंच किंवा जर्मन भाषा बोलणाऱ्या पाश्चिमात्यांनी, इ. स. १२व्या शतकांत लॅटिनमध्यें लिहिलेल्या कविता मला येथें आठवतात. या लॅटिन कवितांसारखीच संस्कृत भाषेंतहि काव्यरचना झाली असली पाहिजे. कसेंहि असलें तरी मातृ-भाषा हीच कवीची खरी नैसर्गिक अभिव्यक्तीची भाषा होय.

यावरून एवढेंच सूचित होतें कीं विश्वकुटुंबांत, सुशिक्षित लोकांना खूप मोठ्या संख्येनें द्वैभाषिक किंवा त्रैभाषिक व्हावें लागेल. नेदरलण्डमधील आणि स्वित्झरलंडमधील बहुतेक लोक तसें पाहिलें तर आजहि त्रैभाषिकच आहेत. बौद्धिक विकासाच्या दृष्टीनें एखाद्याची मातृभाषा जगाची किंवा एखाद्या प्रांताची बोधभाषा नसलेली अशी डच किंवा मलयाळमसारखी असणें हें श्रेयस्कर. जी शिक-ण्याची दुसऱ्या लोकांना गरज वाटत नाहीं अशी जर आपली मातृभाषा असेल तर मग स्वभाषेबरोबरच दुसऱ्या भाषा शिकून त्या भाषेंत वाचन आणि लेखन कर-ण्याची चालना मिळते. उलट सर्वपरिचित अशा भाषा मातृभाषा असणें हा एक प्रकारचा लंगडेपणाच होय. हिंदीभाषिक आणि इंग्रजीभाषिक यांचें असेंच होत

नाहीं काय ? आजच्या घडीला जगांत इंग्रजी बोलणारे आणि फ्रेंच बोलणारे लोक इतर भाषा शिकण्याच्या बाबतींत अत्यंत कमकुवत आहेत, हें सर्वश्रुत आहे. जन्मजात अशी बौद्धिक कुवत पाहिली तर इतर मानवजातीपेक्षा त्यांना ती कमी आहे असें नव्हें. पण स्वभाषेशिवाय दुसरी एकहि भाषा न शिकतां ते जगांत आपलें काम साधूं शकतात. साहजिकच मानवी स्वभावांतील आलस्यप्रवृत्तीला ते बळी पडतात. हिंदी भाषा जेव्हां भराभर अखिल भारतीय स्वरूपाच्या दर्जापर्यन्त विकसित होत जाईल, तेव्हां ज्यांची मूळची भाषा हिंदी आहे असे लोक याच प्रवृत्तीला बळी पडतील. इंग्रजीभाषिकांप्रमाणें हिंदीभाषिकांचें भविष्य-कालीन बौद्धिक जीवन कांहीं इतकें निराशामय असणार नाहीं; कारण जागतिक व्यवहारासाठीं त्यांना इंग्रजी, फ्रेंच किंवा रशियन भाषा शिकावीच लागेल. परंतु भविष्यकाळांत, द्राविडी भाषा बोलणाऱ्यांकडून, बौद्धिक क्षेत्रांतील पराक्रमांत आपल्यावर मात केली जाईल याची जाणीव हिंदीभाषि-कांना ठेवावी लागेल. याचें कारण असें कीं द्राविडभाषिक लोक नव्या दिल्लीं-तील कामासाठीं हिंदी भाषेवर प्रभुत्व मिळवतील, न्यूयार्क किंवा टोकियो येथें व्यापार करण्यासाठीं इंग्रजी आत्मसात् करतील आणि सायगाव, लिओपोल्दविल या स्थानीं व्यवहारार्थ ते फ्रेंच भाषा शिकतील.

आत्मनाशापासून स्वतःला वांचविण्यांत मानवजात यशस्वी होईल असें मला वाटतें आणि तसें घडलें तर राष्ट्रवादाकडे बघण्याचा आपला दृष्टिकोण आणि राष्ट्रवादाबद्दलचें आपलें धोरण आपणास पुनः एकदा पारखून घ्यावें लागेल. आज आपण विश्वकुटुंब निर्माण करण्याची धडपड करीत आहोंत. हा आपला काळाशी चाललेला झगडा आहे. या कार्यांत जर आपण अयशस्वी झालो किंवा यशस्वी होण्यास आपल्याला थोडा जरी विलंब झाला तरी चालणार नाहीं; कारण आपल्या डोक्यावर आत्मनाशाची तलवार सारखी लटकते आहे. राष्ट्र-वाद हा जागतिक ऐक्याच्या वाटेंतील फार मोठा अडथळा आहे. म्हणूनच जागतिक इतिहासाच्या आजच्या अध्यायाच्या दृष्टीनें राष्ट्रवाद हा मानवजातीचा पहिला कट्टर शत्रु आहे. आणि म्हणून आपलें या घडीचें उद्दिष्ट म्हणजे राष्ट्रवादाचा संकुचितपणा नाहींसा करून टाकणें हें होय. उलटपक्षीं, समजा आपण विश्वकुटुंब निश्चितपणें निर्माण करूं शकलो, तर मग त्या संघटनेची सत्ताहि वाढतच जाणार. मग साहजिकच विश्वसमाजांतील घटकराष्ट्रांच्या सत्तेलाहि मर्यादा पडणारच. या घटनेंत एक क्षण असा येईल कीं राष्ट्रवादाचा अभिमान कमी न करतां तो आपणास जागृत ठेवावा लागेल. कारण त्या

राष्ट्रवादामुळें घटक राष्ट्रांत पुरेशी शक्ति शिल्लक राहून आपापली उपयुक्त अशीं कार्यें तीं सुरळीतपणें करूं शकतील. जर या राष्ट्रांच्या नागरिकांना या कार्यांविषयीं कांहींच ममत्व वाटेनासें झालें, ते त्या कार्यासंबंधांत निष्काळजी राहिले, तर मग स्थानिक स्वयंशासनाबरोबर जगांतील देशोदेशींची विविधता नष्ट होईल. मग जगांतील या संपूर्ण केंद्रीकरणाचा आणि सार्वत्रिक समरूपतेचा परिणाम मानवी जीवनाला निःसत्त्व करण्यांत होऊन त्याला अवकळा येईल. असें झालें तर तें खरोखरीच शोचनीय होय. शेवटीं त्यामुळें ज्यांनी निर्णय घ्यावयाचे आणि उपक्रम करावयाचे अशा लोकाची संख्या अगदींच कमी होईल.

ऑगस्टस सीझरनें रोमच्या साम्राज्यांत शांतता प्रस्थापित केल्यानंतर ज्या घडामोडी झाल्या, त्या लक्षांत घेतल्यावर त्यांवरूनहा धोका चांगला स्पष्ट होतो. या अद्वितीय विधायक मुत्सद्देगिरीच्या लाभामुळें ग्रीस व रोम येथील समाजाला सर्वनाशाच्या जबड्यांतून बाहेर येतां आलें. आज आपण आधुनिक जगांत ज्यांना राष्ट्र असें संबोधतों त्यांसारख्या ग्रीकरोमन संस्कृतींतील घटक नगरराज्यांनी, आपापसांत सदैव यादवी करून, त्या संस्कृतीचा नाश केला. युद्ध करण्याची त्यांना सक्त मनाई होती. नेहमीं दुरुपयोग केला जाणारा व अखिल जगाची शांतता नष्ट करण्याचा त्यांचा परंपरागत हक्क तेवढा हिरावून घेऊन त्यांची पूर्वीची विशाल सत्ता अजून तशीच ठेवलेली होती. अधिकाधिक स्थानिक शासन आणि अत्यल्प स्वरूपाचें जागतिक शासन अशी अवस्था अजून निर्माण व्हावयाची होती. असें दोन स्तरांचे राजकीय शासन हा भरंवशाचा प्रयोग होता. परंतु त्याचें यश, तत्कालीन दोन निष्ठांत समतोलपणा कायम राहण्यावर अवलंबून होतें. जगभर पसरलेल्या रोमन साम्राज्याशीं पहिली निष्ठा ठेवणें आणि रोमच्या सार्वभौम सत्तेची घटक अशीं जी नगरराज्ये, त्यांपैकीं एकाशी इमानदारी राखणें. रोम येथें, शांततेच्या काळांत या दोन निष्ठांमधील सूक्ष्म समतोलाची संगति राखली गेली. सेंट पॉलचेंच उदाहरण घ्या. रोमन साम्राज्य सत्तेखालीं राहणारा एक प्रजाजन म्हणून त्याला अभिमान वाटे, तर त्याचें घरदार असलेल्या टारसस या नगरराज्याचेहि आपण नागरिक आहोत याचाहि त्याला अभिमान वाटे. हळूहळू रोमन साम्राज्यांतील रहिवाशांचे स्थानिक कारभारांतलें लक्ष उडून गेलें. स्थानिक शासनव्यवस्था कोलमडून पडली. मध्यवर्ति शासनाला तें कार्य आपल्या हातीं घ्यावें लागलें. याचा परिणाम असा झाला कीं मध्यवर्ती सत्ता डोईजड झाली. आणि परिणामीं रोमन साम्राज्याच्या

अध:पाताच्या आणि विनाशाच्या कारणांपैकीं हें एक मुख्य कारण ठरलें. आपलें स्वत:चें जागतिक शासन अजून पूर्णावस्थेस गेलें नाहीं तोपर्यन्त आपण या ऐतिहासिक दाखल्याची तूर्त उपेक्षा करूं शकूं. पण उद्यां जेव्हां आपलें जागतिक एकराष्ट्र यशस्वीपणें साकार होईल तेव्हां रोमच्या इतिहासांतील या प्रकरणाची आपण आठवण ठेवणें आपल्या दृष्टीनें शहाणपणाचें ठरेल.

सध्यां मध्यंतरीच्या काळांत एक महत्त्वाचें कार्य आपल्याला करावयाचें आहे. तें म्हणजे फाटाफुटीस कारणीभूत होणाऱ्या राष्ट्रवादी शक्तीचें नियंत्रण करणें आणि मानवी जीवनांतील जागतिक ऐक्याकडे नेणारी ऊर्मि बलशाली करणें. हें तांतडीनें करण्याचें कार्य अतिशय कठीण आहे. नैराश्याखालीं दवण्याचा मोहहि आपल्याला होण्याचा संभव आहे. मनाच्या अशा विकल अवस्थेंत, प्रचलित जागतिक इतिहासांतील घडामोडी डोळयांसमोर ठेवून, आपलें धैर्य आपल्यास पुन: प्राप्त करून घेतां येईल. भूतकालीन पार्श्वभूमीवरून जेव्हां आपण याकडे पाहूं तेव्हां असें आढळून येईल कीं जागतिक ऐक्याची चळवळ मानवी संस्कृतिइतकीच प्राचीन आहे. नैऋत्य आशियांतील अगदी प्रारंभीच्या संस्कृतीच्या उदयापासून गेली ५००० वर्षें या चळवळीची गति वाढतच आहे.

अगदी सुरुवातीच्या, सुमारें २५०० वर्षांपूर्वी उदय पावलेल्या एका श्रेष्ठ धर्मानें या जागतिक ऐक्याच्या चळवळीला फार मोठें उत्तेजन दिलें. या क्रांति-कारक धर्माचें अत्युच्च ध्येय असें होतें कीं मनुष्यमात्राचा योग परिपूर्ण अशा आध्यात्मिक तत्त्वाशी जुळवून आणावा अणि त्याच्याशीं सुसंवादी जीवन व्यतीत करण्यास साहाय्य करावें. हें जडातीत ध्येय गांठीत असताना, मनुष्यमात्रांचे परस्परांशीं संबंध कसे असावेत व त्यासाठीं कोणती संघटना करावी याचाहि विचार आनुषंगिक म्हणून या धर्मपंथांना करावा लागला. मनुष्य व परम आध्यात्मिक तत्त्व यांचें प्रत्यक्ष ऐक्य घडवून आणण्याचें एकदा निश्चित झालें कीं मग हें कार्य कोणत्याहि एका विशिष्ट स्थानिक समाजासाठीं विवक्षित असें राहूं शकत नाहीं. तिचें आवाहन अखिल जगतांतील सर्व मानवांना झालें पाहिजे, आणि मग हें कार्य तडीस नेण्यासाठीं धर्मसंस्थेला आपल्या खास अशा पद्धती शोधून, त्यासाठीं नव्या संस्था निर्माण करणें आवश्यक झालें असेल हें उघड आहे.

प्रचारशील धर्मांनी स्थापन केलेल्या सांप्रदायिक संघटना या जागतिक स्वरूपाच्या अग्रगामी मानवी संस्था होत. एकाच वेळीं समग्र मानवजातीस

आवाहन करण्याचे प्रथम प्रयोग या धर्मप्रचारकांचे होत. धार्मिक उपदेशकांनी शोधून काढलेल्या या प्रचारपद्धतीला राजकारणी पुढारी आणि व्यापारी यांनी आपल्या ताब्यांत आणिलें आणि आपल्या क्षुल्लक हेतूंकरतां तिला राबविलें. वास्तविक "प्रॉपगॅंडा" या कल्पनेचा शोधहि धर्मसंस्थानी लाविला हें खरें ! हें त्या शब्दावरूनच सिद्ध होतें. रोमन कॅथलिक ख्रिश्चनांच्या 'Congregatio de Propaganda Fide' या समितीच्या नांवातून "प्रॉपगॅंडा" हा शब्द निघाला. सर्व जगांत ख्रिस्ती धर्माच्या रोमन कॅथलिक पंथाचा प्रसार करण्या-साठीं रोम येथें या नांवाची एक स्थायी समिती स्थापिली गेली आहे. या प्रचारकलेचा, ती शोधून काढणाऱ्या धार्मिकांनी गैरवापर केलेला आहे; तसेंच धार्मिकेतर लोकांनींहि आपलीं उद्दिष्टे साधण्यासाठी प्रचारकला नागवून तिचा दुरुपयोग केला. परंतु कांही असलें तरी लोकशाहीच्या युगांत, विश्वकुटुंबाची निर्मिति करण्यासाठीं हव्या असलेल्या संघटनेचा, सामान्य जनसमूहाला आवाहन करण्याचें तंत्र हा एक अपरिहार्य असा भाग आहे. विश्वकुटुंबाची निर्मिति लोकशाही तत्त्वांवर करण्याची जबाबदारी आपल्या पिढीवर पडलेली आहे. सुदैवानें गेल्या २५०० वर्षांच्या कालावधींतील प्रचारकलेच्या वापरांतील व गैरवापरांतील संकलित अनुभव आपल्याला उपयोगी पडणार आहेत.

आपण दुसऱ्या एका दृष्टीनेंहि भाग्यवान आहोंत. अखिल मानवजातीचें ऐक्य साधण्याच्या साहसास हात घालणाऱ्या पहिल्याच पिढीचे लोक आपण नाहीं. उच्चतर धर्मांच्या प्रवर्तकांनी जागरूकपणें या ध्येयाचा पाठपुरावा केला. यांपैकीं निदान तीन धर्मांनी तरी आपल्या प्रभावाखाली अखिल मानवजात आणण्याचें ध्येय सातत्यानें ठेवलेलें दिसतें. हे धर्म म्हणजे बौद्ध, ख्रिस्ती आणि इस्लाम हे होत. यांपैकीं कोणीहि या घटकेपर्यन्त हें ध्येय गांठलेलें नाहीं. हे तीनहि धर्म आज एकत्र नांदत आहेत. त्यावरूनच सर्वांचें एकच उद्दिष्ट असून देखील, प्रत्येक धर्म तें साध्य करण्यास किती थिटा पडला हें चांगलें कळून येतें. सर्व जगाला एकधर्मी करण्याचें ध्येय साधलें नसलें तरी एकाहून अधिक खंडांत आपल्या धर्माचा प्रसार करण्यांत यांतला प्रत्येक धर्म यशस्वी झाला आहे. आधुनिक तंत्रविज्ञानानें "अंतराचा अन्त" होण्यासारखी परिस्थिति निर्माण करण्याच्या कितीतरी पूर्वी हें घडून आलें, हें आश्चर्य करण्यासारखें आहे. जागतिक ऐक्या-च्या साधनेंत निसर्गाच्या शक्ती योग्य कार्यासाठीं योजिण्यांत आजपर्यन्त आलेल्या यशामुळें आपणाला कार्यक्षम अशीं उपकरणे लाभली आहेत. पण त्याबरोबरच मानवाला दहशत वाटेल अशा प्रचंड भौतिक आपत्तीचीहि निर्मिति

झालेली आढळेल. उलट त्या उच्चतर धर्मांच्या प्रवर्तकांना अनुकूल वारे वाहण्यापलीकडे निसर्गाचें सामर्थ्य उपलब्ध झालें नव्हतें. पाळीव जनावरे आणि आपल्या मनगटांतील शक्ति यांच्या साहाय्यानें ते जमिनीवरील कामे करीत. दळणवळणाच्या प्राथमिक साधनांच्या साहाय्यानें देखील त्यांनी आपला संदेश जगाच्या कानाकोपऱ्यांत पोंचविला.

आज आपल्याला उपलब्ध असलेल्या दळणवळणाच्या आधुनिक साधनांवर प्रभुत्व नसतांना देखील त्या उच्चतर धर्मपंथांनी जगांतील मानवजातीला आपल्या धर्मांत आणण्याचें साहस अंगिकारिलें. आपल्या प्रयत्नांना चालना देणाऱ्या एका गोष्टीचें साहाय्य मात्र त्यांना सुरुवातीलाच लाभलें होतें. हें साहाय्य पूर्वी प्रस्थापित झालेल्या परन्तु अगदी निराळया प्रकारच्या संस्थांमुळे लाभलें. "जागतिक साम्राज्यें" अशा चुकीच्या नांवानें त्या संस्था ओळखल्या जात. वास्तविक त्या संस्था खरोखरी जगद्व्यापी स्वरूपाच्या नव्हत्या. धर्म-प्रवर्तकांचे धर्म जेवढ्या अर्थाने "जागतिक" होते तेवढ्याच अर्थानें हीं साम्राज्ये "जागतिक" होतीं. शब्दशः तीं "जागतिक साम्राज्यें" म्हणतां येण्यासारखीं नव्हतीं; तरी देखील फाटाफूट किंवा अराजकता यांना बळी न पडतां या साम्राज्यांनी विस्तृत अशा भूभागावर शांतता, सुव्यवस्था आणि सुराज्य—कांहीं ठिकाणीं तर किती तरी शतके—एकसारखें चालविलें; इतकेंच नव्हें तर त्यांच्या आधिपत्याखालीं असलेले जलमार्ग आणि स्थलमार्ग यांसाठी रक्षकदले स्थापून त्यांच्या विकासाचें धोरण त्यांनी आंखलें. समुद्रमार्गावरील बंदरे, रस्त्यांवरील पूल, विश्रामस्थाने आणि टपाल नेणारे घोडेस्वार यांमार्फत खूपच सुधारणा त्यांनी घडवून आणली.

ह्या प्रत्येक धर्मास संबंधित जागतिक साम्राज्यांतील उपलब्ध सुखसोयींचा फायदा आपल्या प्रचारकार्यासाठी केव्हां ना केव्हां करून घेतां आला. कॉन्स्टण्टाईन-च्या युगापूर्वी, ख्रिस्ती धर्माची आळीपाळीने उपेक्षा आणि छळ रोमच्या राज्या-धिकाऱ्यांकडून होत होता, तेव्हांहि रोमच्या साम्राज्यांतील उपलब्ध सोयी ख्रिस्ती धर्मप्रचारकांना इतक्या मोलाच्या वाटत होत्या कीं पॅलेस्टाईनमध्यें ख्रिस्ताच्या जन्मकालाच्या प्रारंभीं प्रभूचें साम्राज्य सर्वत्र व्हावें म्हणून प्रभूनेच असें योजिलें आहे कीं भूमध्यसमुद्राच्या कांठचे सर्व देश राजकीय दृष्टया एक व्हावेत, आणि हें कार्य रोमच्या आधिपत्याखालीं घडून यावें, अशी तर्कपद्धति ख्रिश्चन धर्म-मीमांसकांनी अंगीकारिली. तसें म्हटलें तर हें चित्र खुद्द रोमच्या राज्य-कर्त्यांनाहि दिसलें नव्हतें. रोमन साम्राज्यसंस्थापकांनी व इतर जागतिक

साम्राज्यवाद्यांनी ज्या राष्ट्रीय सोयी निर्माण केल्या त्या त्यांच्या स्वतःच्या उपयोगासाठीं होत्या. त्या कांहीं धर्मप्रचारकांच्या प्रसारास साहाय्य करण्यासाठीं निर्माण केल्या नव्हत्या. धर्मप्रचारकांच्या हालचालीं जेव्हां अधिकाऱ्यांच्या लक्षांत आल्या तेव्हां त्यांनी त्यांची गळचेपी केली आणि कांहीं वेळां तर त्यांना दडपूनहि टाकलें. कॉन्स्टण्टाईनपूर्व काळांतील आपापसांतील कलहाच्या वेळचें रोमच्या साम्राज्याचें धोरण ख्रिस्ती धर्माबाबत अशा प्रकारचें होतें. मुसलमानांनी निर्माण केलेली आणि त्यांच्याच आधिपत्याखालीं असलेली खिलाफत देखील जादा कर भरणाऱ्या बहुसंख्य मुस्लिमेतर प्रजेला धर्मांतरित करून घेण्यास उत्सुक नव्हती. धर्मांतर घडवून आणण्यापेक्षां हे जादा कर देणारे मुस्लिमेतर प्रजाजन त्यांना परवडत होते. ईराणी साम्राज्यवाद्यांची, झोरो-ॲस्ट्रियन आणि ज्यू या पंथांकडे पाहण्याची दृष्टि अधिक सहानुभूतिपूर्ण होती. अशोक, कनिष्क आणि कॉन्स्टण्टाईन अशा कमींत कमी तीन जागतिक सम्राटांनीं जागतिक अशा एका धर्माला आश्रय दिला व त्यांनी आपल्या साम्राज्यांतील सर्व साधनसामुग्रीचा उपयोग बुद्धचा त्याच्या प्रसारासाठीं केला आणि अशा तऱ्हेनें अमर कीर्ति संपादन केली. मौर्य साम्राज्याद्वारें अशोकानें बुद्ध धर्माची, कुशान साम्राज्याच्या साहाय्यानें कनिष्कानें महायान बौद्ध पंथाची आणि रोमच्या साम्राज्याचा उपयोग करून कॉन्स्टण्टाईननें ख्रिस्ती धर्माची सेवा केली.

म्हणून जागतिक साम्राज्यांनी या जागतिक धर्मांच्या प्रसारकार्यास हातभार लाविला तो कांहींच्या बाबतींत निर्हेतुक स्वरूपाचा आणि दुसऱ्या कांहींच्या संदर्भांत हेतुपुरस्सर असा होता. परंतु कांहीं असलें तरी या दोन तऱ्हांच्या संस्थांची परस्परांशी स्वाभाविक भागीदारी होती. त्याला कारण म्हणजे दोहोंतहि पुष्कळच महत्त्वाच्या समान कल्पना नांदत होत्या. जागतिक साम्राज्याची निर्मिति आणि जागतिक धर्माची स्थापना या दोहोंत साम्य होतें. तें असें कीं या दोनहि प्रयत्नांचें उद्दिष्ट होतें तें विश्वकुटुंबनिर्मितीचें. येणाऱ्या अरिष्टांची प्रतिक्रिया आणि त्या अरिष्टांतून बाहेर पडण्याचे विधायक प्रयत्न या दोन्हीं अंगांत त्यांच्यांत एकरूपता होती.

प्रारंभींच्या प्रादेशिक संस्कृतींना जें अकाली अपयश आलें तेंच हें अग्रगामी अरिष्ट होय. घरचे आपापसांतील झगडे हें ह्या अपयशाचें कारण होय. आणि या झगड्यांचें मूळ होतें एकतेच्या अभावांत. आजच्या संस्कृतींत आहे तद्वतच या पूर्व संस्कृतींतहि राजकीय पातळीवर स्वतंत्र देशांत दिसणारी स्थानिक

राजकीय स्वायत्तता असल्यानें विभक्तपणा होता. एकमेकांशीं युद्ध करण्याची या स्थानिक राज्यांना मोकळीक होती. आपापल्या स्थानिक स्वार्थांतून अपरिहार्यपणें जे तंटे-बखेडे उद्भवत ते यांना युद्धास प्रवृत्त करीत व हीं युद्धेहि अधिकाधिक संहारक रूप धारण करूं लागली. मालमत्तेच्या मोडतोडीपेक्षां नैतिक मूल्यांचा उच्छेद अधिक दूरगामी झाला. ही नैतिक घडी पुनः बसविणें कठिनतर झालें. हें संकट दूर करण्याकरतां जागतिक साम्राज्यस्थापनेचे हे जे प्रयत्न झाले तेहि या संकटाचें जें वरवरचें तात्कालिक मूळ होतें, त्याच पातळीवरचे होते. या भांडखोर स्थानिक राज्यांचा समूळ नाश करून किंवा त्यांना त्यांच्यातीलच कोणा एकाचे मांडलीक बनवून या साम्राज्यांनी शांतता प्रस्थापित करण्याचा यत्न केला. हीं राज्यें देखील इतर राज्यांशीं लढाया करीत करीत एकमेव विजेत्याच्या स्वरूपांत साम्राज्यपदास पोंहोचत. परन्तु जागतिक धर्मांनी योजिलेला उपाय यापेक्षां अधिक मूलगामी स्वरूपाचा होता. या विश्वधर्मांचे संस्थापक आणि प्रचारक यांनीं हें हेरलें होतें कीं या राज्यांच्या आपापसांतील संहारक राजकीय झगडयांचें मूळ नैतिक प्रश्नाशी निगडित झालेलें आहे; तेव्हां त्यावरचा परिणामकारक उपायही नैतिक स्वरूपाचाच हवा. म्हणून प्रत्येक स्त्रीपुरुषाची स्वयंपूर्ण अशा आध्यात्मिक तत्त्वाशी प्रत्यक्ष संगत घडवून आणून त्यांचें जीवन आणि हें तत्त्व यांमध्ये समरसता निर्माण करणें हा उपाय या धर्मसंस्थापकांनी व प्रचारकांनी शोधून काढला. सत्याचा साक्षात्कार आणि धार्मिक जीवन व्यतीत करण्याचो विधिविधाने यांसंबंधीं या सर्व धर्मांत एकवाक्यता नाहीं हें जरी आपल्याला ठाऊक आहे तरी ही गोष्ट निश्चित आहे कीं या आध्यात्मिक तत्त्वांचा शोध घेण्याची प्रवृत्ति सर्व धर्मांत समान दिसते.

हे जागतिक धर्म किंवा हीं जागतिक साम्राज्ये अखिल मानवजातीला व्यापून टाकणारें असें जागतिक कुटुंबाचें रूप कधींच प्राप्त करून घेऊं शकले नाहींत याचा उल्लेख मी केलेला आहेच. आज "अंतराचा अन्त" करून, सर्व जगाला अक्षरशः व्यापून टाकणारें असें विश्वकुटुंब निर्माण होण्याची व्यावहारिक शक्यता आणि तत्संबंधीची तीव्र गरज एकाच वेळीं आधुनिक तंत्रविज्ञानानें निर्माण केलेली आहे. आजच्या परिस्थितींत जागतिक ऐक्याशिवाय दुसरा कोणताहि मार्ग मानवजातीचे आत्मनाशापासून रक्षण करूं शकणार नाहीं. आपल्यासमोर असलेलें हें कार्य जितकें निकडीचें आहे तितकेंच तें कठीणहि आहे. म्हणून आपल्या पूर्वसूरींनी जें अनुभविलें त्यापासून कांहीं योग्य

बोध घेऊन आपण स्वतःच सूज्ञपणानें स्वतःचा मार्ग शोधण्यास लागलें पाहिजे.

यापासून शिकावयाची पहिली गोष्ट स्पष्ट आहे असें मला वाटतें. आजच्या अणुयुगांत कोणत्याहि पातळीवरून जगाचें ऐक्य साधावयाचें असेल तर पूर्वीची जागतिक साम्राज्याच्या सर्व संस्थापकांनी योजिलेली "लष्करी" पद्धति वापरून चालणार नाहीं. धनुष्यबाणांनी लढण्याच्या काळींहि युद्ध आणि जिगीषा यांच्या साहाय्यानें जगाचे राजकीय ऐक्य साधण्यास नैतिक दृष्टचा आणि साधनदृष्टचाहि फार जबर मूल्य देणें भाग पडत असें. प्रत्येक वेळीं याच लष्करशाहीच्या बळावर तथाकथित जागतिक साम्राज्याच्या त्या मानानें तोकडचा जगावर शांतता लादली गेली. या घटनेंत कर्त्याभोक्त्या तत्कालीन समाजाला युद्धाच्या रानटी दिव्यांतून जावें लागलें आणि स्वतःचें कधींहि न भरून येणारें नुकसान सोसावें लागलें. मात्र अणुयुगांत जर कोणी सामर्थ्याच्या बळावर मानवजातीचें ऐक्य साधण्याचा यत्न करूं पाहील, तर ऐक्याऐवजीं, अधिक सबळ कारणांनी, आत्मनाशच त्याच्या कपाळीं येईल. म्हणून आज केवळ राजकीय दृष्टीनें सुद्धा या ऐक्याचा व्यावहारिक मार्ग कोणता असेल तर तो म्हणजे धर्मप्रवर्तकांनी अनुसरलेला, मनें वळविण्याचा मार्ग होय. आज आपलीं राजकीय उद्दिष्टे लोकशाही स्वरूपाची आहेत. आपल्या समाजाचा विस्तार प्रचंड आहे. म्हणून लोकांची मनें वळविण्यासाठीं सामुदायिक आवाहनाचें तंत्रच योजावें लागेल. त्यालाच आपण प्रचार म्हणतों. आवाहनाच्या या तंत्राचा सहज गैरवापर होण्यासारखा आहे. म्हणून अत्यंत दक्षतेनें आणि न्याय्य बुद्धीने तें हाताळावें लागेल. परन्तु अयोग्य प्रचारांतून निर्माण होणारा धोका, अणुयुद्धांतून निर्माण होणाऱ्या संकटापेक्षा किती तरी क्षुल्लक आहे.

जागतिक धर्म आणि जागतिक साम्राज्ये जरी खऱ्या अर्थानें "जागतिक" पदवीपर्यन्त पोंचूं शकलीं नाहींत तरी त्यांच्या पुरस्कर्त्यांना आणि त्यांतील प्रजेला व्यक्तिगत दृष्टीनें तीं तशीं दिसावींत आणि वाटावींत इतकीं जगद्व्यापी ती शब्दशः झालीं होतीं. जरी ते एकत्र व एका वेळीं अस्तित्वांत होते तरीहि हिंदु, बौद्ध, इस्लाम, आणि ख्रिश्चन हे धर्म त्या त्या लोकांना जागतिक स्वरूपाचेच वाटत होते. चिनी लोकांना आपलें साम्राज्य म्हणजे परमेश्वरानें निर्माण केलेलें अखिल जग वाटे तर त्याच वेळीं रोमच्या प्रजाजनांनाहि आपलें साम्राज्य म्हणजेच मनुष्यवस्ती असलेलें सर्व जग असें वाटे. जरी पृथ्वीवर हीं दोन्हीं साम्राज्ये एकाच काळीं नांदत होतीं तरी व्यक्तिनिष्ठ दृष्टीनें तीं जागतिक साम्राज्ये होतीं. जरी तीं साम्राज्ये सर्व जगाला व्यापून टाकणारीं

आहेत असा समज होता तरी सुमारें २५० वर्षें, क्वचित जो एखादा प्रासंगिक सम्पर्क एकमेकांच्या सीमारेषांपुरताच झाला तो वगळल्यास कोणताहि दुसरा निकटचा संबंध न येतां तीं साम्राज्ये एकाच वेळीं अस्तित्वांत होतीं. आपण एका विश्वकुटुंबांतील घटक आहोंत अशी जी प्रामाणिक भावना या जागतिक साम्राज्यांतील प्रजेला आणि जागतिक धर्मांच्या पुरस्कर्त्यांना वाटत होती, आणि तशी अनुभूति निर्माण करण्याचें कार्य ज्या भावनेनें केलें तिचा आपण मानसशास्त्रीय दृष्टीनें अभ्यास करणें अगत्याचें आहे. भविष्यकाळीं, आपण एका संघटित मानवी कुटुंबांतील एक व्यक्ति आहोंत ही कल्पना कशी काय वाटेल, याचें गमक आपल्याला या ठिकाणीं अनुभविण्यास मिळतें. आणि या आपल्या भविष्यकालीन परिस्थितीचें पूर्वदर्शन व्यावहारिक दृष्टीनेंहि आपल्याला उपयुक्त ठरणारें आहे. शब्दशः जागतिक अशा ऐक्याचें उद्दिष्ट, जर केव्हां तरी आपण साध्य करूं शकलों, तर त्यावेळीं तें आपल्या कांहीं समस्यांचा उलगडा करील. पण हा उलगडा होत असतांनाच त्यांतूनच नव्या समस्या निश्चित निर्माण होतील. या भविष्यकालीन प्रश्नावर आपल्या पूर्वजांच्या अनुभवाचा प्रकाश पडून त्याचा आपल्या हिताच्या दृष्टीनें उपयोग होईल.

प्रारंभीच्या संस्कृतींना अरिष्टे निर्माण होऊन जें अपयश आलें तें भरून काढण्यासाठीं जागतिक साम्राज्ये आणि जागतिक धर्म स्थापण्याचे प्रयत्न झाले. सामाजिक अरिष्टे दूर करण्याचे हे उपाय म्हणजे मानवाच्या एकीकरणाच्या प्रगतींतील महत्त्वाचे असे दोन टप्पे होत. परंतु संस्कृतीच्या विनाशामुळेंच केवळ मानवजात ऐक्याच्या कल्पनेकडे वळली असें नाहीं. या संस्कृतीचा पूर्वोदय ही या एकीकरणाच्या क्रियेतील पहिली पायरी. त्या संस्कृतीच्या विनाशामुळें मानवजातीच्या एकीकरणाच्या कल्पनेला आणखी पुढची चालना मिळाली.

मला तर असें म्हणणें योग्य वाटतें कीं संस्कृतीच्या प्रस्थापनेपासून आपसांतील फूट हें मानवानें आपल्यावर ओढवून घेतलेल्या सर्व अरिष्टांचें मूळ कारण आहे. स्थानिक गोष्टींकडे असलेला आपला दुर्दम्य ओढा, उदाहरणार्थ, स्थानिक जमातीबद्दल आपणास वाटणारी अपूर्व निष्ठा हें या फाटाफुटीचें कारण आहे. पूर्वीपेक्षांहि ऐक्याची तीव्र गरज जरी आज सर्वांना भासत असली तरी हा मुख्य अडथळा ऐक्याच्या आड आहेच. सुमारें ५००० वर्षांमागे उदय पावलेल्या, अतिप्राचीन संस्कृतीच्या पूर्वीच्या युगांत ज्या परिस्थितींत मानव-जातींतील प्रगत असा वर्ग राहत होता, त्या परिस्थितीचे दुराग्रही आणि भयानक अवशेष म्हणजेच स्थानिक गोष्टींबद्दल वाटणारी ही अमर्याद निष्ठा होय.

मानवी जीवनांतील आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रांत क्रांतिकारक ठरलेला असा शोध म्हणजे शेतीचा होय. आणि या शेतीमुळें असा परिणाम झाला कीं स्त्री परडयाला आणि पुरुष भातखाचराला बांधला गेला. शेतीचें युगापूर्वी आजच्या कामगारांप्रमाणें अन्न शोधणारे लोक आणि शिकारी लोक, तुलनेनें पहातां, असल्या स्थानिक ममतेच्या भावनेपासून मुक्त होते. ज्यावर त्यांचा चरितार्थ चालतो त्या कामाच्या स्वरूपामुळेंच शेतकरी बांधील राहिलेला असतो. शेतकऱ्याचें सारें जग म्हणजे स्थानिक ग्रामीण समाज होय हें तुम्हाला चांगलें ठाऊक आहे. शेतकऱ्याचें क्षितिज या समाजजीवनानें सीमित केलेलें असतें. संस्कृतीच्या इतिहासांतील स्थानिक समाज म्हणजे खेडेगांवांतील समाज होत. कालावधीनंतर जरी हे समाज आजच्या भारत, चीन, रशिया आणि अमेरिका या देशांइतक्या व्यापक मानाचे झाले तरी त्या समाजांतील नागरिकाची मनोवृत्ति अजून शेतकऱ्याची मनोवृत्तीच राहिली.

संस्कृति म्हणजे असलीं स्थानिक पाळेमुळे खणून काढणें जेणेंकरून मनुष्यप्राणी ऐक्यसाधनेसाठीं मुक्त व्हावा; व हें ऐक्यहि असें कीं त्यानें आपल्या कक्षेंत अखिल मानवजातीस न घेतल्यास तेंच संकटास बळी पडावें. रॉबर्ट रेडफील्ड हा अमेरिकेंतील प्रमुख मानववंशशास्त्रज्ञ म्हणतो कीं, "संस्कृति म्हणजे मूलोच्छेदन." आणि हें खरोखर सत्य आहे. आजच्या माहितीप्रमाणें सर्वांत प्राचीन अशा ज्ञात शहराची, जार्डन व्हॅलीमधील जेरिको नगराची स्थापना ही शेतकरी वर्ग नष्टमूळ करण्याच्या कार्यांतील पहिला टप्पा म्हणून समजली जाते. तेव्हांपासून पूर्वीचे सर्वच मुळासकट उखडून टाकणारी नागरी-करणाची प्रक्रिया झपाटयानें वाढत गेलेली आहे. आणि आज तर वस्ती करण्यास योग्य असलेल्या पृथ्वीवरील सर्व भागाचें सलग अशा एका शहरांत रूपांतर होत असल्याचें दिसतें. सर्व प्रकारचे उद्योग करण्यांत गुंतलेल्या मानव-समूहांत शेतकीचा व्यवसाय करणारे लोक संख्येनें सर्वांत अधिक आहेत. परंतु आतां शेतकरी हा कांहीं केवळ एक विशिष्ट कामकरी म्हणून उरलेला नसून तोहि एक यंत्र चालविणारा औद्योगिक कामगार झाला आहे. कारखान्यांतील स्थिर यंत्र चालविणारा तो कामगार, अशी स्थिति राहिली नसून आज हवेंत, पाण्यावर किंवा जमिनीवर यांत्रिक वाहन चालविणारा तो कामगार असें मानलें जातें. तेव्हां शेती करण्याच्या शोधामुळें तात्पुरती स्थिर झालेली मानवजात आतां पुनः एकदा पुढें चालू लागली आहे. मानवजातीची हीं पावले जागतिक ऐक्याच्या दिशेनें पडत आहेत. आतांपर्यन्त कमींत कमी पांच

हजार वर्षे तरी आपण या उद्दिष्टाच्या दिशेनें जात आहोंत. तरीहि आपली सामाजिक मनोवृत्ति मात्र नव-अश्मयुगांतीलच आहे. एकमेकांपासून अलग असलेल्या, शेती करणाऱ्या ग्रामीण समाजाचे आपण घटक आहोंत असें मानून जणूं आपण वागत आहोंत.

स्वयंकेंद्रित वृत्ति या मानवाच्या मूलभूत दोषाबरोबरच स्थानिक समाजाबद्दल वाटणाऱ्या नव-अश्मयुगीन आपुलकीचे कालविसंवादी अवशेष हे संस्कृतीवर कोसळणाऱ्या अरिष्टाचें एक प्रमुख कारण आहे असें म्हणावेंसें वाटतें. आपण आतां अणुयुगांत प्रवेश केलेला आहे. साहजिकच आपुलकीची ही कालविसंवादी भावना आणि विचार करण्याची तऱ्हा सर्वांना विघातक ठरत आहे. ऐक्य किंवा आत्मनाश या दोहोंतूनच मानवजातीला एक गोष्ट निवडावी लागेल. हा गंभीर प्रश्न इतःपर आपण टाळूं शकणार नाहीं. जगावयाचें कीं मरावयाचें याचें उत्तर आपल्याला द्यावेंच लागेल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५८०१ वि:
क्रमांक २५१८ नों. दि. २५-६-८४



## जागतिक ऐक्यास भारताचें साहाय्य

आजच्या तिसऱ्या आणि अखेरच्या व्याख्यानाचा विषय, माझ्यासारख्या परदेशीयाच्या दृष्टीनें नाजुक स्वरूपाचा आहे. मला ह्या विषयाचा प्रपंच करावा लागत आहे कारण माझ्या विषयाचा तो एक अपरिहार्य असा भाग आहे. तरी आपल्या हातून अविचार तर होणार नाहींना ही भावना मला सतत घेरीत राहील. ज्या गोष्टीची आंतली बाजू माझ्या श्रोत्यांना चांगलीच माहीत आहे त्याचा मी फक्त दुरून आढावा घेणार आहे. तुमचे वैयक्तिक आणि राष्ट्रासंबंधीचे अनुभव यांशी या गोष्टी निगडित झालेल्या आहेत. त्यांपैकीं कांहीं महत्त्वाच्या आणि वादग्रस्त स्वरूपाच्या आहेत. अर्थात या गोष्टींनी लोकांच्या भावना तीव्र रूपांत व्यक्त होणेंहि साहजिक आहे. तेव्हां आज श्रोतृगणासमोर बोलतांना, मला पूर्वीपेक्षां अधिक भय वाटतें आहे.

मला तीन मुद्यांचा विचार करावयाचा आहे. ते मुद्दे अगदी सहज सुचण्यासारखे आहेत, पण म्हणून ते विचारार्ह नाहींत असें नाहीं. आज ज्या ठिकाणीं इराक वसलेला आहे त्या आपल्या मूळच्या जन्मस्थलापासून जेव्हां संस्कृतीचे वारे पूर्वपश्चिमेकडे वाहूं लागले, तेव्हांपासून तो आजतागायत जगांत भारतानें मोक्याची जागा विभूषित केलेली आहे. हा माझा पहिला मुद्दा; माझा दुसरा मुद्दा असा कीं भारत हा आजच्या अखिल जगताचें जणू प्रतीक आहे. अखिल मानवजातीपुढें उभ्या असलेल्या गंभीर समस्यांपैकीं कांहीं भारतांतहि ठळकपणें दिसून येतात. भारताचे राष्ट्रीय प्रश्न म्हणून भारतीय जनता आणि भारत सरकार त्यांचा परिहार करण्याचा प्रयत्न करीत आहेत. माझा तिसरा मुद्दा असा कीं भारतांत जीवनाकडे पहाण्याची एक विशिष्ट वृत्ति आहे; मानवी घडामोडींचें निर्देशन करण्याचा एक विशेष मार्ग भारतासमोर आहे. यामुळें केवळ भारतांतीलच नव्हें तर समस्त जगापुढील प्रश्न सुटण्यास मदत होईल. या मुद्यांचा आता मी क्रमानें विचार करतो.

भारत मोक्याच्या जागीं आहे हें नुसतें सांगितलें तरी पुरे. वस्तुस्थिति स्पष्ट दिसते आहे. या गोष्टीचा उल्लेख पुरेसा आहे; ती प्रमाणांनी सिद्ध करण्याची गरज नाहीं. ईशान्येकडील जपानपासून तो दूरवर वायव्येकडील

हजार वर्षे तरी आपण या उद्दिष्टाच्या दिशेनें जात आहोंत. तरीहि आपली सामाजिक मनोवृत्ति मात्र नव-अश्मयुगांतीलच आहे. एकमेकांपासून अलग असलेल्या, शेती करणाऱ्या ग्रामीण समाजाचे आपण घटक आहोंत असें मानून जणूं आपण वागत आहोंत.

स्वयंकेंद्रित वृत्ति या मानवाच्या मूलभूत दोषाबरोबरच स्थानिक समाजा-बद्दल वाटणाऱ्या नव-अश्मयुगीन आपुलकीचे कालविसंवादी अवशेष हे संस्कृतीवर कोसळणाऱ्या अरिष्टाचें एक प्रमुख कारण आहे असें म्हणावेंसें वाटतें. आपण आतां अणुयुगांत प्रवेश केलेला आहे. साहजिकच आपुलकीची ही कालविसंवादी भावना आणि विचार करण्याची तऱ्हा सर्वांना विघातक ठरत आहे. ऐक्य किंवा आत्मनाश या दोहोंतूनच मानवजातीला एक गोष्ट निवडावी लागेल. हा गंभीर प्रश्न इतःपर आपण टाळूं शकणार नाहीं. जगावयाचें कीं मरावयाचें याचें उत्तर आपल्याला द्यावेंच लागेल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५८०९ वि: [illegible]
क्रमांक २५१५ नों दि २५-१-६४



# जागतिक ऐक्यास भारताचें साहाय्य

आजच्या तिसऱ्या आणि अखेरच्या व्याख्यानाचा विषय, माझ्यासारख्या परदेशीयाच्या दृष्टीनें नाजुक स्वरूपाचा आहे. मला ह्या विषयाचा प्रपंच करावा लागत आहे कारण माझ्या विषयाचा तो एक अपरिहार्य असा भाग आहे. तरी आपल्या हातून अविचार तर होणार नाहींना ही भावना मला सतत घेरीत राहील. ज्या गोष्टीची आंतली बाजू माझ्या श्रोत्यांना चांगलीच माहीत आहे त्याचा मी फक्त दुरून आढावा घेणार आहे. तुमचे वैयक्तिक आणि राष्ट्रासंबंधीचे अनुभव यांशी या गोष्टी निगडित झालेल्या आहेत. त्यांपैकीं कांहीं महत्त्वाच्या आणि वादग्रस्त स्वरूपाच्या आहेत. अर्थात या गोष्टींनी लोकांच्या भावना तीव्र रूपांत व्यक्त होणेंहि साहजिक आहे. तेव्हां आज श्रोतृगणासमोर बोलतांना, मला पूर्वीपेक्षां अधिक भय वाटतें आहे.

मला तीन मुद्यांचा विचार करावयाचा आहे. ते मुद्दे अगदी सहज सुचण्यासारखे आहेत, पण म्हणून ते विचारार्ह नाहींत असें नाहीं. आज ज्या ठिकाणीं इराक वसलेला आहे त्या आपल्या मूळच्या जन्मस्थलापासून जेव्हां संस्कृतीचे वारे पूर्वपश्चिमेकडे वाहूं लागले, तेव्हांपासून तो आजतागायत जगांत भारतानें मोक्याची जागा विभूषित केलेली आहे. हा माझा पहिला मुद्दा; माझा दुसरा मुद्दा असा कीं भारत हा आजच्या अखिल जगताचें जणू प्रतीक आहे. अखिल मानवजातीपुढें उभ्या असलेल्या गंभीर समस्यांपैकीं कांहीं भारतांतहि ठळकपणें दिसून येतात. भारताचे राष्ट्रीय प्रश्न म्हणून भारतीय जनता आणि भारत सरकार त्यांचा परिहार करण्याचा प्रयत्न करीत आहेत. माझा तिसरा मुद्दा असा कीं भारतांत जीवनाकडे पहाण्याची एक विशिष्ट वृत्ति आहे; मानवी घडामोडींचें निर्देशन करण्याचा एक विशेष मार्ग भारतासमोर आहे. यामुळें केवळ भारतांतीलच नव्हें तर समस्त जगापुढील प्रश्न सुटण्यास मदत होईल. या मुद्यांचा आता मी क्रमानें विचार करतो.

भारत मोक्याच्या जागीं आहे हें नुसतें सांगितलें तरी पुरे. वस्तुस्थिति स्पष्ट दिसते आहे. या गोष्टीचा उल्लेख पुरेसा आहे; ती प्रमाणांनी सिद्ध करण्याची गरज नाहीं. ईशान्येकडील जपानपासून तो दूरवर वायव्येकडील

आयर्लंडपर्यन्त पसरलेल्या प्रादेशिक संस्कृतींच्या मालिकेंतील भारत हा मध्यमणि आहे. या दोन टोंकांमध्यें प्रादेशिक संस्कृतींची मालिका खालीं दक्षिणेकडे वळण घेऊन इंडोनेशियांत विषुववृत्ताखाली लुप्त होते. इतरांच्या मानानें प्राचीन असलेल्या या "जुन्या जगाच्या" संस्कृतींना प्राचीन ग्रीक भाषेंत खास अशी एक संज्ञा होती. ग्रीक लोक या जगाला "वस्ती असलेला भाग" असें म्हणत. या जगाच्या विस्ताराशीं त्यांचा उत्तरोत्तर परिचय झाला. इसवी सनाच्या दुसऱ्या शतकांतील अलेक्झांड्रियांतील ग्रीक भूगोलज्ञ टॉलेमी याच्या काळापासून या वस्ती असलेल्या प्रदेशाचें क्षेत्रफळ पुष्कळच वाढलें. रशिया, युरोपचा उत्तर भाग, दोन्ही अमेरिका, उष्ण कटिबंधांतील आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, न्यू झीलंड यांचाहि अंतर्भाव या प्रदेशांत झाला. आज पृथ्वीवरील वस्ती करण्यास योग्य आणि पदाक्रमणीय असलेला असा सर्व भाग त्यांत अंतर्भूत झालेला आहे. किम्बहुना आधुनिक तांत्रिक प्रगतीमुळें तर पृथ्वीचा जवळ जवळ सर्व भाग यांत समाविष्ट झाला आहे. हे सर्व बदल घडून येत असतांना भारतानें आपलें मध्यवर्ति स्थान कायम ठेवलें आहे. ज्या क्षणीं संकृतीचा पूर्वेकडे चीनमध्यें आणि पश्चिमेकडे युरोपांत प्रसार होत गेला तेव्हांपासून भारताचें हें स्थान कायम राहिलें आहे.

अर्थात केवळ भौगोलिक दृष्टीनेंच भारताचें स्थान मोक्याच्या जागीं आहे असें नाहीं. चालू परिस्थितीच उदाहरणार्थ पहा. परस्परविरोधी तत्त्वज्ञानांत जगभर चाललेल्या स्पर्धेंत भारतानें समतोलपणा राखलेला आहे हें सर्वजण मान्य करतात. लोकसभेवर अधिष्ठित अशी लोकशाही शासनपद्धति आशियांत स्थिरावलेली दिसते याचें कारण भारतानें आपल्या राजकीय कारभारला तसें वळण दिलें आहे म्हणून. यांत बदल करावयाचा विचार जर भारतानें केला तर त्याचा परिणाम केवळ भारतांतच दिसेल असें नाहीं, तर हिन्दी महासागराच्या किनाऱ्यावरील सर्व प्रदेशांवर आणि आशिया आफ्रिकेच्या मध्यवर्ती भागांतहि दिसून येईल. परंतु मानवी जीवनांत राजकारण ही केवळ एक वरवरची घडामोड आहे. धर्माचा प्रभाव फार खोलवर होतो. भारतानें नवे धर्म निर्माण करून दिलेले आहेत; केवळ नव्यानें स्वीकारलेले नाहींत. विद्यमान उच्चतर धर्मांत सुमारें सहा धर्मांचें उत्पत्तिस्थान तर भारतांत आहे. सुमारें अर्ध्याहून अधिक मानवजात हिन्दुधर्मीय किंवा बौद्धधर्मीय आहे. जगाच्या इतिहासांत अर्थशास्त्रासारख्या अगदी भिन्न क्षेत्रांतहि भारत ही एक प्रभावी शक्ति ठरली आहे. पहिल्या डारियसपासूनच, पर्शियाच्या साम्राज्यांतील

आर्थिक इतिहास, किंवा, ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकांत सिंधूचें खोरें आणि इजिप्त यांमधील समुद्रमार्ग उपलब्ध झाल्यानंतरच्या ग्रीक-रोमन साम्राज्याच्या आर्थिक क्षेत्रांतील घडामोडी; व्हेनिस शहराच्या विकासानंतरच्या मध्ययुगीन ख्रिस्ती देशांतील आर्थिक घडामोडी अगर वास्को द गामानें कालीकटचा शोध लाविल्यानंतरचा आधुनिक जगाचा आर्थिक इतिहास पहा. या प्रत्येक ठिकाणच्या घटनांची संगति, आपण ज्या वेळीं त्या घटनांवर भारतानें केलेल्या परिणामांचा विचार करूं त्यावेळींच लागूं शकते. राजकीय क्षेत्रांचा विचार करतांना सिंहावलोकन करूं लागलों तर ज्यांना खऱ्या अर्थानें जागतिक राष्ट्राचे प्रायोगिक आदर्श म्हणतां येतील अशीं चार साम्राज्यें भारतांत होऊन गेलीं. मौर्य आणि गुप्त साम्राज्याची स्थापना व संरक्षण केवळ भारतीयांनीच केलें. भारतांतील मोंगल आणि ब्रिटिश साम्राज्यांची स्थापना व संरक्षण, जर या साम्राज्याच्या भारतीयेतर निर्मात्यांनी भारतीयांचें साहाय्य भरपूर प्रमाणावर घेतलें नसतें तर झालें नसतें.

भारतालाहि ज्या समस्यांशी सामना द्यावा लागत आहे, आणि ज्या भारत आपल्या खास मार्गानें सोडविण्याचा यत्न करीत आहे अशा कांहीं जागतिक समस्यांचा मी आतां उल्लेख करणार आहे. मानवजातीसमोर उभ्या असलेल्या या सर्वसाधारण प्रश्नांचें भारतीय मार्गानें केलें जाणारें निराकरण पाहणें सर्व जगाच्या दृष्टीनें हिताचें आहे. कारण ज्या देशांतील लोकांना अशा प्रश्नांशीं झगडावें लागत आहे त्यांना कदाचित भारताचा मार्ग आणि त्यामुळें येणारा अनुभव उपयोगी पडण्यासारखा आहे.

पुराणवस्तुशास्त्रज्ञांनी ज्याला "नवें अश्मयुग" असें संबोधलें आहे त्या संस्कृतीच्या "शेतकीच्या" रूपावस्थेसंबंधीं मी दुसऱ्या व्याख्यानांत थोडें सांगितलें. नैऋत्य आशियांतील सुपीक पट्टीच्या प्रदेशांत अगदी प्राचीनतम संस्कृतीचा उदय होण्यापूर्वी हें नवें अश्मयुग प्रचलित होतें. संस्कृति जेव्हां विकासाप्रत जाते तेव्हां पूर्वावस्था ती संपूर्णपणें नष्ट करीत नाहीं. त्या पूर्व-थरावरच हा नवा थर बसतो आणि पूर्वावस्था कायम राहते. तो थर उखडला जात नाहीं, तर त्यावर नव्या अवस्थेचा थर पसरला जातो. गेलीं पांच हजार वर्षांची संस्कृति या नव-अश्मयुगीन शेतकऱ्यांनी आपल्या पाठीवर वाढवली आहे. भूमातेस ज्याप्रमाणें किसानांनी आपल्या काबाडकष्टांनी सुजला-सुफला केलें, व जी देवता आज आपल्या उरावर त्यांच्याच श्रमानें उभे झालेल्या पिरॅमिडचें ओझें वहात आहे, तिच्याप्रमाणें ह्या कृषिवर्गावरहि त्यांनीच

92389

पोसलेल्या आजच्या संस्कृतीचें दडपणहि तसेंच आहे. आपल्यावर सत्ता गाजविणाऱ्या शहरांतील अल्पसंख्यकांकरतां सर्व सुखसोयी निर्माण करणाऱ्या मजुरांना ज्यांत वांटा नाहीं, असे सांस्कृतिक फायदे इतरांना तेवढे मिळवून देण्याचा व त्यासाठीं राबविले जाण्याचा, गेल्या पांच हजार वर्षांचा अनुभव शेतकऱ्यांना अंगवळणीं पडला आहे; आणि त्यांनीं त्याची तक्रारसुद्धां करणें सोडून दिलें आहे. उपासमारवजा दर्जाचे जीवन जगांतील शेतकरी जगत आहेत. जें जें जादा उत्पादन होईल तें तें सर्व त्यांच्यापासून हिरावून घेऊन, एकामागून दुसरी अशा क्रमानें संस्कृती निर्माण करण्यासाठीं व त्यांच्या नाशासाठीं तें योजिलें जात आहे. संस्कृतीच्या या घडामोडींत जीवनाच्या निराशाजनक अनुभवानें शेतकऱ्याला उदासीन आणि निष्क्रिय बनविलें आहे. आपल्या वांटचाला याहून अधिक बरे दिवस आपल्या कर्तृत्वानें येऊं शकतील अशी आशा स्वप्नांत देखील न आणतां जसें खडतर जीवन लाभेल तसें कंठण्यास शेतकरी सरावले आहेत.

अगदी परवां परवां पर्यन्त शेतकऱ्यांची ही निष्क्रियता वस्तुस्थितीशी सुसंवादीच होती. हडळीप्रमाणें मानगुटीवर बसणारी संस्कृति केवळ पराश्रयी अशी न राहतां आर्थिक दृष्टीनें उत्पादक स्वरूपाची होऊं लागेपर्यन्त शेतकऱ्यांची परिस्थिति सुधारण्याची आशा निर्माण झाली नव्हती. दोनशे वर्षांपूर्वींच घडलेली औद्योगिक क्रांति होईपर्यन्त हें घडून आलें नाही. तांत्रिक प्रगति सलग न होतां मधूनच अधिक वेगानें होई व पुष्कळसा मधला कालखंड त्यांत प्रगति खुंटल्यासारखा वाटे. प्रगतीची पहिली पायरी म्हणजे आपल्या पूर्वजांनी दगडापासून तयार केलेलें हत्यार होय. दुसरा शोध शेतकीचा. शेतकी आणि गुरे पाळणें या उद्योगांतून नव-अश्मयुगीन संस्कृति निर्माण झाली. ज्यांतून युरोपादि जुन्या देशांची संस्कृति विकसित झाली त्या पुढील संक्रमणावस्थेंतील काळांत अनेक शोध लागले. चाके बनविणें, शिडे तयार करणें, नांगर बनविणें, आणि धातुशोधन असे किती तरी शोध सांगता येतील. परन्तु यांतून जन्मलेली संस्कृति तंत्रविज्ञानांतील पुढची क्रांति नव्हती, किंवा या संस्कृतिदर्शनाबरोबर पुन्हा तशी नवीन क्रान्तिहि घडून आली नाहीं. तरी ही क्रान्तिच म्हटली पाहिजे आणि तीहि प्रचंड प्रमाणांत घडून आली. परन्तु या क्रान्तीनें जे बदल मानवी व्यवहारांत घडविले ते औद्योगिक क्षेत्रांतील नव्हते. हे बदल सामाजिक आणि राजकीय संघटनांच्या क्षेत्रांत झाले.

शेतकरी व त्याचें कुटुंब यांच्या उदरनिर्वाहापुरतें धान्य ठेवून उरलेलें सव

ज़ादा उत्पादन आपल्या ताब्यांत ठेवावयाचें हा या संस्कृतीमधील राजकीय प्रभावाचा चातुर्यविशेष होय. या जादा उत्पादनाचें साहाय्यानें समाजांतील विशिष्ट अशा अल्पसंख्य वर्गाचें पोषण केलें जाई. धान्य पिकविणें, उद्योग आणि व्यापार या कार्यांत इतर लोक सारा वेळ गुंतलेले राहात आणि हा अल्पसंख्य वर्ग मात्र या कामांत भाग न घेण्याची खास सवलत उपभोगीत असे. यामुळेंच इतर व्यवसायांकडे लक्ष पुरविण्यास हा अल्पसंख्य वर्ग मोकळा राही. या अल्पसंख्य वर्गांतीलहि कांहीं थोडे लोक आपला फावला वेळ कलाकौशल्य, तंत्रविद्या इत्यादि कार्यांत व्यतीत करीत व त्यांनाच संस्कृतीच्या आजवरच्या विकासाचें श्रेय आहे. उलट संस्कृतीची आनुषंगिक गुन्हेगारी आणि अविचाराची जबाबदारी या अल्पसंख्य वर्गांतील बहुसंख्यकांच्या माथीं आहे. परंतु विशेष ध्यानांत घ्यावयाचा मुद्दा हा कीं अल्पसंख्यकांतील जे थोडे सृजनशील लोक कला, तंत्र, शास्त्रीय शोध यासारख्या उद्योगांत गुंतले होते त्यांनी सांस्कृतिक विकासांतील सुमारें ५००० वर्षे तांत्रिक क्षेत्रांत कांहींहि प्रगति करून दाखविली नाहीं, या पांच हजार वर्षांच्या अवधींत या सुखासीन अल्पसंख्यक वर्गाचें लक्ष दुसऱ्या गोष्टींकडे लागलें होतें. वास्तुशास्त्र, चित्रकला, शिल्पकला, काव्य, ज्योतिष, युद्धकला यांसारख्या विषयांत ते रमले होते. ज्यांना शक्य होतें असे यांतलेच कांहीं लोक ऐषआरामांत जीवन कंटीत होते. गिझा येथील पिरॅमिड आणि आग्रा, पेकिंग व व्हर्साय येथील राजवाडे हीं सत्ताधीश अल्पसंख्यकांच्या वृत्तीची निदर्शक अशीं राजकीय स्मारकें होत. तर या वर्गाच्या धार्मिक वृत्तीचें रूप सूचित केलें जातें तें अँगकोर वॅट, बोरोबुडूर, पेकिंग येथील वेदी आणि स्वर्गमंदिर, डरहॅम व शार्त्रे येथील ख्रिस्तमंदिर, आणि अथेन्समधील अॅक्रॉपोलिसवरील अपूर्व इमारतींनी. आपल्या सामर्थ्यावर मित्रराष्ट्रांतील प्रजेवर सत्ता गाजवून, त्यांच्याकडून बळकाविलेल्या संपत्तीवर अथेन्समधील या सुंदर इमारती बांधल्या गेल्या, हें आणखी विशेष !

संस्कृतीच्या विकासांत वाढलेल्या या सुखवस्तु अल्पसंख्यकांनीं गेल्या २०० वर्षांत तंत्रविज्ञानाकडे अधिक गंभीरपणें लक्ष पुरविण्यास सुरुवात केली आहे. आपल्या डोळ्यांदेखत केवळ यामुळेंच तंत्रविज्ञानाच्या विकासाच्या कक्षा इतक्या रुंदावल्या कीं सांस्कृतिक जीवनांत निर्माण झालेल्या सुखसोयी थोड्या तरी प्रमाणांत सर्व मानवजातीला मिळूं लागल्या.

अशी ही परिस्थिति अखिल जगाची व विशेषत: भारताची आहे. जगांतील लक्षावधि ग्रामीण समाजांपैकीं फार मोठा भाग भारतांत आहे. भारतीय

जनता आणि भारत सरकार शेतकऱ्यांना त्यांचा न्याय्य हिस्सा देण्याचा उदात्त प्रयत्न करीत आहेत. माझ्या मागील भेटींत बंगाल, तमिळनाड आणि पंजाब-मधील समाजविकासकेंद्रांच्या कार्याचें ओझरतें दर्शन मला लाभलें. मला असें वाटतें कीं या कार्यामागील मुख्य हेतु जर कोणता असेल तर तो म्हणजे शेतकऱ्यांना स्वावलंबी करणें हा होय. त्यांना स्वावलंबी बनविणें म्हणजे त्यांच्या अंतःकरणांत आशा, आत्मविश्वास, निश्चयाचें बळ आणि कळकळ यांचे स्फुल्लिंग प्रदीप्त करणें. आपलें ऐहिक जीवन संपन्न करण्यास आवश्यक असणाऱ्या या आध्यात्मिक प्रेरणा आहेत असें मला वाटतें; आणि ही ऐहिक संपन्नताच पुढें आध्यात्मिक प्रगतीस आवश्यक अशी परिस्थिति निर्माण करते. भारतानें हातीं घेतलेल्या या कार्याचें स्वरूप केवढें विराट आहे याची मला थोडीशी कल्पना आहे. अशा या प्रचंड आणि विशाल क्रान्तीच्या ओघांत थोडीफार निराशा, विलंब आणि क्वचित माघार घेण्याचे प्रसंगहि येणारच. दरम्यान भारतांतील समाजविकासकेंद्रांच्या प्रगतीकडे सर्व जगाचें लक्ष बारकाईनें लागलेलें आहे. या क्षेत्रांत भारत कोणतें कर्तृत्व करून दाखवितो आहे इकडे जगाचे डोळे लागलेले आहेत. कारण शेतकऱ्यांची पिळवणूक न करतां त्यांना उत्तेजन देऊन पुनः एकदा कार्यप्रवृत्त करण्याचें हें अभिनव कार्य इथें घडतें आहे. या कार्यांत भारताला लाभणाऱ्या यशापयशावर अशाच प्रकारच्या कार्याचें जगांतील भवितव्य अवलंबून आहे. अनंत काळ पिळवणूक झालेला जगांतील शेतकरीवर्ग अशा जाचांतून मुक्त होणें ही खराखुरा असा जागतिक समाज निर्माण करण्याच्या क्रियेंतील एक आवश्यक बाब आहे.

लोकसंख्येचा प्रश्न ही जशी एक प्रमुख जागतिक समस्या आहे तसेंच तिचें स्थानिक भारतीय स्वरूपहि आहे. मृत्युसंख्येवर नियंत्रण घालण्यांत यश मिळविल्यामुळें जगांतील लोकसंख्येची वाढ भयानक रीतीनें होत आहे. कारण याच प्रमाणांत जननप्रमाण नियंत्रित करण्याचें कामीं कोणासहि यश लाभलेलें नाहीं. या प्रश्नासंबंधीं आज विस्तारानें बोलण्याची गरज नाहीं; कारण माझ्या पहिल्या व्याख्यानांत मी त्याची चर्चा केलेली आहे. या ठिकाणीं मला इतकेंच नमूद करावयाचें आहे कीं इतर देशांना आदर्श घालून दिल्याबद्दल भारत सरकारचें अभिनंदन करणें अगत्याचें आहे. या प्रश्नाला भारतसरकारनें सरळ वाचा फोडली आणि तो सोडविण्याचे उपाय त्यानें हातीं घेतले आहेत. लक्षावधि पतिपत्नींना पटवून द्यावयाचें कीं त्यांनी आपल्या अपत्यसंख्येवर मर्यादा घालणें आवश्यक आहे, आणि ते ही मर्यादा घालूं शकतील. केवढे

प्रचंड असें हें शिक्षणकार्य आहे. अंधश्रद्धेला दाद न देतां भारतसरकार या अवाढव्य उद्योगाला लागलें आहे. या उदाहणावरून धैर्यानें अशा प्रकारची कृति करण्यास जगांतील दुसरी शासने उद्युक्त होतील अशी मी आशा करतो. हें कार्यच असें आहे कीं मानवानें त्याची लाज बाळगून भागणार नाहीं.

दुसरी एक समस्या भारतांत ३००० वर्षांहून अधिक काळ अस्तित्वांत आहे. गेल्या साडेतीन शतकांत वायव्येकडील युरोपीयन लोकांच्या समुद्रपार वसती करण्यामुळें या समस्येनें आतां जगाला व्यापून टाकलें आहे. ॲपरथाईड (पोर्तुगीज जातिवाचक संज्ञा, संस्कृतांतील वर्ण) या संज्ञेनें ओळखल्या जाणाऱ्या सामाजिक आणि नैतिक प्रश्नाविषयीं मी बोलत आहे.

वर्ण या संस्थेचें मूळ अगदी स्पष्ट दिसतें. सांस्कृतिक दृष्टचा निराळया आणि शारीरिक दृष्टीनें विसदृश अशा मानवाची जेव्हां प्रथम अचानक गांठ पडली तेव्हांच ही आपत्ति निर्माण झाली. यांपैकीं एका किंवा दोन्हीं दृष्टींनीं भिन्न अशा मानवांची सरमिसळ झाली ती दोन प्रकारांनीं. कांहीं प्रसंगी एका जमातीनें दुसरीवर आक्रमण करून तिला जिंकलें तर कांहीं वेळा एका जमातींतील लोकांना दुसऱ्या जमातींतील लोकांनी सक्तीनें गुलाम बनविल्यामुळें दुसऱ्या जमातींत जावें लागलें. खिस्तपूर्व १५०० व १००० या कालखंडात मध्य-आशियांतून आलेल्या रानटी अशा आर्यभाषिकांनी या खंडप्राय देशावर आक्रमण केलें. आक्रमण करून संमिश्र जमात निर्माण करण्याचें हें एक उत्तम उदाहरण आहे. गुलामांची आयात करून संमिश्र जमात निर्माण झाल्याचें उत्तम उदाहरण म्हणजे अमेरिकेंतील आग्नेय भागांतील वसाहत होय. हें अडीचशें वर्षांत घडलें व पुढें याचा शेवट १८६१ ते १८६५ मधील यादवींत झाला. या किंवा यासारख्या इतर प्रसंगीं, उदाहरणार्थ दक्षिण आफ्रिकेंत, जी जमात बलशाली असेल तिनें या संमिश्र जमातीचें स्वतंत्र व एकमेकांपासून दूर राहांणारे असे वेगवेगळे भाग केले. पण केवळ सामर्थ्यवान असल्यामुळें कांहीं ती जमात अधिक सुसंस्कृत किंवा बहुसंख्यक आहे असें मानतां येणार नाहीं. अमेरिकेंतील आणि दक्षिण आफ्रिकेंतील बिचाऱ्या तथाकथित गौरवर्णीयांना, या आफ्रिकेंत जन्मलेल्या आपल्या देशबांधवांपेक्षां आपण अधिक सुसंस्कृत आहोंत असें जगाला पटवून देणें सोपें जाणार नाहीं. भारतावर आक्रमण करून, सिंधु संस्कृतींतील मूळच्या लोकांना हलक्या जातीची दशा प्राप्त करून देणारे आर्य संख्याबलानें कमी असावेत व सांस्कृतिक दृष्टीनेंहि प्रगत नसावेत असें दिसतें. आर्यांनी ज्यांचा बळी घेतला अशा लोकांचे

व आर्यांच्या अगोदर जे येथें वसती करीत होते त्यांचे वंशज म्हणजेच या खंडतुल्य देशांतील बहुसंख्य लोक होत. आर्यांच्या रानटी रक्ताचा थोडाफार अंशहि या लोकांच्या रक्तांत क्वचितच आढळेल.

दुबार रानटी असलेले पूर्वज मला स्वतःला योगायोगानें लाभले आहेत. पश्चिमेकडील रोमन साम्राज्याचा विध्वंस झाल्यानंतर इंग्लंडच्या पूर्वेकडील परगण्यावर ज्या रानटी लोकांनी दोन वेळां आक्रमण केलें, अशा एका परगण्यांत माझे वाडवडील राहात होते. या परगण्यावर रानटी इंग्रजांनी केलेल्या आक्रमणामुळें आलेली आपत्ति कमी पडली म्हणूनच कीं काय डॅनिश लोकांनी या रोमन साम्राज्याच्या बेवारशी भागावर पुनः एकदां आक्रमण केलें. डॅनिश लोकांच्या रानटी आक्रमणाच्या या दुसऱ्या लाटेंतून किनाऱ्यास लागलेल्या लोकांपैकींच मी आहे म्हणाना. या रानटी डॅनिश वंशाची पुराव्याची साक्ष माझें आडनांव देत आहे. या श्रोतृसमाजांत जर कोणी पंजाबी लोक असतील तर त्यांना मी जवळचा वाटेन; कारण लिंकनशायर परगण्याप्रमाणेंच पंजाबची देखील आर्य आणि ईराणी भाषा बोलणाऱ्या अनेक रानटी आक्रमकांनी ससेहोलपट केली होती.

इंडो-युरोपियन भाषाकुळांतील लोकांत आर्य भाषा बोलणारे व टयूटॉनिक भाषा बोलणारे अशीं दोन आत्यंतिक टोंके आहेत. या लोकसमुदायानें, गेल्या तीनचार हजार वर्षांत ग्रीकांना परिचित असलेलें जग पादाक्रांत केलें. हे दोन गटच विशेषेंकरून, आपल्या जातिविषयक भावना तीव्रतेनें कां व्यक्त करीत असावेत ? जिथें जिथें आर्य किंवा टयूटन या लोकांची सत्ता आहे तेथील वेगळया गुणविशेषांच्या, चेहऱ्यामोहऱ्याच्या आपल्या बांधवांपासून स्वतःला अलग राखण्याची अनुदारता ते कां दाखवितात ? आपल्या सर्व मातृभाषा एकाच कुळांतून उत्पन्न झाल्यामुळें ही जातिविषयक तीव्र जाणीव, आर्य व टयूटन लोकांच्यात समानपणे आढळून येते असें म्हणतां येणार नाहीं. भाषा आणि राजकीय व्यवहार यांत तादृश कार्यकारणसंबंध कधींच आढळत नाहीं. कारण आपल्याप्रमाणें इंडो-युरोपियन कुळांतील भाषा बोलणारे दुसरेहि लोक दिसतात. ही जातिविषयक तीव्र जाणीव बाळगण्याच्या बाबतींत मात्र त्यांची दृष्टि आपल्यापेक्षां पुष्कळच प्रगत अशी दिसते. या ठिकाणी मी विशेषतः लॅटिन भाषिकांना अनुलक्षून बोलत आहे. आणि मुख्यत्वेंकरून स्पॅनिश व पोर्तुगीज लोकांच्याबद्दल मला बोलायचें आहे. टयूटन आणि आर्य लोक जशा भावनेला बळी पडले तशा भावनेला बळी पडण्याचा प्रसंग स्पॅनिश आणि

पोर्तुगीज लोकांवरहि ओढवला होता. जाति आणि संस्कृति या बाबतींत अगदीं निराळेपण असलेल्या परकीय लोकांना त्यांनीहि जिंकलेले आहे. अमेरिकेंतील इंग्रजीभाषी ट्यूटन लोकांप्रमाणें त्यांनीहि आफ्रिकेंतून गुलामांची आयात आपापल्या देशांत केलेली आहे. परंतु अशा परिस्थितींतसुद्धां त्यांच्या हातून अमानुष वर्तन घडल्याचें कधींच दिसून आलेलें नाहीं.

माझ्या वैयक्तिक अनुभवावरून हा मुद्दा मी अधिक विशद करूं शकेन. मेक्सिको विद्यापीठाच्या रेक्टरच्या हस्तें पदवी घेण्याचें भाग्य मला लाभलें होतें. ते गृहस्थ कांहीं युरोपियन नव्हते असें मला वाटतें. विशुद्ध चारित्र्य आणि असामान्य व्यक्तिमत्व त्यांना लाभलेलें होतें. ते पदार्थविज्ञानाचे एक अग्रगण्य अभ्यासू होते. त्यांच्या हाताखालीं काम करण्यांस तेथील प्राध्यापकांना अभिमान वाटत असावा हें स्पष्टच होतें. त्यांतील पुष्कळसे प्राध्यापक मिश्रवंशीय होते. कांहीं जण संपूर्णपणें युरोपियन होते. परंतु रेक्टर आणि प्राध्यापक यांचें संबंधांत वंशविषयक जाणिवेचा पूर्णतया अभाव होता. ब्राझील देश अजून मी पाहिलेला नाहीं. परंतु १९४६ सालीं पॅरिस येथें शांतता-परिषदेला आलेल्या ब्राझीलमधील शिष्टमंडळाची मला चांगली माहिती आहे. या शिष्टमंडळाचा आणि मी काम करीत असलेल्या ब्रिटिश शिष्टमंडळाचा मुक्काम एकाच निवासस्थानीं होता. पॅलेस्टाईनमधील गाझा प्रदेशांतील आंतरराष्ट्रीय सैन्यांतील ब्राझीली सैनिकांची पलटणहि मी पाहिलेली आहे. जो अनुभव मला मेक्सिकोंत आला तो ब्राझीलमधील सैनिक आणि सनदी नोकर यांच्या संबंधांतहि आला. ब्राझील देशांत पोर्तुगीज भाषा बोलली जाते. तिथें भिन्नवंशीय लोक राहतात. परंतु वांशिक जाणीव आणि एखाद्या जातीबद्दलचे पूर्वग्रह या दोन्हीं दोषांपासून हे लोक अलिप्त असल्याचें दिसून आलें. गोवें अजून मी बघितलेलें नसलें तरी भारतांत राहणारे गोव्याचे कांहीं लोक मला परिचित आहेत. गोव्यांत, हे जातिवंशविषयक संबंध कशा प्रकारचे आहेत हे समजून घेण्याची मला जिज्ञासा आहे.

स्पॅनिश आणि पोर्तुगीज भाषिक लोक वांशिक पूर्वग्रहांपासून अलिप्त असण्याचें मूळ आहे तरी कशांत ? स्पेन आणि पोर्तुगाल आज जिथें वसलेले आहेत तो भाग कितीतरी शतकें मुसलमानी अंमलाखालीं होता. कदाचित त्यांच्यापासून या लोकांना लाभलेला हा वारसा असावा. तेथील अल्पसंख्य मुसलमान राज्यकर्त्यांनी आपल्या रोमन प्रजेशी व्यवहार करतांना वंशविषयक आपपरभाव मनांत ठेवला नाहीं. मुसलमान लोकांचे हें वंशविषयक विशेष उदार

धोरण सर्वत्र दिसून येतें. माझा तर्क जर बरोबर असेल तर इस्लामच्या प्रभावामुळेंच शीख लोकांत जातिविषयक भेदांकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ति निर्माण झाली असावी. स्पॅनिश आणि पोर्तुगीज लोकांच्यावरहि इस्लामचाच परिणाम झाला असावा. एकीकडे हिंदु धर्म आणि दुसऱ्या बाजूला इस्लाम व रोमन कॅथलिक पंथ यांच्यामुळें घडून आलेल्या सामाजिक परिणामांतली तफावत पुढीलप्रमाणें स्पष्ट करणें अनुचित होईल काय ? जेव्हां इतर लोक स्वधर्मांत येतात तेव्हां इस्लाम आणि रोमन कॅथलिक पंथीय लोक त्यांना (वांशिक दृष्टचा) परके मानीत नाहींत. परंतु इस्लामपंथीय आणि ख्रिश्चनधर्मीय आपल्याहून भिन्न अशा इतर धर्मीयांशीं मात्र कांटेकोरपणें जितका भेद पाळतात तितका भेद हिंदुधर्मानुयायी मानीत नाहींत. परन्तु इस्लाम, ख्रिश्चन आणि शीख या धर्मपंथांनी जातींचें ऐक्य जसें साधलें आहे तसें हिन्दुधर्मानें निरनिराळ्या जातींच्या भारतीयांचें ऐक्य साधलेलें नाहीं हें खरेंच आहे.

आज जगांत दोन ठिकाणच्या लोकांपुढें जातीय विभक्तीकरणाची समस्या उभी आहे. त्यापैकी एक आहे आफ्रिका. या प्रकारांत विशेषतः जिथें अल्पसंख्य युरोपियनांचें वर्चस्व आहे असे आफ्रिकेंतील भाग येतात. दक्षिण व मध्य आफ्रिका आणि केन्यांतील हा अल्पसंख्य गट ट्यूटॉनिक भाषा बोलणारा आहे. तर अल्जेरियांतील गट लॅटिनभाषिक आहे. आणि मला सांगायला वाईट वाटतें कीं फ्रेंच आणि कांहीं स्पॅनिश असे अल्पसंख्य गट डच आणि इंग्लिश लोकांप्रमाणें आज वागत आहेत. ही समस्या फार तीव्रतेनें जाणवत असलेलें दुसरें ठिकाण म्हणजे अर्थातच भारत हें होय.

आर्यांनी आपल्या अंकित असलेल्या भारतीय प्रजेला ज्या तऱ्हेनें वागविलें त्या तऱ्हेचाच अनुभव या आर्यांच्या वंशजांना इंग्रज राजवटींत आला. साहजिकपणें भारतांत सत्तांतर झाल्यानंतर, भारतीय लोक आणि भारत सरकार यांनी हा जातीयतेचा प्रचंड प्रश्न पूर्णपणें सोडविण्याच्या कार्याला हात घातला, हें मागील अनुभवाचेंच द्योतक असावें असें मानण्यास हरकत नाहीं. भारतानें या बाबतींत दुसऱ्या कोणाकडून कांहीं शिकावें, समजून घ्यावें असें नाहीं. २५०० वर्षांपूर्वी बुद्धानें या जातिभेदाला मुळींच थारा दिलेला नव्हता. आणि बुद्ध हा आजतागायत सर्वश्रेष्ठ भारतीय होय असें मी मानतो. आपल्या काळांत आज महात्मा गांधी हे सर्वश्रेष्ठ पुरुष होत. आणि जेव्हां महात्माजी आणि बुद्ध एकमतानें एकाच कल्पनेचा पुरस्कार करतात तेव्हां ती साऱ्या भारताचीच एकमुखी साद आहे, असें दिसून येतें.

हजारों वर्षे मूळ धरून बसलेली आणि दैनंदिन जीवनाचा एक घटक बनून राहिलेली जातिसंस्था उखडून टाकण्याचें हें कार्य महाबिकट आहे. कायद्याचें साहाय्य घेऊनच ही समस्या सोडवावी लागेल हें उघड आहे. असे कांहीं कायदे अंमलांत येत असल्याचीहि मला थोडी माहिती आहे. हे कायदे निर्भय आणि सुधारणेच्या मुळाला हात घालणारे असल्याचेंहि मला दिसतें. परंतु जातिविषयक प्रश्न हा लोकसंख्येच्या प्रश्नासारखा असून तो केवळ सरकारी प्रयत्नांनी सुटणारा नाहीं. ही समस्या सोडवावयाची म्हणजे कोटचवधि व्यक्तींची समजूत पटवावी लागेल आणि कोटचवधि अंतःकरणांत परिवर्तन घडवून आणावें लागेल. हें एक स्वयंशिक्षणाचें प्रचंड कार्य असून त्याला अवधीहि लागणार.

या संदर्भात शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रांतील नॅशनल वॉर ॲकॅडमीला १९५६ सालीं मी दिलेल्या भेटीचा उल्लेख करणें मला आनंददायक आणि आशादायक वाटतें. कोणत्याहि प्रकारचे वादविवाद न होऊं देतां त्या ठिकाणीं जातिभेद दूर सारला आहे असें मला स्पष्टपणें आढळलें. मला या गोष्टीचें आश्चर्य वाटलें कीं तेथील सर्वोच्च नियंत्रक अधिकारी उत्तरप्रदेशामधील एक नामवंत भारतीय सैनिक होता आणि तो देखील मुसलमानी धर्माचा. आपल्या देशांतील जातिभेदाची समस्या सोडविण्याच्या मोहिमेंतील हीं कांहीं प्रसन्न शुभचिह्नेच होत. हा प्रश्न अशा ठिकाणींच सोडविला जाणार आहे; आणि जर ही समस्या सोडविली गेली तर त्याचे सुपरिणाम केवळ भारतांतच नव्हे, तर आफ्रिकेंत आणि उत्तर अमेरिकेंतहि दिसून येतील.

भारतापुढें आणि सर्व जगापुढें असलेली चौथी समस्या म्हणजे भाषिक राष्ट्रवाद होय. काल मी या प्रश्नाचा विचार केलेला आहे तेव्हां आतां विस्तारानें त्याविषयीं बोलण्याची गरज नाही. आपल्याला या संदर्भात हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं लोकशाही पद्धतीच्या राज्यकारभारपद्धतीशी हा प्रश्न निगडित झालेला आहे. व हेंहि ध्यानांत घेण्यासारखें आहे कीं ज्यामुळें राष्ट्रीय ऐक्याला धोका निर्माण होतो त्या भाषिक राष्ट्रवादाच्या बाबतींत भारतापेक्षां चीन अधिक नशीबवान आहे. एक म्हणजे सर्व चीनमध्यें एकच भाषा बोलली जाते. स्थानिक भाषाभेद बोली स्वरूपाचे आहेत. हें खरें कीं चिनी भाषा बोलणाऱ्यांना देखील एकमेकांना कळण्याला कठीण असे फरक या बोलींतून आढळतात. परंतु, दक्षिणेकडील किनारेपट्टी आणि आग्नेयेकडील भाग सोडला तर सर्वत्र "मॅन्डेरीन" ही एकच बोली बोलली जाते. "राष्ट्रीय भाषा" म्हणून

मॅन्डेरीन बोलीला लाभलेलें स्थान दुसरी कोणतीच बोली घेऊं शकणार नाहीं. आणि ज्यांना मुद्दाम मॅन्डेरीन भाषा शिकावी लागेल असे लोक तेथें फारच थोडे आहेत. बहुसंख्य चिनी लोक मॅन्डेरीन बोली मातृभाषा म्हणूनच बोलतात. परंतु भारतांत हिंदी भाषेचा मातृभाषेप्रमाणें वापर करणाऱ्यांची संख्या, एकूण लोकसंख्येच्या मानानें तितकी निर्णायक स्वरूपाची नाहीं. शिवाय हिन्दीचें गोत्र दक्षिणेकडील द्राविडी भाषांशीं मुळींच जुळत नाही. ज्या इंग्रजी भाषेंतून मी बोलत आहे त्या भाषावंशातील हिंदी आहे; आणि भाषिक दृष्ट्या, द्राविडी भाषाकुलाला जशी इंग्रजी दूरची तशीच परिस्थिति हिन्दीचीहि आहे. या सर्व वस्तुस्थितीचा विचार केला तर या भाषिक राष्ट्रवादाला नियंत्रणाबाहेर जाऊं देणें भारतीयांना परवडणार नाहीं हें उघड दिसतें.

आतां माझ्या तीन मुद्यांपैकी शेवटल्याबद्दल बोललें पाहिजे. आपल्याला हें आठवत असेल कीं मी असें एक विधान केलें होतें कीं जीवनाविषयीं एक विशिष्ट भारतीय दृष्टिकोण आणि मानवी व्यवहारांतील प्रश्न सोडविण्याची खास भारतीय अशी एक दृष्टि आहे, मार्ग आहे. मी असेंहि सूचित केलें होतें कीं सबंध जग आणि मानवी समाज आज ज्या विशिष्ट परिस्थितींत सांपडले आहेत त्यांतून मुक्त होणाच्या कामीं या भारतीय दृष्टीचा किंवा मार्गाचा बहुमोल उपयोग होईल.

भारतीयांच्या एका गुणाचा माझ्यावर अतिशय परिणाम झाला आणि तोहि फार खोलवर. तो म्हणजे अद्वेष. ज्या ज्या वेळीं इतर लोकांशी झगडा करण्याचा प्रसंग आला (आणि क्वचित असे प्रसंग अपरिहार्य असतात) त्या त्या वेळीं आपल्या प्रतिपक्षाबद्दल कोणत्याहि प्रकारच्या द्वेषभावनेला बळी न पडतां तुम्ही या लोकांशी मुकाबला केलेला आहे. अगदीं अलीकडचें उदाहरण, म्हणजे स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं तुम्ही माझ्या देशाशीं केलेल्या यशस्वी सामान्यामागील भावनेचें होय. आणि एकदा मुकाबला संपला, कीं मग त्यांतील उण्यांदुण्यांवर व कटु प्रसंगांसंबंधीं कधींहि चर्वितचर्वण तुम्हीं केलें नाहीं. या अद्वेषवृत्तीची मी आणखी कितीतरी उदाहरणे देऊं शकेन. फक्त या क्षणीं, या स्थळीं काय घडत आहे त्याकडे आपलें लक्ष वेधतो. ज्या एका इस्लामधर्मीय अशा भारतीयाच्या स्मृतिप्रीत्यर्थ ही व्याख्यानमाला गुंफली गेली तींत तुम्हीं निमंत्रित केलेला एक इंग्रज गृहस्थ आज बोलत आहे. अगदी अलीकडे भारतावर आक्रमण कोणी केलें ? अगदी अलीकडील आक्रमक इंग्रज होत; तर मुसलमान यापूर्वींचे.

मी मागें दिल्लीला आलो असतांना गांधीजींना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठीं त्यांच्या समाधीपाशी उभा होतो. माझ्या मनांत विचार आला, आपल्या समाजाला राजकीय पारतंत्र्यांतून मुक्त करून केवळ त्यांचेच नव्हे, तर ज्या सत्तेपासून मुक्तता करून घ्यावयाची त्या सत्ताधारी लोकांचेंसुद्धां हित साधणारा असा दुसरा एखादा पुढारी दाखवितां येईल काय ? माझ्या देशांतील लोकांना भारतावर राज्य करणें गांधीजींनी अशक्य करून टाकलें; त्याचबरोबर ब्रिटिशांना देखील ही सत्ता सोडतांना कोणत्याहि प्रकारचा कमीपणा किंवा मानहानि पत्करावी लागणार नाहीं अशा रीतीनें त्यांनी ही मुक्ततेची चळवळ योजिली. आपल्या स्वतःच्या देशाची जी महान सेवा गांधीजींनी केली त्यापेक्षां आमच्या देशाची कांहीं फारशी कमी केलेली नाहीं. मी ही अतिशयोक्ति करीत नाहीं. एखादें साम्राज्य हस्तगत करणें सोपें आहे. परन्तु हस्तगत केलेलें साम्राज्य दुसऱ्याच्या हवालीं करणें फार कठीण आहे. जेव्हां एखाद्या सरकारला विरोधाला तोंड द्यावें लागतें––मग तो विरोध नैतिक दृष्टचा कितीहि कायदेशीर असो––तेव्हां तें सरकार अगदी सहजपणें आपली सत्ता सामर्थ्याच्या बळावर टिकविण्याचा प्रयत्न करूं लागतें. आणि या विरोधी लढ्याला एकदां का अत्याचारी स्वरूप आलें म्हणजे मग दोन्ही बाजूंना त्यांतून बाहेर पडणें कठीण होतें. विशेषतः सत्ताधाऱ्यांचा मार्ग तर अधिकच दुष्कर होऊन बसतो. इतिहासांतली ही अत्यन्त सर्वसाधारण अशी शोकांतिका आहे. गांधीजींनी भारत व ब्रिटन या दोघांनाहि यापासून वांचविलें आहे. कारण त्यांनी भारतीयांना आपला झगडा आध्यात्मिक पातळीवरून करण्याची स्फूर्ति दिली; राजकीय पातळीवरून नव्हे.

महान व्यक्ति ही अद्वितीय असते. मानवाला आपली आध्यात्मिक उद्दिष्टे साध्य करण्यास त्या व्यक्तिइतकी इतर कोणाची मदत होऊ शकत नाहीं. ती व्यक्ति लोकांना कार्यप्रवृत्त करून आपलें ईप्सित साध्य करून घेते. पण हे लोक जर त्या व्यक्तीच्या कल्पनेशी एकरूप होऊन कार्य करण्यास समर्थ असतील तरच त्या व्यक्तीचें कर्तृत्व पूर्णांशानें फलप्रद होऊं शकतें. कल्पना करा कीं गांधीजींचा जन्म भारतांत न होतां प्राचीन ग्रीस देशांत झाला असता. प्राचीन ग्रीक लोक कमालीचे मनस्वी होते व आवेशाच्या भरांत त्यांनी वाटेल तशीं कृत्यें केलीं. स्वतःच्या अनिर्बन्ध वर्तनामुळेंच त्यांनी स्वतः निर्माण केलेल्या तेजस्वी संस्कृतीचा नाश ओढवून घेतला. तेव्हां अशा वेळीं गांधीजींना देखील आपलें कार्य करतांना खूपच विफलता सोसावी लागली असती. मला एवढाच

मुद्दा सांगावयाचा आहे कीं अहिंसात्मक असहकार हा गांधीजी आणि भारतीय लोक यांच्या वृत्तींच्या परस्पर सहकार्याचा मोठा विजय होय. गांधीजी आणि भारतीय लोक यांच्यांत एकात्मता होती. आणि या दोहोंत जें सहकार्य दिसून आलें तें म्हणजे प्राचीन भारतीय परंपरेचाच एक आविष्कार होय. ही वृत्ति ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकांतहि जागृत होती. याच वृत्तीनें बुद्ध आणि महावीर व त्यांचे समकालीन असे हिन्दु संत यांना स्फूर्ति लाभली.

अहिंसात्मक क्रान्ति ही भारतानें प्राप्त केलेली एक विशेष सिद्धि आहे. भारत आणि ब्रिटन यांच्यांतील राजकीय प्रश्न सोडविण्यांत या क्रान्तीला जें यश मिळालें त्यामुळेंच भारतांतील अन्तर्गत प्रश्न सोडविण्यासहि आतां ती कार्यक्षम झाली आहे. मी अर्थातच भूदान चळवळीला उद्देशून बोलत आहे. थोडी भूतकाळांत नजर टाकली, तर ज्याचा उल्लेख मी माझ्या पहिल्या व्याख्यानांत केला होता, तो अशोक याच वृत्तीनें वागत असलेला आढळून येतो. जागतिक ऐक्यासाठीं शस्त्रबळानें आक्रमण करण्याऐवजीं अशोकानें धर्मप्रचाराचा उपयोग केलेला दिसून येतो.

मी पूर्वीं सांगितल्याप्रमाणें अशोकास कार्यप्रवृत्त करण्यास अणुयुग अस्तित्वांत नव्हतें. तशी गांधीजींनाहि ती प्रेरणा नव्हती. गांधीजींचें जीवनकार्य पुरें होत आलेलें होतें. अहिंसेचें त्यांचें धोरण अनेक वर्षेपर्यन्त अंमलांत आणलें गेलें होतें. अगदी १९४५ पर्यंत, हिरोशिमा आणि नागासाकी यांवर ॲटम बॉम्ब पडेपर्यन्त. पण आज विद्यमान असलेली पिढी मात्र ह्या विस्फोटाच्या मधोमध उभी आहे. विनाशकारक अशा भौतिक सामर्थ्याच्या या झंझावातांत जर आपण आपल्या बांधवांशी व्यवहार करतांना अहिंसेचें पालन केलें नाहीं तर आत्मनाशापासून रक्षण करणें आपणाला अशक्य होईल. आपल्या वृत्ती मुद्दाम वा उद्दामपणें भडकविल्या गेल्या तरी आपल्याला अहिंसेचें पालन केलें पाहिजे. हें किती कठीण आहे याची आपल्याला कल्पना आहे. विशेषतः तुम्हां भारतीयांना चीनच्या सम्बधांत आज अहिंसेचें पालन करणें फार अवघड जात असेल. परंतु तुम्हांवर गांधीजींनी आणि इतिहासानें एक महान जबाबदारी टाकली आहे. ती म्हणजे सतत अहिंसापालनाचें उदाहरण साऱ्या जगासमोर ठेवणें. अत्युत्कट व म्हणूनच अति कडक अशा आदर्शांचें परिपालन करण्यापासून आपण विचलित झालांत, या भारतीय परंपरेपासून च्युत झालांत तर साऱ्या मानवजातीची दृष्टीच झांकोळून गेल्याशिवाय राहणार नाहीं. म्हणून तर भारतावर फार मोठी आध्यात्मिक जबाबदारी येऊन पडलेली आहे.

म्हणून आपली, भारतीयांची, कोणतीहि कृति, मानवाच्या वृत्तीला कलाटणी देणारी अशी ठरणार आहे. मग ही कलाटणी भल्यासाठी असो वा बुऱ्यासाठीं असो. आत्मरक्षण कीं आत्मनाश, यांपैकी आपण राहतो त्या अणुयुगांत कोणतें पत्करावयाचें त्याचा निर्णय देणारी ही ठरेल.

अहिंसावृत्तीची ही भावना नैतिक ध्येयांतून स्फुरलेली आहे. परन्तु प्रत्येक नैतिक ध्येयाला बौद्धिक अशा दृष्टिकोणाचें पाठबळ असतें. मनुष्यास सत्य आणि मुक्ति यांप्रत जाण्याचा एकचएक मार्ग नसतो तर अनेक मार्ग असूं शकतात हा बुद्धिवादी दृष्टिकोण भारतीयांच्या अहिंसावृत्तीचा एक भाग आहे. पूर्ण आध्यात्मिक तत्त्वाचें किंचितहि दर्शन म्हणजे सत्य, असें मला म्हणावयाचें आहे. ह्या तत्त्वाचें दर्शन घडल्यावर त्याच्याशीं जीवनाची सुसंगत सांगड घालणें म्हणजे मुक्ति असें मी मानतो.

विशाल दृष्टीनें सत्याचा साक्षात्कार घडविणें हा भारताचा विशेष गुणधर्म आहे. भक्तिभावानें गाढ उपासना करणारा शैव आणि तितक्याच गाढ भक्तीनें उपासना करणारा वैष्णव एकमेकांबद्दल अशीच खात्री बाळगून असतात कीं प्रत्येकाचा यत्न सत्य आणि मुक्ति याच्या प्राप्तीसाठीं चालला आहे. प्रत्येकाचा मार्ग भिन्न आहे हें खरें. अर्थात, आपण स्वीकारलेला मार्ग निदान आपल्या पुरता तरी श्रेष्ठ आहे असेंहि ते प्रतिपादन करतील. परन्तु आपलाच मार्ग केवळ खरा आणि म्हणून श्रेष्ठ असा दावा त्यांपैकीं कोणीहि मांडणार नाहीं. एकजण दुसऱ्याला कधींहि असें म्हणणार नाहीं कीं त्याचा मार्ग पूर्णपणें असत्य आणि निंद्य आहे. तो हिन्दुत्वाशी विसंगत आहे किंवा तो धर्माचारच नव्हे असें म्हणून कोणीहि कोणत्याहि मार्गाची बोळवण करणार नाहीं. आपलाच धर्मपंथ कोण्या एका विशिष्ट काळीं व स्थळीं ईश्वरानें सांगितला असा दावाहि कोणी मांडणार नाहीं. कल्पना करा कीं एखाद्या पुराणवस्तुसंशोधकानें बेसावधपणें एखाद्या शैवाला सांगितलें कीं, "ज्याला तूं शिव ही देवता मानतोस तिचें पूजन आणि अर्चन मोहन-जो-दडो आणि हडप्पा या सिंधुसंस्कृति-कालीं कितीतरी शतके पूर्वींच चालू होतें. अगदी आर्य लोकांनी भारतांत पहिलें पाऊल ठेवण्यापूर्वी आणि त्यांचें पहिलें ब्रह्मकर्म घडण्यापूर्वी." आपल्या आर्य पूर्वजांबद्दल अभिमान बाळगणाऱ्या त्या शैवाला काय वाटेल हे उद्गार ऐकून ? अगदी उदारमनस्क पण सनातनी ख्रिश्चनधर्मीय मनुष्य देखील अशा तऱ्हेच्या विधानानें जितका संतापेल आणि कष्टी होईल तितका हा शैव ब्राह्मण खासच विचलित होणार नाहीं. कारण, समजा अशा ख्रिश्चन धर्मानुयायाला अशाच

एखाद्या भडभड्या पुराणवस्तुसंशोधकानें सांगितलें कीं येशू ख्रिस्ताला सुळावर देण्यापूर्वी कितीतरी शतकें माणसाच्या मुक्तीसाठीं स्वतः होऊन देहत्याग करणाऱ्या देवतेचें पूजन नैऋत्य आशियांत आणि इजिप्तमध्यें, एवढेंच काय पण स्कँडिनेव्हियांत देखील रूढ होतें, आणि टामूझ, ॲडॉनिस, ऑसिरिस, ॲटिस किंवा बाल्डर अशा विविध नामाभिधानाने हें पूजन केलें जात होतें, तर तो खात्रीने भलताच चिडून जाईल.

माझी कल्पना जर बरोबर असेल तर धार्मिक बाबतींतील हा विशाल दृष्टिकोण हिन्दु धर्मांतून बौद्ध धर्मांतहि उतरला होता. सर्व मानवजातीच्या आध्यात्मिक मुक्ततेसाठीं बुद्धानें एकमेव स्वतंत्र मार्ग शोधून काढला असा जो दावा बौद्धानुयायी करतात तें पाहतां ही विशाल दृष्टि खचितच प्रशंसनीय होय. बुद्धानें शोधून काढलेला मार्गच एकमेव मार्ग होय हें म्हणणें ख्रिस्ती किंवा मुसलमान धर्मीयांच्या म्हणण्यासारखें वाटतें. तरीहि विशाल वृत्तीची बौद्ध परंपरा ही मात्र खास भारतीय स्वरूपाची दिसून येते. पूर्व आशियांत आज देखील याचें प्रत्यन्तर कोणीहि घेऊं शकेल. जपानमधील बहुसंख्य लोक बुद्ध आणि शिन्टो या दोन्ही पंथांचे अनुयायी आहेत. हे लोक लग्न लावतात शिन्टो धर्मपद्धतीनें आणि और्ध्वदैहिक करतात बुद्धधर्मीयांच्या चालीप्रमाणें. दोन्ही धर्म एकाच काळीं गुण्यागोविन्दानें एकत्र नांदत आहेत. कम्युनिस्टांची राजवट येण्यापूर्वी चीनमध्यें बहुसंख्य लोक बौद्ध, तावो आणि कॉन्फ्यूशियस यांच्या धर्मप्रणाली एकाच कालीं अनुसरत होते. ईशान्य आशियांतील बौद्ध धर्म अर्थातच महायानपंथीय आहे. ज्या अर्थानें ख्रिस्ती धर्म हा ब्रिटनचा राष्ट्रीय धर्म व इस्लाम हा इजिप्तचा राष्ट्रीय धर्म मानला जाईल त्या अर्थानें लंके-सकट सर्व आग्नेय आशियांतील देशांत थेरवादी बौद्ध धर्म हा राष्ट्रीय धर्म मानला जातो. मात्र हें नमूद केलेंच पाहिजे कीं या देशांतील थेरवाद धर्मपंथ, पूर्वीच्या धर्मांनाहि सामावून घेणारा आहे. उदाहरणच द्यायचें झालें तर इटलींतील रोमन कॅथलिक ख्रिस्ती पंथ व हा थेरवाद पंथ दोन्हीहि सारखेच समावेशक आहेत.

पूर्वींच्या धर्मांतील गोष्टींचा अन्तर्भाव कायम ठेवण्याच्या दृष्टीनें ख्रिस्ती धर्मानें पुष्कळच समावेशक वृत्ति व्यक्त केलेली दिसते. परन्तु ही वृत्ति मान्य करावी अशी आस्था ख्रिस्ती धर्माच्या अधिकृत प्रतिनिधींमध्यें नाहीं. ख्रिस्ती धर्माला हिन्दुधर्माच्या शांतिप्रद मानसिक वृत्तीची थोडीफार छटा जरी लाभलेली असली तरी भारतांत निर्माण झालेलीं तत्त्वज्ञाने आणि धर्म यांना विरोधी

असा दुजाभाव व असहिष्णुता त्या धर्मांत आढळून येते. बहुतेक ख्रिस्ती लोकांची श्रद्धा अशी आहे कीं सत्य आणि मुक्ति ह्यांचा मक्ता फक्त ख्रिस्ती धर्मालाच आहे. कांही ख्रिस्ती लोक तर इतर धर्मांचे शत्रुत्व करतात. कांहींनी तर त्या दुष्ट ख्रिश्चन समजुतीमुळें आणि भावनेमुळें इतर धर्म जगांतून नाहीसे करण्याचाहि प्रयत्न केलेला दिसून येतो. परन्तु अशा प्रकारची जिहादी वृत्ति प्रकट करणारा ख्रिस्ती धर्म हा कांहीं एकटाच धर्म नाहीं. भारताच्या पश्चिमेकडील भागांत उदय पावलेल्या सर्वच ध्येयप्रणालींनी आणि धर्मांनी आपल्या स्वभावांतील ही वृत्ति प्रकट केलेली आहे. इस्लाम, ज्यू, झोरोऑस्ट्रियन आणि ख्रिस्ती धर्मप्रसारोत्तर परिस्थितींत निर्माण झालेल्या कांहीं पाश्चिमात्य आधुनिक विचारप्रणालीं या सर्वांत ही असहिष्णुता दिसते. ह्यांतील कांहीं म्हणजे हुकुमशाही, नाझीवाद, साम्यवाद ह्या होत. झोरोऑस्ट्रियन लोक जेव्हां भारतांत आले तेव्हांपासून त्यांची मूळची आक्रमक वृत्ति त्यांनी हळूहळू सोडलेली आहे. ही धर्मारूढ आक्रमणाची वृत्ति क्वेकर या नांवाने परिचित असलेल्या ख्रिस्ती लोकांनी टाकून दिलेली दिसते. गांधीजींना क्वेकर पंथीयांबद्दल थोडीफार आपुलकी वाटे, ती मला वाटतें यामुळेंच. भारतीय धर्म आणि तत्त्वज्ञान यांत आढळून येणाऱ्या उदारमतवादी वृत्तीशी विरोधी अशी ही आक्रमक युयुत्सा सिंधुसंस्कृतिपलीकडील सर्व धर्मांत विशेषत्वानें दिसून येते असें मला वाटतें.

"या इतक्या मोठ्या गूढ तत्त्वाचा ठाव एकाच मार्गानें कधींहि लागणार नाहीं". हे शब्द भारतांतील कोणत्या प्रतिभावान धर्मात्म्यानें उच्चारले हें आठवतें तुम्हांला ? शंकराचार्यांचे हे शब्द आहेत काय ? का रामानुजाचार्यांचे ? का गुरु नानकांनीं हे शब्द उद्गारले ? मी तुम्हाला गंमतीनें फसवीत आहे हें तुमच्या ध्यानीं आलेंच असेल. जर हे उद्गार खरोखरीच एखाद्या भारतीयाचे असते तर ते खात्रीनें भारतीय आध्यात्मिक परंपरेशी सुसंगत असते. पण या उद्गारांचा वक्ता भारतीय साधु किंवा संत नाहीं. चौथ्या शतकांतील रोममधील सीनेटच्या एका सभासदाचे हे उद्गार आहेत. त्याचें नांव आहे क्विटस ऑरेलियस सॅमेचस. सॅमेचसच्या काळीं रोमन साम्राज्याचा अधिकृत धर्म ख्रिश्चन होता. पण सॅमेचस स्वतः ख्रिश्चन झालेला नव्हता. मी त्याचें जें वाक्य वर उद्धृत केलें आहे तें त्याचा जो पत्रव्यवहार मिलनच्या बिशप ॲम्ब्रोसशी झाला होता त्यांतील आहे. ख्रिस्ती सनाच्या चौथ्या शतकांतील नवव्या दशकापासून रोमच्या राजकीय सत्ताधिकाऱ्यांच्या शासनानें आपल्या राज्यांतील ख्रिश्चनेतर धर्मपंथांना पद्धतशीरपणें राज्याबाहेर हुसकून लावण्याचे प्रयत्न

जारी केले होते. सॅमेचस हा ख्रिश्चनेतर गटाचा प्रवक्ता होता. रोमच्या शासनानें हा धार्मिक झगडा इतक्या पराकोटीला नेला, कीं ज्युलियस सीझरनें सुमारें चारशें वर्षांपूर्वी रोमच्या सीनेटसभागृहांत 'विजय' देवतेचा जो पुतळा आणि जी वेदी अधिष्ठित केली होती, ती वेदी आणि तो पुतळा काढून टाकण्याचें ठरविलें. ॲम्ब्रोसचें मत आणि आग्रह असा होता कीं तें सारें काढून टाकलें पाहजे. सॅमेचसचें म्हणणें असें कीं त्याला हात न लावतां उलट आदरानें त्याचें जतन केलें पाहिजे. ॲम्ब्रोसच्या म्हणण्याचा विजय झाला. सरकार त्याचें ऐकें व सर्व शासनशक्तीचें पाठबळ ॲम्ब्रोसला होतें. भूमध्यसमुद्रांकित जगामधील ख्रिस्तीपूर्व धर्मांचें रक्षण सॅमेचसच्या उद्गारांनी होऊं शकलें नाहीं. हे सर्व धर्मपंथ दडपून टाकण्यांत आले. परन्तु सॅमेचसचे ते शब्द कितीतरी शतके आपले प्रतिध्वनी उमटवीतच राहिले आहेत; आणि ॲम्ब्रोस किंवा त्याचे वारस यांपैकीं कोणीहि त्याचें योग्य उतर देऊं शकले नाहींत. रोमच्या शासनानें केलेला सत्तेचा वापर हें कांहीं खरें उत्तर नव्हें. रोमचे सम्राट ग्रेशियन आणि थिओडोसियस यांची करणी अशोकाच्या हातून घडली असती अशी कल्पना देखील माझ्या मनाला शिवत नाहीं.

माझा मुद्दा आपल्या ध्यानांत आला असेल. भूमध्यसमुद्रांकित जगतांतील, ख्रिस्ती धर्माच्या पूर्वी अस्तित्वांत असलेल्या धर्मपंथांचें मनोगत सॅमेचसच्या शब्दांत अचूक व्यक्त झालेलें आहे. हिन्दु धर्माला देखील अशाच व्यापक दृष्टिकोणानें आणि विशाल मनोवृत्तीनें अधिक चैतन्यमय केलें आहें. ख्रिश्चन-प्रणालीपूर्व वाङ्मयाचा आणि ग्रीको-रोमन संस्कृतीचा अभ्यास मी केलेला आहे. ख्रिश्चन लोक ज्याचें वर्णन "पेगॅनिझम" (असेद्द्वभक्ति किंवा मूर्तिपूजा) असें करतात त्या ग्रीको-रोमन जीवनपद्धतीशी माझें अधिक जमतें; ख्रिश्चन धर्म हा जरी माझा वाडवडिलांपासूनचा धर्म असला तरी ! जरी ख्रिस्ती-धर्मपूर्व धर्मपंथांशी आणि ग्रीको-रोमन लोकांच्या तत्त्वज्ञानाशी मी मनानें निगडित झालो असलो तरी हिन्दु आणि बौद्ध या धर्मांशीहि माझें सूत जमतें. ख्रिस्तीधर्मपूर्व ग्रीको-रोमन धर्मांशी माझा जो दाट परिचय आहे आणि त्याविषयीं मला जी सहानुभूति वाटते त्यामुळेंच मला आज भारतांत व पूर्व आशियांत रूढ असलेल्या धर्मांचें मर्म समजण्याची गुरुकिल्ली प्राप्त झाली आहे. भारताच्या पश्चिमेकडील प्रदेशांत जे धर्म पूर्वी सहिष्णुतेची महती गात त्या सर्वांचा विनाश करण्याचें काम ख्रिश्चन आणि इस्लाम या धर्मांनी केलेलें आहे. आज चीनमध्यें देखील ज्या तीन धर्मप्रणाली एकत्र सलोख्यानें

नांदत आहेत, त्यांतील एक भारतांत उदय पावलेली आहे. पण त्याच्यापुढेंहि कदाचित हें सर्वनाशाचें भय वाढून ठेवलेलें दिसत आहे. पाश्चात्य देशांत वाढून विकसित झालेल्या साम्यवादासारख्या विचारप्रणालीकडून हे धर्म नष्ट होण्याची भीति निर्माण झाली आहे. ज्याला आपण विशाल मनोवृत्ति आणि व्यापक दृष्टिकोण म्हणतो अशी धार्मिक वृत्ति सर्व जगभर एकेकाळीं नांदत होती; आज ती कदाचित एकटया भारतांतच आढळून येते. तेव्हां या आध्यात्मिक ठेव्याचे समग्र मानवजातीची वडिलोपार्जित सम्पत्ति समजून रक्षण करण्याचा भार भारतावर येऊन पडलेला आहे. आजच्या अणुयुगांत या ठेव्याचें मोल कधींच करतां येणार नाहीं.

भारताकडे केवळ स्वतःच्याच धार्मिक परंपरेचा वारसा आलेला नाहीं तर प्राचीन भूमध्यसमुद्रांकित जगतांतील धार्मिक परंपरांचाहि शेषाधिकार आलेला आहे. तुम्ही जसे अशोकाचे पाठीराखे आहात तसेंच सॅमेचसचेहि. स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर भारतीय घटनेची आंखणी करतांना आपण आपली या 'न्यासा'-च्या विश्वस्ताची भूमिका चोख बजावलीत. चौथ्या शतकांतील रोमचा सम्राट थिओडोसियस आणि सतराव्या शतकांतील मोंगल सम्राट औरंगजेब यांनी जी चूक केली ती तुम्ही केलेली नाहीं. तुम्हीं भारतीय गणराज्याचा अधिकृत धर्म म्हणून हिन्दुधर्माचा पुरस्कार केलेला नाहीं. तुम्ही धर्मातीत असें सरकारी धोरण ठरवून सर्व धर्मांच्या अनुयायांना एकाच पातळीवर व समतेच्या तत्त्वावर ठेवलेलें आहे. हिन्दुधर्मानें खास अशा सवलती किंवा स्थानहि मागण्याचा आग्रह धरण्याचा मोह टाळला आहे. आणि या स्वार्थत्यागांतच हिन्दुधर्माची मूळचीच त्यागवृत्तीवरील निष्ठा प्रकर्षानें व्यक्त झालेली आहे, असें म्हणावें लागेल.

हें बोलत असतांना कांहीं सुस्पष्ट स्मृतिचित्रे माझ्या मनासमोर झगझगीत-पणें उभीं राहत आहेत. १९२७-२८च्या सुमाराचा पोलंडमधील वॉर्सा शहरांतील एक मुख्य चौक माझ्या डोळयांसमोर येत आहे. रशियन लोकांनी जेव्हां अगदी प्रथमच वॉर्सा शहराचा ताबा मिळविला तेव्हां (१९१४-१९१५) त्यांनी या शहराच्या मध्यभागीं पौर्वात्य सनातन ख्रिस्ती प्रार्थनामंदिर उभारलें. वॉर्सा हें एके काळीं रोमन कॅथलिकपंथीय स्वतंत्र अशा पोलंड देशाच्या राजधानीचें शहर होतें. रशियनांनी हें मंदिर अशासाठीं बांधलें कीं पोलिश लोकांच्या दृष्टिसमोर सतत अशी जाणीव रहावी कीं आतां रशियन लोक त्यांचे धनी झाले आहेत. १९१८मध्यें पोलंडला पुनः स्वातंत्र्य मिळाल्यानंतर,

पोलिश लोकांनी हें साम्प्रदायिक प्रार्थनामंदिर उखडून टाकलें. हें पाडापाडीचें काम मी त्या शहराला भेट देण्याच्या वेळेपूर्वी नुकतेंच पूर्ण झालेलें होतें. हें रशियन प्रार्थनामंदिर पाडून टाकल्याबद्दल मी पोलंडच्या सरकारला विशेषसा दोष देत नाहीं. ज्या कारणांसाठीं रशियनांनी तें प्रार्थनामंदिर बांधलें होतें त्यामागें धार्मिक हेतु नव्हता, तर राजकीय हेतु होता. हें कृत्य पोलिश लोकांचा मुद्दाम अपमान करण्यासाठींच उघड उघड केलेलें होतें. उलट औरंगजेबाच्या मशिदी उखडून न टाकल्याबद्दल भारत सरकारची मी मनःपूर्वक प्रशंसाच करतो. विशेषतः बनारस येथील घाटावरून दिसणाऱ्या दोन आणि मथुरा येथील कृष्ण टेकडीच्या माथ्यावरील एक अशा मशिदी मनश्चक्षूसमोर उभ्या आहेत !

वॉर्सा येथील चौकांत मध्यवर्ती जागेंत सनातनी प्रार्थनामंदिर बांधण्यामागें रशियनांची जी साभिनिवेश मानखंडनेची प्रेरणा होती तीच औरंगजेबाच्या मनांत या तीन मशिदी बांधण्यामागेंहि होती. औरंगजेबाचा हेतु धार्मिक नव्हता तर केवळ साभिनिवेश राजकीय मानखंडनेचा होता. हिन्दुधर्माच्या पवित्रतम अशा स्थळांवर इस्लामचें सार्वभौम राज्य डौलानें मिरवीत आहे हें सूचित करण्यासाठींच त्या मशिदी बांधल्या गेल्या. अत्यंत प्रक्षोभक अशीं मर्मस्थळे हुडकण्यांत औरंगजेबाची प्रतिभा मोठी वाकबगार होती. या दृष्टीनें औरंगजेब आणि स्पेनचा राजा दुसरा फिलिप यांची जोडी चांगली जमते. ख्रिश्चन, इस्लाम आणि ज्यू या धर्मसमूहाच्या वृत्तींत दिसून येणाऱ्या मदान्ध, माथेफिरू धर्मवेडाच्या छटेचे हे दोघे मूर्तिमन्त अवतार शोभतात. कुत्सित, तिरस्करणीय आणि वाट चुकलेल्या औरंगजेबासारख्या दुर्जनानें आपलें सारें कष्टमय आयुष्य स्वतःच्याच अपकीर्तीची प्रचंड स्मारकें उभीं करण्यांत घालविलें. औरंगजेबानें बांधलेल्या मशिदी न पाडतां तशाच ठेवण्याच्या तुमच्या कृतीपेक्षां, रशियनांचें, त्यांची स्वतःची बेइज्जत करणारें वॉर्सामधील स्मारक नष्ट करण्यांत, मला वाटतें, पोलिश लोकांनी अधिक दयार्द्र वृत्ति प्रकट केली आहे. या मशिदींच्या अस्तित्वामुळें बदनामी होत आहे ती हिंदूंच्या ज्या पवित्र तीर्थभूमींवर या मशिदी दिसत आहेत त्या तीर्थांची नव्हे तर त्या मशिदी तेथें उभारणाऱ्या औरंगजेबाची.

मौलाना आझाद जर औरंगजेबाचे समकालीन असते, तर आपला व साम्राज्याचा नाश ओढवून आणून स्वतःचीच दुष्कीर्ति करणारें धोरण टाकून देण्यासाठीं समजूत घालण्याच्या कामीं त्यांना यश आलें असतें कीं नाहीं याची

मला वानवाच आहे. औरंगजेब हा "उल्लामा"ला प्रमाण मानीत असे. परंतु इस्लामी धर्मतत्त्वाचा पुरस्कार करणाऱ्यांत विशाल मनोवृत्तीचे प्रतिनिधी होते तसेच सकुंचित वृत्तीचेहि होते. दुर्दैवानें औरंगजेब योग्य प्रकारच्या उल्लामाचा नव्हे तर उन्मार्गदर्शक उल्लामाचा आदेश मानीत असे.

औरंगजेबाच्या मशिदी कांहीं भारतांतील मुसलमानी वास्तुकलेचे अद्वितीय नमुने नव्हेत. मुळांतच मोंगल वास्तुकलेची पातळी वरच्या दर्जाची आहे. ताजमहाल किंवा आग्रा येथील किल्ला किंवा इथल्या जगप्रसिद्ध अशा उत्कृष्ट "शाहजहानाबादी" स्मारकांची काळजी भारतीय पुराणवस्तुसंशोधन खातें किती अगत्यपूर्वक वाहतें हें मी स्वतः अवलोकन केलेलें आहे. केवळ इस्लामी विश्वानेंच नव्हें तर साऱ्या जगानें याबद्दल भारताचें ऋणी राहिलें पाहिजे. अशीं सार्वजनिक स्मारके अत्युत्कृष्ट कलेचे नमुने ठरतात तेव्हां त्यांचे रक्षण करणें हें कांहीं विशेष गौरवास्पद नाहीं. पण अशा स्मारकांत असली आकर्षक गुणवत्ता नसतांनाहि त्यांचें रक्षण करणें मात्र खास गौरवास्पद ठरतें. भारतांतील सत्ताधारी इंग्रजांनी देखील आपल्या पूर्वींच्या मुसलमानी शासनकर्त्यांचे अनुकरण करून, आपल्या अल्पकालीन अस्तित्वाच्या खुणा म्हणून कांहीं स्मारकें मागे ठेवलेलीं आहेत. दुर्दैवानें ब्रिटिशांनी निर्माण केलेलीं स्मारकें, मोंगलकालीन कलेसारखी नसून ती व्हिक्टोरियन कालखंडातील गॉथिक वास्तुकलेच्या धर्तीवरची आहेत. जर माझ्या देशबांधवांपैकीं कोणाच्या शब्दाला भारतीय सार्वजनिक बांधकामखात्यांत कांहीं सत्ता प्राप्त झाली, तर भारतांतील ब्रिटिशांच्या राजवटींतील कांहीं असंस्कृत अशा स्मारकांचे अवशेष उखडून टाकण्याचा आग्रह तो नक्की धरील. परन्तु भारतीय अधिकारी मात्र हें कधींच करणार नाहीत. कारण ताजमहालप्रमाणें या ब्रिटिश स्मारकांनाहि ते जपत आहेत. भारताची ही सहिष्णुता माझ्या मनांत व्यथाकुल कौतुकाची भावना निर्माण करते. आपल्या भारतांतील अस्तंगत अस्तित्वाच्या या दृश्य खुणा भारतांत राहाव्या हें इंग्रजांना मानवणें स्वाभाविक आहे. मला मात्र ब्रिटिशांची आठवण जागी ठेवणारें एखादें क्रिकेटचें मैदान, बोरीबन्दर येथील रेल्वे स्टेशनपेक्षां कमी बोंचक वाटतें.

पण मला वाटतें अजून उभी असलेलीं व्हिक्टोरियाच्या काळांतील इंग्रजांची हीं गॉथिक धर्तीवरची स्मारकें भारताच्या दृष्टीनें कांहींशी मूल्यवान आहेत. विविधतेंतून एकता व्यक्त करणाऱ्या भारताच्या वैशिष्टचाला हीं स्मारके एक आगळीच छटा प्राप्त करून देतात. भारताच्या सहिष्णु वृत्तीला त्यामुळें

चांगलाच उजाळा येतो. कसें का असेना, एका गोष्टीबद्दल मला खात्री वाटते. विविधतेंतून एकतेचा आनंद अनुभविणें हा भारतानें अखिल जगताला दिलेला वस्तुपाठ आज साऱ्या विश्वाला फार मोलाचा आहे. मी एकसारखा सांगत असलेला मुद्दा पुनः एकदा मांडण्याचा धीर करतो. आपण राहत असलेल्या युगांत विज्ञानानें "अंतराचा अन्त" घडवून आणलेला आहे. यामुळें जगांतील साऱ्या स्थानिक संस्कृती, धर्म आणि जाती हातीं अण्वस्त्र घेऊन एकमेकांच्या समोरासमोर उभ्या ठाकलेल्या आहेत. शरीरानें आपण एकमेकांजवळ आलों हें खरें; पण अन्तःकरणानें आपण अजून एकमेकांना पारखेच राहिलों आहोंत. अत्यन्त निकट आल्यामुळेंच कीं काय, पूर्वीं कधींहि आला नव्हता इतका या पारखेपणाचा प्रत्यय आज आपल्याला येत आहे. आतां आपण कसें वागणार ? विविधतेच्या जाणिवेंतून भीति निर्माण होऊन आपण एकमेकांचा द्वेष करणार काय ? असें घडेल तर आपण परस्परांना रसातळाला नेऊं. कां आपण एकाच कुटुंबांतील व्यक्तींप्रमाणें राहणार ? परस्पर विनाशापासून सु का करून घेण्याचा हाच एकमेव पर्याय आहे. पण हें साध्य करावयाचें असेल, ही एकता साधावयाची असेल, तर या आपल्या मानवी जीवनाला विविधतेचा जो थोर वारसा लाभला आहे त्याचें मोल ओळखण्यास आपण शिकलें पाहिजे. आपल्या शेजाऱ्यांच्या देणगींतील गुणविशेषांचें केवळ कौतुक करून भागणार नाहीं; तर समग्र मानवजातीच्या समाईक ठेवीचा तो एक अमोल हिस्सा आहे या भावनेनें आपण तो आनंदानें आपलासा केला पाहिजे. शिवाय आपले शेजारी हे मानवी कुटुंबांतील मूल्यवान असे घटक आहेत हें ओळखून आपण त्यांच्यावर प्रेम केलें पाहिजे. कारण अणुयुद्धांत नष्ट होण्याचें भय सर्वांनाच सारखें भेडसावीत आहे. यामुळेंच विविधतेतूत एकता अनुभविण्याची भारताची विशिष्ट सिद्धि आज जागतिक दृष्टीनें फार महत्त्वाची ठरत आहे.

मला आतां शेवटला एकच मुद्दा सांगावयाचा आहे. माझ्या मतें तो मुद्दा सर्वांत महत्त्वाचा आहे. गांधीजींना रोज बरेंच काम करावें लागत असें. आजच्या प्राप्त परिस्थितींत कोणत्याहि मोठ्या चळवळीच्या पुढाऱ्याची अशी परिस्थिति होणें अपरिहार्य आहे. तरी या प्रचंड व्यापांतून कांहीं क्षण चिंतनासाठीं राखून ठेवण्याची प्रथा गांधीजी कटाक्षानें पाळीत असत. असें जर त्यांनी केलें नसतें, तर, मला वाटतें, जो प्रचंड उद्योग ते करीत असत तो त्यांच्या हातून झाला नसता. कारण त्या उद्योगासाठीं लागणारी दुर्दम्य आध्यात्मिक शक्ति त्यांना अशा चिंतनाच्या क्षणांतूनच लाभत असे. असा वेळ

खास राखून ठेवीत असतांना गांधीजी केवळ स्वतःचीच निष्ठा सांभाळीत नव्हते तर साऱ्या भारताच्या दृष्टीनेहि निष्ठेचा मार्ग अवलंबीत होते. त्यांची ही प्रथा खास भारतीय परंपरेची निदर्शक अशीच होती.

आज भारतासमोर अत्यंत महत्त्वाची आणि शक्तिसर्वस्व पणाला लावणारी अनेक भौतिक कार्यें उभीं आहेत. माझ्या डोळयांसमोर, समाजविकास-केंद्रांचें प्रचंड योजनाकार्य आहे. भारतीय शेतकऱ्याचें भौतिक जीवनमान सुधारणें हें कांहीं केवळ एक जडवादी उद्दिष्ट नाहीं. मूलतः तें एक आध्यात्मिक कार्य आहे. कारण सुधारलेल्या जीवनमानानेंच कोणतेंहि आध्यात्मिक कार्य सफल होण्यास साहाय्य होईल. परन्तु गांधीजींच्या उदाहरणावरून हें स्पष्ट दिसतें कीं आपली आध्यात्मिक उन्नति कोणत्याहि प्रकारें शबलित होऊं न देतां किंवा जगाच्या चिंतेनें ती खडित होऊं न देतां, प्रचंड अशीं दैनंदिन व्यवहारांतील स्वतःचीं कार्यें कोणासहि सहज पार पाडतां येतात. गांधीजींनी हेंच कृतीनें दाखविलें आहे कीं आध्यात्मिक चैतन्य हें व्यावहारिक कर्मशीलतेचें प्रेरणास्थान आहे, गंगोत्री आहे. त्यामुळेंच स्फूर्ति लाभते, भौतिक कार्यें सफल होतात व विनाश थांबतो.

मला वाटतें, आजच्या जगाला हाच सर्वांत महत्त्वाचा धडा भारतानें शिकवावयाचा आहे. पाश्चिमात्य मध्ययुगीन ख्रिस्ती धर्मानें या चिंतनाचें महत्त्व जाणून त्याचा कृतीनें स्वीकारहि केलेला होता. त्यानंतर मात्र ह्या चिंतनाच्या कलेला आम्ही जवळ जवळ पारखे झालेलो आहोंत. ही आमची फार मोठी हानि आहे. कारण चिंतनकला म्हणजेच जीवन जगण्याची कला होय. म्हणून आम्ही भारताकडे दृष्टि वळवूं पहात आहोंत. माणसाला मनुष्यत्व प्राप्त करून देणारी ही आध्यात्मिक प्रेरणा भारतीय अंतःकरणांत अजून जागी आहे. आपण जगाला अशाच उदात्त भारतीय आदर्शांचा लाभ सतत मिळवून देत जा. दुसरी कोणतीहि गोष्ट मानवजातीला आत्मनाशापासून वांचविण्यासाठीं इतकें साहाय्य करूं शकणार नाहीं.

REFBK-0012340
92380